


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड








www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ४० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२


# बार्शीत रात्री नेमकं काय घडलं! काय बिघडलं?

## जुने मैदान, चेहरे जुनेच ... पुन्हा लढाई घनघोरच!

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

पारंपरिक 'हाय व्होल्टेज' लढत होत असलेल्या आणि उभ्या महाराष्ट्राचं पुन्हा लक्ष लागलेल्या बार्शी विधानसभा मतदार संघात राजकीय वातावरण प्रचंड तापत आहे. आमदार राजेंद्र राऊत आणि माजीमंत्री दिलीप सोपल यांच्या समर्थकांमध्ये आपापल्या गॉडफादरांना निवडून आणून विजयाचा गुलाल अंगावर घेण्यासाठी पुन्हा जोरदार ईर्षा निर्माण झाल्याचे चित्र दिसत असून इथली लक्षवेधी निवडणूक वेगळ्या वळण्यावर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, दोन्ही गटांच्या समर्थकांकडून एकमेकांना डिवचण्याचा प्रकार होऊ शकतो, त्यातून दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये कुरबूर होईल, इथली निवडणूक वेगळं वळण घेईल, असा अंदाज राजकीय जाणकारांना होता. पोलीसदेखील या अनुषंगानं, अलर्ट आहते.अशातच बुधवारी (ता.६) रात्री बार्शीत अनपेक्षित घटना घडली. राऊत गटाच्या कार्यकर्त्यांनी सोपल यांच्या घरासमोर गोंधळ घातल्याचा आरोप झाला. या घटनेच्या अनुषंगाने, नागेश अक्कलकोटे आणि राजेंद्र राऊत यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.

### मैदान तेच अन् योद्धेसुध्दा तेच वर्चस्वाची 'फिरसे' घनघोर लढाई

विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु झाला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. राजकीय नेते ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप देखील करताना दिसत आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीचे दोन्हीकडीन बाजुचे उमेदवार पुन्हा आम्हीच निवडून येणार असल्याचा दावा करत आहेत. अशातच बंडखोर उमेदवारांनी नेत्यांची चिंता चांगलीच वाढवल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तथापि, येत्या २० नोव्हेंबरला मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतर २३ नोव्हेंबरला मतदानाचा निकाल लागणार आहे. त्यानंतरच महाराष्ट्रातील सत्तेच्या समीकरणाचं चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील लढतीकडं मात्र, संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. मैदान तेच उमेदवारही तेच रिंगणात आहेत. पुन्हा दिलीप सोपल विरुद्ध



राजेंद्र राऊत यांच्यात लढत होत आहे. तालुक्यावरील वर्चस्वासाठी इथं घनघोर लढाई सुरु झाली आहे.

### 'त्या' रात्री नेमकं घडलं काय?

बार्शी तालुक्यात सोपल आणि राऊत यांच्यात पुन्हा पारंपरिक 'फाईट टू फाईट' विधानसभेसाठी जंगी सामना होत आहे.या दोन्ही गटाकडून प्रचाराचा धुराळा उडवला जात आहे. मुख्यत्वे, बार्शी शहरासह मतदार संघात निवडणुकीचा मोहोल उठला आहे. दोन्ही गटाचे कार्यकर्ते निवडणुकीला प्रचंड कामाला लागले आहे.मुळातच प्रचाराचा कमी दिवस राहिल्यानं पदयात्रा, गावभेट दौरे, प्रचारसभा, कॉर्नर सभा, गाठीभेटी याचा सोपल आणि राऊत यांनी धुमधडाका सुरु ठेवला आहे. याच टप्पावर आमदार राऊत यांनी बुधवारी रात्री रॅली आणि सभा ठेवली आहे. या कार्यक्रमासाठी राऊत समर्थक मोठ्या संख्येनं जमले होते. कार्यक्रम संपल्यानंतर रणवीर राऊत यांच्यासह राऊत समर्थक आगळगाव येथून बार्शी शहरात पोचत होते. यावेळी मार्गावर असलेल्या माजीमंत्री दिलीप सोपल यांच्या घरासमोर राऊत समर्थक जमले. सोपल यांच्या घराकडे बघून इथं गोंधळ घातल्याचा सोपलांसह समर्थकांचा आक्षेप आहे. तसा आरोपदेखील करण्यात



आला. तर दुसऱ्या बाजूला सोपल यांच्या ज्येष्ठ बंधूनी राऊत गटाच्या कार्यकर्त्यांना रस्त्यावरुन जाताना विनाकारण डिवचलं.त्यातून संतापलेल्या कार्यकर्त्यांनी उत्तर देत गोंधळ घातला, अशी बाजू राऊतांसह त्यांच्या समर्थकांनी मांडली.

### नागेश अक्कलकोटे म्हणाले,

महाविकास आघाडीचे उमेदवार तथा माजीमंत्री दिलीप सोपल यांच्या घरासमोर मोठा बंदोबस्त आहे. तरीपण बुधवारी (ता.६) संध्याकाळी आमदार राजेंद्र राऊत यांच्या समर्थकांनी हुल्लडबाजी करीत गोंधळ घातला. माज आणि मस्तीचं प्रदर्शन घडवलं.प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या घरासमोर रात्री उशिरा अशा पद्धतीने घोषणाबाजी करणं अत्यंत चुकीचे आहे. निवडणूक आयोग आणि पोलिसांनी या घटनेची दखल घेऊन कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. आमदार राऊत सुपुत्र रणवीर राऊत हे बुलेटवर उभे राहून सोपल यांच्या घराकडे पाहून अर्वाच्य भाषेत घोषणा देऊन या परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करीत होते.

### राजेंद्र राऊत म्हणाले,

### दशहत माजवण्याचा आरोप खोटा; तरुण वर्गाला उचकावणाऱ्यांना प्रत्युत्तर देऊ

काल बुधवारी आगळगाव येथे आमची सभा होती. तिकडे जाण्यासाठी एकच रस्ता आहे. या रस्त्यावरुन आमचे कार्यकर्ते जात होते. प्रतिस्पर्धी उमेदवार दिलीप सोपल यांचे भाऊ हे घराबाहेर येऊन अश्लील हावभाव करत होते. तरुण कार्यकर्त्यांना वेड्यावाकड्या खुणा करुन डिवचण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळं या अश्लील चाळ्यांना उत्तर देण्याचे काम तेथील तरुणांनी केले. आमच्या सभेला ज्या रस्त्यावरुन समर्थक येत होते, तो रस्ता कोणाच्या बापाचा आहे असं कोणी समजू नये, हा रस्ता सरकारचा आहे. कोणाची जहागिरी नाही.७८ वर्षाच्या वयाच्या व्यक्तीने केलेल्या अश्लील चाळ्यांना चोख उत्तर देऊ. या वयाच्या माणसाला अश्लील हावभाव करण्याची लाज कशी वाटली नसावी. दहशत माजवण्याचा आरोप अत्यंत चुकीचा आहे.अश्लील चाळे करण्यात तुमचं आयुष्य गेलं त्यामुळे जनता तुम्हाला उत्तर देईल.तरुण वर्गाला तुम्ही उचकवत असाल तर ते तुम्हाला प्रत्युत्तर देणार! माझा मुलगा वकील आहे, त्यामुळे तो दहशत माजवण्याचा प्रश्नच येत नाही. माझा मुलगा रणवीरवर हल्ले केले, रक्तबंबाळ केले, खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न केला, तालुका दहशतीत ठेवला. त्यामुळं आता जनता तुम्हाला चारी मुंड्या चीत करत असताना दारातून जाणाऱ्या जनतेत तुम्हाला दहशत दिसत आहे.

# भाऊ-भाऊ, काका-पुतणे, भाऊ-बहीण, पिता-पुत्र अन् नातवंडे!

## घराणेशाहीच्या नव्या ताऱ्यांचेही आमदारकीला साकडे!

✔ सोलापूर/शिवाजी भोसले

राजकारण अन् घराणेशाही तसं जुळलेलं समीकरण.आजवर राजकारणातील घराणेशाही हा नेहमीच चर्चेचा विषय राहिलेला. केवळ निवडणुकांच्या काळात घराणेशाहीच्या मुद्यावर आरोप-प्रत्यारोप राहतात, निवडणूक संपली की 'जैसे थे' अशी परिस्थिती राहते. सत्तेच्या सारीपाटावरील घराणेशाही लोकशाहीला पुढे घेऊन जाते की मागे जाते, याचा फारसा विचार होताना दिसत नाही. घराणेशाही ही आपल्या समाजातील सरंजामशाहीचे लक्षण असल्याचं लोकशाहीत मानलं जातंय. दरम्यान, लोकशाहीच्या उत्सवात, सत्ता परिवर्तन व्हायला हवं, हे अभिप्रेत आहे. प्रत्येक निवडणुकीत सत्ता बदलावर भर दिला जातो हे एक अर्थाने बरोबर असलं तरी जोपर्यंत सत्तेचा पोत बदलत नाही तोपर्यंत वरवरच्या मलमपट्टीला काहीही अर्थ नाही. सोलापूर जिल्ह्यात होत असलेल्या या खेपेच्या विधानसभेच्या निवडणुकीत सुद्धा घराणेशाही दिसत आहे. 'विधानसभेचे युद्ध नवं; घराणेशाहीतले तारे सुध्दा नवे !' असं चित्र या निवडणुकीच्या निमित्ताने, उमटलं आहे.

### शिंदे घराणेशाहीतले काका-पुतण्या युद्धभूमीवर

माढा तालुक्यातील निमगाव येथील शिंदे कुटुंबीय तसं राजकारणातलं बडप्रस्थ. या परिवाराची घराणेशाही या तालुक्याच्या राजकारणात दिसते. रणजितसिंह शिंदे यांच्या रूपाने तिसरी पिढी विधानसभेच्या आखाड्यात उतरली आहे. स्व. विठ्ठलराव शिंदे तद्नंतर बबनराव शिंदे, संजयमामा शिंदे अशी आमदारकीची उतरंड या परिवारात आजवर बघायला मिळाते. शिंदे परिवारातील तिसऱ्या पिढीला आमदारकीची भुरळ पडली आहे. बबनराव शिंदे यांनी आपल्याकडील



संजयमामा शिंदे रणजितसिंह शिंदे

तालुक्याच्या आमदारकीचे सिंहासन सुपुत्राच्या हवाली करण्यासाठी या खेपेच्या विधानसभेच्या आखाड्यात उतरवला आहे. रणजितसिंह शिंदे यांना आमदार केलं म्हणजे 'तथास्तु' म्हणता येईल, असाच बबनराव शिंदे यांचा व्होरा असावा.

### एकाच परिवारातील दोघे आखाड्यात अन् तेही प्रबळ अपक्ष म्हणून

घराणेशाहीच्या राजकारणाचा प्रत्यय आणून देणाऱ्या शिंदे परिवाराचे सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात मोठा वलय दिसत आहे. साखर सम्राट असणाऱ्या या परिवाराने सत्तेच्या राजकारणात आपलं मोठं वेगळं अस्तित्व निर्माण केले. याच अस्तित्वाच्या जोरावर त्यांची राजकारणात मोठी घोडदौड सुरू आहे. शिंदे परिवारातील आमदार संजय मामा शिंदे आणि सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे हे दोघेही या खेपेच्या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विशेष म्हणजे दोघेही अपक्ष म्हणून विधानसभेच्या युद्धभूमीवर लढतात. वास्तविक पाहता प्रबळ अपक्ष म्हणून लढणं विधानसभेला तेवढं साधं सोपं, अन् सरळ नाही, तरीपण साखर लॉबी पर्याय सहकार क्षेत्रातल्या शिंदे परिवारानं आमदार संजयमामा शिंदे यांना करमाळ्याच्या मुलखातून तर रणजितसिंह शिंदे यांना माढ्याच्या आखाड्यातून विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे.

### भावा-भावानंतर आता काका-पुतण्या आखाड्यात

आमदार संजय मामा शिंदे यांना करमाळ्यातून तर रणजीत सिंह शिंदे यांना माढ्याच्या आखाड्यातून उतरवण्यात आलं आहे. राज्याच्या राजकारणात काका पुतण्यावरून वेगळं राजकारण जरी असलं तरी शिंदे कुटुंबीयात मात्र काका पुतण्याच्या बाबतीत कुटुंबाच वेगळं गणित आहे. शिंदे परिवाराने घरातील दोघा सदस्यांना निवडणुकीच्या आखाड्यात एका वेळी उतरवलं आहे. यापूर्वीच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी आमदार बबनदादा शिंदे आणि आमदार संजय शिंदे हे दोघे भाऊ एकाच वेळी विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात होते. दोघ भावा नंतर आता काका पुतण्या एकाच वेळी निवडणुकीच्या आखाड्यात आहेत.



### शहर मध्यलासुद्धा दिसली असती घराणेशाही पण...

खासदार प्रणिती शिंदे यांना तीन टर्म आमदारकीला निवडून दिलेल्या सोलापूर शहर मध्य मतदार संघातदेखील काँग्रेसच्या उमेदवारीबाबत घराणेशाहीचं प्रतिबिंब दिसलं होतं. तशी चाहूलदेखील लागली होती. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचे नातू शेखर पहारिया यांची या मतदार संघातून लढण्याबद्दलची चर्चा होती. तशी चाचपणीदेखील झाली होती. मात्र, पुढे कुठे माशी शिंकली



सुशीलकुमार शिंदे खा. प्रणिती शिंदे शेखर पहारिया

माहिती नाही. पण विधानसभेच्या आखाड्यात त्यांना उतरवलं गेलं नाही.

### करमाळ्यात दोघे संघर्षयोद्धे घराणेशाहीमधलेच

करमाळा विधानसभेच्या निवडणुकीत या खेपेला राजकीय वारसा असलेले आमदार संजयमामा शिंदे हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. आमदार शिंदे हे दुसऱ्यांदा इथल्या आखाड्यातून टक्कर देत आहेत. तर त्यांचे विरोधी प्रतिस्पर्धी दिग्विजय बागल यांनाही राजकीय वारसा आहे. स्व. दिगंबराव बागल यांचे सुपुत्र असलेले दिग्विजय हे आमदारकीच सिंहासन मिळवण्यासाठी आपलं नशीब आजमावत आहेत. आमदार संजयमामा शिंदे आणि दिग्विजय बागल



संजयमामा शिंदे दिग्विजय बागल

अशा घराणेशाहीच्या उमेदवारांमध्ये इथं विधानसभा निवडणुकीचा आखाडा होत आहे. यापूर्वी घराणेशाहीच्या राजकारणाचा वारसा असलेल्या बागल परिवारातील रश्मी बागल-कोलते यांनी मागील विधानसभेची निवडणूक लढवली होती. या खेपेस त्यांचे बंधू दिग्विजय हे निवडणुकीच्या आखाड्यात आहेत गेलाखेपेस बहीण या खेपेस भाऊ असं उमेदवारीच्या बाबतीत इथलं चित्र आहे. 'वाटीतलं ताटात अन् ताटातलं वाटीत' असाच हा तो काहीसा प्रकार.

### घराणेशाही अन् सावंतशाही चंद्रभागा तिरी

शैक्षणिक संस्था अन् साखर उद्योग यातून मागच्या १५-२० वर्षात आपल्या परिवारात मोठी अर्थक्रांती घडवून आणणाऱ्या मुळच्या माढा तालुक्यातील वाकाव इथल्या सावंत परिवारानं आपलं राजकीय बलस्थान



तानाजी सावंत शिवाजी सावंत अनिल सावंत

लढताहेत. सत्तेच्या राजकारणामधील सावंत घराणेशाहीचं लोण चंद्रभागा तिरी पोचलंय. खास बाब म्हणजे सावंत यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची उमेदवारी मिळविताना

अक्षरक्ष:सोलापूर

बसवलं. या परिवारातील प्रा.डॉ. तानाजी सावंत हे आमदार झाले...मंत्रीसुद्धा झाले. पण एवढ्यावरच त्यांची महत्त्वाकांक्षा थांबणार असेल तर ते सावंत कसले. सत्तेच्या राजकारणात पदं मिळवण्यासाठी बक्कळ 'माया' ओतणाऱ्या सावंतांच्या घरामधील प्रत्येकाला आमदारीकीची भूरळ पडली आहे. प्रा. शिवाजी सावंत यांनादेखील आमदार व्हायचं होतं. त्यांनी सोलापूर शहर मध्यसाठी तसेच माढ्यासाठी मोठी तयारी केली होती. मात्र, अनेक गुंतागुंतीमुळं त्यांना आमदारकी लढवणं शक्य झालं नाही. तथापि, सावंत परिवारामधील प्रा. डॉ. तानाजी आणि प्रा. शिवाजी सावंत यांचे बंधू सुभाष सावंत यांचे सुपुत्र अनिल सावंत हे पंढरपूर विधानसभेच्या आखड्यात मोठ्या धैर्यानं जिल्ह्याल्याच नव्हे, तर राज्याचा 'जादुई करिष्मा' दाखवला. खरं तर त्यासाठी कोणाचं 'वजन' वापरलं? हा भाग वेगळा. पण महाविकास आघाडीत जागा काँग्रेसची असताना, या पक्षाचा उमेदवार जाहीर होण्याआधीच सावंतशाहीनं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या अधिकृत उमेदवारीचा 'एबी' फॉर्म आणला, हे विशेषच.

### सांगोल्याच्या युद्धभूमीला राजकीय घराणेशाहीची झालर

काय झाडी... काय डोंगर... काय हॉटेल.. सांगोला विधानसभेचे आमदार शहाजी पाटील यांच्या डायलॉगमुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात प्रसिद्धीस आलेल्या सांगोला विधानसभेच्या आखाड्यात राजकीय घराणेशाहीचा वारसा दिसत आहे. माजी आमदार दीपक साळुंखे हे या मतदारसंघातून महाविकास आघाडीच्यावतीने लढत आहेत. त्यांचे पिताश्री स्व. काकासाहेब साळुंखे हे आमदार होते. त्यांचाच राजकीय वारसा दीपक साळुंखे यांना आहे. मोठ्या राजकीय वारशाच्या जीवावर ते या खेपेच्या विधानसभेच्या युद्धभूमीवर आमदार शहाजी पाटील आणि डॉ. बाबासाहेब देशमुख यांना टक्कर देण्यासाठी सज्ज झाले आहेत.



दीपकआबा साळुंखे

### मोहोळला राजकारणातील घराणेशाहीच; 'लक्ष्मीपुत्रां'ची आमदारकी फक्त नावालाच!

बहुचर्चित मोहोळ विधानसभेच्या आखाड्याचा विचार करता इथं आरक्षणानुसार, विद्यमान आमदार यशवंत माने हे निवडणूक लढवत असले तरी इथलं चित्र वेगळं आहे. सत्तेच्या राजकारणामधील अनगरकर पाटील परिवाराची घराणेशाहीच इथं दिसते. राजकीय घराणेशाहीच्या जोरावर इथला आमदार अनगरकर पाटील ठरवतात. आजवर इथं निवडून आलेल्या किंबहुना आणलेल्या प्रत्येक 'लक्ष्मीपुत्रा'ची आमदारकी फक्त नावापुरतीच ठरली. अनगरकर पाटील पिता-पुत्र हे इथल्या आमदारांचे बोलविते धनी. 'अनगरकर पाटील बोले अन् आमदार डोले' हेच इथलं वास्तव राहिल्याचा बोलबाला आहे.

धक्का!! सुराज्य
शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर २०२४ । पान २



# आधी अर्ज भरले, नंतर निजामी मराठ्यांच्या बैठका घेतल्या, मात्र...



## प्रकाश आंबेडकरांचे मनोज जरांगेंवर पुन्हा ताशेरे

✔ मुंबई/प्रतिनिधी

**पहिल्यांदा उमेदवारी अर्ज भरा, असे म्हणून सर्वांना जरांगेंनी अर्ज भरायला लावले. या निजामी मराठ्यांच्या बैठका झाल्या. यानंतर काही ठिकाणी गरीब मराठा आणि काही ठिकाणी ओबीसी उमेदवार उभे केले आणि इतर ठिकाणी मराठा विरूद्ध मराठा असे चित्र निर्माण करण्यात आले. या बैठकांत मराठा आमदार कसे निवडून येतील यानुसारच आखणी करण्यात आली, अशा शब्दांत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पुन्हा जरांगेंवर ताशेरे ओढले आहेत. तर या संपूर्ण खेळात भाजप आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस हे एकत्र आहेत हे लक्षात घेऊनच ओबीसींनी मतदान करण्याचे प्रकाश आंबेडकरांनी आवाहन केले आहे.**

प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, ओबीसींचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने थांबवण्यात आले आहे. उद्या विधानसभेच्या माध्यमातून शिक्षण आणि नोकऱ्यांमधील आरक्षण थांबवले जाईल, हे आपल्याला मान्य आहे का? असा सवाल उपस्थिता करत 'मान्य नसल्यास किंतु, परंतुची चर्चा न करता वंचित बहुजन आघाडीने उभे केलेल्या उमेदवारांना मतदान करा, असे आवाहनही प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

'जरांगे पाटील आणि शरद पवार यांची जी घोषणा आहे, २०० आमदार विधानसभेत असतील. याच्याच अंमलबजावणीला आता सुरुवात केली आहे. मराठ्यांनी मराठ्यांनाच मतदान दिले पाहिजे, असा त्यांचा निर्णय झाला आहे. आता ओबीसींनी आरक्षण वाचवण्यासाठी वंचितच्या उमेदवारांना मत देण्याची भूमिका घेतली पाहिजे. ही भूमिका जर बजावली तरच ओबीसींचे उमेदवार निवडून येतील, असे आंबेडकर यांनी अधोरेखित केले.

दरम्यान प्रकाश आंबेडकर यांनी धार्मिक प्रचारावरही सडकून टीका केली आहे. ते म्हणाले, एक प्रचार निश्चित केला जाणार की, धर्म संकटात आहे. पण मी तमाम ओबीसींना विचारतो की, आपण आपल्या वाडवडिलांच्या, पूर्वजांचा धर्म सोडणार आहात का ? तो आपण मुघलांच्या काळात सोडला नाही, तर आताच्या काळात कसा सोडणार? ही चर्चा निरर्थक आहे. ही चर्चा भाजप, आरएसएस, बजरंग दल, हिंदू महासभा यांच्यामार्फत केली जाते. पण तुम्ही त्यांना विचारा की, तुम्ही आमच्या आरक्षणाच्या बाजूने का नाही. ओबीसी आरक्षणाचे समर्थन आपण का करत नाही. धोका धर्माला नसून आरक्षणाला आहे, असेही प्रकाश आंबेडकर यांनी नमूद केले.

दरम्यान, प्रकाश आंबेडकर दावा करताना म्हणाले की, एक प्रचार निश्चित केला जाणार आहे आणि तो म्हणजे धर्म संकटात आहे. त्यामुळे मी तमाम ओबीसींना विचारतो की, आपण आपल्या वाडवडिलांचा आणि पूर्वजांचा धर्म सोडणार आहात का? आपला धर्म आपण मुघलांच्या काळात सोडला नाही, मग आताच्या काळात कसा सोडणार? असे प्रश्न उपस्थित करत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, ही चर्चा निरर्थक आहे. कारण ही चर्चा भाजपा, आरएसएस, बजरंग दल आणि हिंदू महासभा यांच्यामार्फत केली जात आहे. त्यामुळे त्यांना विचारा की, तुम्ही आमच्या आरक्षणाच्या बाजूने का नाही? ओबीसी आरक्षणाचे समर्थन आपण का करत नाही? असेही प्रश्न आंबेडकरांनी उपस्थित केले. ते म्हणाले की, धोका धर्माला नसून, आरक्षणाला आहे.

### आपण आपल्या वाडवडिलांच्या, पूर्वजांचा धर्म सोडणार का?

एक प्रचार निश्चित केला जाणार आहे आणि तो म्हणजे धर्म संकटात आहे. मी तमाम ओबीसींना विचारतो की, आपण आपल्या वाडवडिलांच्या, पूर्वजांचा धर्म सोडणार आहात का ? तो आपण मुघलांच्या काळात सोडला नाही, तर आताच्या काळात कसा सोडणार? ही चर्चा निरर्थक आहे. ही चर्चा भाजप, आरएसएस, बजरंग दल, हिंदू महासभा यांच्यामार्फत केली जाते. पण तुम्ही त्यांना विचारा की, तुम्ही आमच्या आरक्षणाच्या बाजूने का नाही. ओबीसी आरक्षणाचे समर्थन आपण का करत नाही. धोका धर्माला नसून, आरक्षणाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने थांबवण्यात आल्याचेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

### तरच ओबीसी उमेदवार निवडून येतील

मराठ्यांनी मराठ्यांनाच मतदान दिले पाहिजे असा त्यांचा निर्णय झाला आहे. आता ओबीसींनी आरक्षण वाचवण्यासाठी मत हे एससी, एसटी, ओबीसी आणि वंचित बहुजन आघाडीच्या मुस्लीम उमेदवारांनाच दिले पाहिजेत अशी भूमिका घेतली पाहिजे. ही भूमिका जर बजावली तरच ओबीसींचे उमेदवार निवडून येतील असेही आंबेडकर यांनी म्हटले आहे.

# अदृश्य शक्ती दिल्लीतून महाराष्ट्राला त्रास देत आहे : सुळे



✔ **पलूस :** सध्याच्या काळात दिल्लीच्या तख्ताविरोधात आपणा सर्वांची लढाई आहे. एक अदृश्य शक्ती दिल्लीतून त्रास देत आहे. धमक्या देतात. पण त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की, हा छत्रपतींचा महाराष्ट्र आहे, पुरोगामी महाराष्ट्र आहे. दडपशाही चालणार नाही, असे बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी ठणकावून सांगितले.

भाजपच्या जाहीरनाम्यामध्ये बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्ग आदींची माहिती दिलेली आहे. परंतु जनतेसाठी त्यांनी काय केलं हा प्रश्न आहे. सहा महिन्यात हजारो रेल्वे गाड्यांचे उद्घाटन केले. सामान्य जनता, शेतकरी वर्ग त्यातून प्रवास करणार आहे का? सर्वत्र लाडक्या बहिणीचा गाजावाजा चालू आहे. बहिणींच्या हाताला काम द्या. तुमचे पंधराशे रुपये नकोत. यासाठी महाविकास आघाडीची सत्ता आणायची आहे. छत्रपतींच्या महाराष्ट्रात स्वाभिमान जपण्यासाठी हे सरकार हटवलं पाहिजे. शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार आणण्याची आवश्यकता आहे. महागाई प्रचंड वाढली आहे. वरच्या खिशात पैसे घालतात आणि खालच्या खिशातून ते काढून घेतात, अशी आजची स्थिती आहे.

# तुमचं इंजिन आणि मनसे घेऊन बस की बाबा



## राष्ट्रवादी पवारांचीच म्हणणाऱ्या राज ठाकरेंना अजित पवारांचे उत्तर



✔ पुणे/प्रतिनिधी

मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार सभा सुरु केल्या आहेत. दरम्यान, या सभांमधून राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली होती. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवारांचाचं आहे, असं राज ठाकरे म्हणाले होते. आता उपमुख्यमंत्री अजित पवारांनी राज ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे. त्याला म्हणावं तुमचं इंजिन आणि मनसे घेऊन बस ना बाबा बाकीचं तुला काय करायचे आहे. आज लोकशाहीत बहुमताचा आदर केला जातो. पक्ष हा कुणाच्या एकट्याच्या मालकीचा नसतो असं पवार साहेब म्हटले होते. पुढे कुणी ना कुणी पक्ष चालवत असतं, असं अजित पवार म्हणाले आहेत.

अजित पवार म्हणाले, सदाभाऊ खोत यांच्या वक्तव्याचा मी तीव्र शब्दात निषेध केला आहे,त्याच ट्विट ही केलं आहे. त्यांना मी फोन केला होता, तुम्ही केलेले हे स्टेटमेंट आम्हाला कुणालाही आवडले नाही. तुम्ही हे बंद करा वैयक्तिक कुणाच्या विषयी बोलणं आपल्याच पद्धत नाही, असं मी त्यांना म्हणालो आहे. तुम्हाला जी भूमिका मांडायची आहे, ती मांडा. तुमची विचारधारा इतरांची विचारधारा वेगळ्या असू शकते. मतमतांतर असू शकतात. ताळमेळ ठेवून बोलला पाहिजे हा निंदनीय प्रकार आहे. विनाशकाली विपरीत बुद्धी सारखा प्रकार आहे.

### महाराष्ट्रातील मतदारांना फसवायला लागले आहेत

काही राजकीय लोक बनवाबनवी करायला लागले आहेत. महाराष्ट्रातील मतदारांना फसवायला लागले आहेत. आमच्या सरकारने ज्यावेळेस दीड हजार रुपये देण्याचा प्रयत्न केला त्यावेळी आमच्यावर टीका झाली. कशाचा कशाला वेळ नाही ही रक्कम फार मोठी वाढते आहे. धादांत खोटं आश्वासन दिल जात आहे. आमच्या योजनेवरच टीका करत होते, सगळ्या प्रकारची टीका केली पण आता तीन हजार रुपये इकडे चार हजार रुपये अजून काही मोफत आता आश्वासन दिली जातयत, बजेट संपवायचं काम आहे. सात लाख बजेट पैकी पाच लाख आता आश्वासनात संपवले आहेत, असंही अजित पवार यांनी नमूद केलं.

## 'बटेंगे तो कटेंगे'

# आदित्यनाथांच्या नाऱ्यावर अजितदादांनी सुनावले



✔ मुंबई/प्रतिनिधी

बटेंगे तो कटेंगे असा नारा देऊन महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हिंदू मतांचे ध्रवीकरण करण्याचा डाव भारतीय जनता पक्षाने आखलेला आहे. अनेक राजकीय नेते जाहीर सभांतील भाषणांमधून बटेंगे तो कटेंगे असे सांगून हिंदुत्वाचा गरज करणाऱ्या भाजपलाच मते दिली पाहिजेत, असा आग्रह धरत आहेत. यात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आघाडीवर आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने राज्यातील विविध भागांत जाऊन हिंदू मतांचे मजबुतीकरण करण्याची जबाबदारी ते यथायोग्य पार पाडत आहेत. दुसरीकडे त्यांच्या नाऱ्यावर विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेतलेली असताना महायुतीतील सहयोगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षानेही आक्षेप घेतलेला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेवर तीव्र आक्षेप नोंदवत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विविधतेचा दाखला देऊन इतर राज्यांशी तुलना करण्याचे संबंधित नेत्यांनी टाळावे, अशा शब्दात योगी आदित्यनाथ यांचे नाव न घेता त्यांना सुनावले आहे.

अजित पवार म्हणाले, महाराष्ट्र हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची विचारधारा मानणारा आहे. कृपा करून महाराष्ट्र आणि इतर राज्याची आपसात तुलना करू नका. इथल्या लोकांना हे अजिबात आवडत नाही. महाराष्ट्रातल्या लोकांनी सातत्याने इथे जातीय सलोखा ठेवण्याची भूमिका घेतलेली आहे, अशा शब्दात अजित पवार यांनी योगींना सुनावले आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची विचारधारा ही इथल्या अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदारांना सोबत घेऊन जाणारी आहे. बाहेरचे लोक येतात, ते त्यांचा विचार करून आलेले असतात. ते सभेत बोलून जातात. परंतु महाराष्ट्राने हे कदापि मान्य केलेले नाही. हा महाराष्ट्राच्या निवडणुकांचा आजपर्यंतचा इतिहास आहे, अशी आठवणही अजित पवार यांनी करून दिली आहे.

### हिंदू मतांचे ध्रुवीकरण, योगी आदित्यनाथांकडे जबाबदारी

लोकसभा निवडणुकांत मुस्लिम समाजाने मतांचे भरभरून दान महाविकास आघाडीच्या पारड्यात टाकले. त्यामुळे अनेक मतदारसंघात महायुतीला फटका बसला. अगदी महायुतीची ४२ जागांची गाडी १५ जागांवर आली. राज्यातल्या अनेक मतदारसंघात मुस्लिम मतांमुळे आघाडीचे उमेदवार जिंकल्याचे मतमोजणीनंतर स्पष्ट झाले. तेव्हापासून व्होट जिहाद झाला, असा प्रचार महायुती विशेषत: भारतीय जनता पक्ष करीत आहे. तेव्हापासून हिंदू मतांचे ध्रुवीकरण करण्याचा भाजपचा अजेंडा आहे. हीच जबाबदारी विधानसभा निवडणुकांत प्रखर हिंदुत्वाचे नायक अशी ओळख असणाऱ्या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर पक्षाने सोपवली आहे.

# महाराष्ट्रासह झारखंडमध्ये पैशांचा पाऊस आणि दारुचा महापूर!

**निवडणूक आयोग 'ॲक्शन मोड'वर**

**१४ राज्यांतील पोटनिवडणुकांमध्ये ५५८ कोटी रुपये रोख**

**मोफत वस्तू, दारूचा मोठा साठा, ड्रग्ज आणि मौल्यवान वस्तू जप्त**

**महाराष्ट्रातून २८० कोटी रुपये तर झारखंडमधून १५८ कोटी रुपये जप्त**

✔ नवी दिल्ली

महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुका तसेच पोटनिवडणुकांमध्ये मतदारांना प्रलोभन देण्याची प्रकरणे रोखण्याच्या उद्देशाने निवडणूक आयोगाच्या अखत्यारीतील यंत्रणांनी केलेल्या कारवाईत आत्तापर्यंत ५५८ कोटी रुपये मूल्यांची रोकड, मोफत वाटपासाठी आणलेल्या प्रलोभनपर वस्तू, मद्य, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू जप्त केले आहेत. निवडणुका जाहीर झाल्यापासून केवळ महाराष्ट्र राज्यात केलेल्या कारवाई अंतर्गत सुमारे २८० कोटी रुपये मूल्याचा माल जप्त केला गेला आहे. तर झारखंडमधूनही आतापर्यंत आणखी १५८ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात ७३.११ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे, तर ३७.९८ कोटी रुपयांची दारू आणि ३७.७६ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाने ९०.५३ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू आणि ४२.५५ कोटी रुपयांच्या मोफत वस्तू जप्त केल्या आहेत.

झारखंडमध्ये १०.४६ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ७.१५ कोटी रुपयांची दारू आणि ८.९९ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाने ४.२२ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू आणि १२७.८८ कोटी रुपयांच्या मोफत वस्तू जप्त केल्या आहेत.




मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी यापूर्वी सर्व अधिकाऱ्यांना निवडणुकीत कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनाबाबत आयोगाची झिरो टॉलरन्स' राखण्याचे निर्देश दिले होते. त्यांनी अनेक एजन्सींना अवैध दारू, ड्रग्ज, मोफत वस्तू आणि रोख रक्कम यांचे वितरण आणि हालचाली रोखण्यासाठी संयुक्त पथके तयार करण्यास सांगितले. नुकत्याच झालेल्या बैठकीत मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, उत्पादन शुल्क आयुक्त आणि अंमलबजावणी एजन्सी या दोन्ही निवडणुकांना तोंड देणारी राज्ये आणि त्यांच्या शेजारची राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, राजीव कुमार यांनी आंतरराज्यीय सीमेवरील हालचालींवर कडक नजर ठेवण्यावर भर दिला आहे.

दोन्ही राज्यांमध्ये यंदा होत असलेल्या निवडणुकांमध्ये २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत एकत्रित जप्तीचे प्रमाण ३.५ पटीने वाढले आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात १०३.६१ कोटी रुपये मूल्याचा मुद्देमाल तर झारखंडमध्ये १८.७६ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला होता.

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाकेंची गाडी फोडली

पोचोरा : कंधार तालुक्यातील पाचोरा गावाजवळ ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके (ड्ढुरप क्रड्ढश) यांच्या गाडी फोडण्यात आली आहे. ओबीसी उमेदवाराच्या प्रचाराला जात असताना १५० तरुणांनी आमच्या गाडीवर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचा आरोपही हाके यांनी केला आहे.

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके हे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मराठवाड्यात आले होते. ते कंधार तालुक्यातील पाचोरा गावातून जात असतानाच त्यांची गाडी फोडल्याची घटना घडली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नवा वाद पेटण्याची शक्यता आहे. हाके या घटनेनंतर चांगलेच आक्रमक झाले असून त्यांनी रस्त्यावरच ठिय्या मांडला आहे. जोपर्यंत हल्लेखोरांना पकडण्यात येत नाही, तोवर येथून हटणार नाही अशी भूमिका ओबीसी बांधवांनी घेतली आहे. याबाबत आंदोलक लक्ष्मण हाके यांनी साम वृत्तवाहिनीला पहिली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले,आम्ही ओबीसी उमेदवाराच्या प्रचारार्थ येथे आलो असतानाच आमच्या गाडीवर तोंडावर पांढरे कपडे बांधून दीडशे तरुणांनी हल्ला केला. हा भ्याड हल्ला आहे.यावेळी हल्लेखोरांनी एक मराठा,लाख मराठा अशा घोषणा दिल्याचंही हाकेंनी म्हटलं आहे. कंधार पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल करणार आहे. पोलिसांनी या घटनेची नि: पक्षपातीपणे चौकशी करावी अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच दोषींवर कारवाई करण्यात येत नाही, तोपर्यंत कंधार पोलिस स्टेशनमध्ये ठिय्या मांडणार असल्याचा इशाराही हाके यांनी दिला आहे.



# संजयमामांच्या पदयात्रेवर गावोगावी पुष्पवृष्टी

## पोफळजच्या रामचंद्र पवारांचा शिंदे गटात प्रवेश

कन्हेरगाव/प्रतिनिधी

आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे व मकाई सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रामभाऊ पवार यांनी गुरुवारी रोजी पोफळज तालुका करमाळा येथील जाहीर सभेच्या कार्यक्रमात आमदार संजयमामा शिंदे यांच्या गटात प्रवेश केला. यावेळी आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. आमदार संजय मामा शिंदे यांनी गुरुवारी प्रचार दौऱ्यादरम्यान पोफळज, उमरड, रिटेवाडी, मांजरगाव, उंदरगाव, सोगांव पश्चिम, दिवेगव्हाण, पारेवाडी व केत्तूर नं २ या ठिकाणी जाऊन मतदारांशी संवाद साधला.

### नरड्यावर सुरी ठेवली तरी मी मामांच्या गटातच राहणार

जेऊर-चिकलठाण-कुगांव या १६ किलोमीटरच्या रस्त्यासाठी १६ कोटी रुपये मंजूर करून एक महिन्यात रस्ता पूर्ण केल्यामुळे तसेच कुगांव ते शिरसोडी या नदीवरच्या पुलासाठी २८४ कोटी निधी मंजूर करून सदर कामाचे भूमिपूजन करून काम चालू झालेले आहे. त्यामुळे आमच्या भागातील शेतकरीवर्ग मामांच्या कार्यपद्धतीवर खुश आहे. करमाळा तालुका सुजलाम सुफलाम करण्यासाठी आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाची खऱ्या अर्थाने तालुक्याला गरज आहे. माझ्याविषयी मतदारसंघात उलट सुलट चर्चा सुरू होती, परंतु मला कापले तरी मी आमदार शिंदे यांचा गट सोडून कुठेही जाणार नाही. मामांना परत एकदा निवडून आणण्यासाठी जिवाचं रान करून चिखलठाण परिसरातून मोठं मताधिक्य मिळवून देणार असुन तालुक्यातील मतदारांनी सुध्दा आपले मत वाया न जाऊ देता सफरचंदाच्या चिन्हावर मतदान करावे व आपला तालुका बागायत करण्यासाठी आपले योगदान द्यावे.

– चंद्रकांत सरडे, माजी जि.प.सदस्य, चिखलठाण, मा.व्हा. चेअरमन, आदिनाथ स.साखर कारखाना, शेलगांव भाळवणी.


करमाळा : रामचंद्र पवार यांच्यासह त्यांच्या समर्थकांचे शिंदे गटात स्वागत करताना आमदार संजयमामा शिंदे.

आमदार संजयमामा शिंदे यांच्या प्रचार दौऱ्यास मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसले. प्रचार दौऱ्यादरम्यान गावागावात वाजत गाजत पदयात्रा काढून फुलांच्या पुष्पवृष्टीत आमदार शिंदे यांचे स्वागत झाले. यावेळी जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, महाराष्ट्र केसरी चंद्रहास निमगिरे, आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन वामनराव बदे, माजी पंचायत समिती सदस्य विलास पाटील, शिवव्याख्याते हर्षल बागल,पोफळज सोसायटीचे चेअरमन राजेंद्र पवार, कन्हेरगांवचे धनंजय मोरे, मानसिंग खंडागळे, पांडुरंग शिंदे, श्यामराव गव्हाणे, भाऊसाहेब हजारे, रवींद्र हजारे, बिभीषन गव्हाणे, दादा पवार, संजय पवार, प्रशांत पवार, नागनाथ निंबाळकर, तरटगांवचे अजिंक्य पाटील, स्वप्निल पाडोळे, मनोहर पोळ, प्रीतम शिंदे, दादा गव्हाणे, तात्या पाटील, नाना शिंदे, शंकर शिंदे, काका गुंड, सुनील शिंदे, जाफर मुलाणी, गणपत शिंदे, गजानन पवार, गौतम काळे, महेंद्र कांबळे, दादा हाके, आप्पा हजारे, विजय पवार, कुंडलिक रगडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अक्कलकोट तालुक्याचा कायापालट करण्यासाठी पुन्हा संधी द्या

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे आवाहन

अक्कलकोट/प्रतिनिधी

आपले सरकार काम करणारे, विकास करणारे आहे. रस्ते, पाणी आदी मुलभूत सेवासुविधा पुरवताना कोट्यवधी रूपयाची विकासकामे या तालुक्यात केली आहेत. तीर्थक्षेत्र विकास आराखडा, लाडकी बहिणसह विविध योजना, मल्लिकार्जुन मंदिराचा जीर्णोद्धार, बसस्थानकाचे पुनर्निर्माण, देगांव एक्सप्रेस कॅनालचा प्रकल्प आदी विकासकामे सुरू आहेत. तालुक्याचा कायापालट करण्यासाठी राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणण्यासाठी मतदान करा, अशी विनंती आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.


अक्कलकोट : प्रचारा दरम्यान ग्रामस्थांशी संवाद साधताना आ. सचिन कल्याणशेट्टी.

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात ग्रामीण भागात महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांना प्रतिसाद मिळत असुन जागोजागी औक्षण करुन स्वागत केले जात आहे. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील मोट्याळ, बणजगोळ, सुलतानपूर, गौडगाव खु., सिंदखेड, ममदाबाद आदी गावात गुरूवारी गावभेट दौरा अक्कलकोट विधानसभेचे महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रचारार्थ आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांशी संवाद साधत विविध विषयांवर चर्चा करताना ते बोलत होते.

याप्रसंगी ग्रामस्थांनी उत्साहाने महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांचे स्वागत केले. या गावात अंगणवाडी दुरुस्ती, सिंदखेड ते मोट्याळ, भीम नगर रस्ता सुधारणा, बणजगोळ रस्ता, सभामंडप, बंदिस्त गटार, अंतर्गत सिमेंट रस्ते, जलजीवन मिशन, संरक्षक भिंत आदी विविध कामे गावासाठी केल्याची माहिती दिली. सुलतानपूर ते निलेगांव शिवपर्यंत पाणंद रस्ता, यादव शेत ते बोकडे शेतापर्यंत पाणंद रस्ता, किडे सुलतानपूर रस्त्यावरील बोरी नदीवर पूल बांधकाम, सुलतानपूर ते योगी पाटील ते जोडणारा रस्ता सुधारणा ह्या कामांना मंजुरी मिळालेली आहे याबद्दल त्यांनी माहिती दिली. यावेळी मोतीराम राठोड, आविनाश मडिखांबे, कार्तिक पाटील, शिवाजी साळुंखे, राजेंद्र बंदीछोडे, उमेश पाटील, महेश मुळे, रवी राठोड, मल्लिकार्जुन स्वामी, नागनाथ बिराजदार, रेवणसिद्ध बिराजदार, रमेश बावकर, शंकर घोडके, तेजू बिराजदार, सिध्दाराम बाके, गुलचंद मोरे, महावीर मोरे, बसवराज निंबाळे, महेश बिराजदार, भाजप- महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## देवेंद्र कोठे यांचा विजय निश्चित; मताधिक्याची उत्सुकता

### निर्धार मेळाव्यात अनुप मोरे यांचे प्रतिपादन



सोलापूर : निर्धार मेळाव्यात अनुप मोरे यांचा सत्कार करताना भाजपाचे पदाधिकारी.

सोलापूर/प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी महायुतीला सोलापुरात मतदार बंधू-भगिनींचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे शहर मध्य विधानसभेत यंदा देवेंद्र कोठे यांचा विजय निश्चित असून फक्त लीड किती याचीच आतुरता आम्हाला लागली आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी केले.

भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी उपलप मंगल कार्यालयात शहर मध्य विधानसभा युवा मोर्चावतीने निर्धार मेळावा पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर भाजयुमो प्रदेश सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, वृषाली चालुक्य, अक्षय अंजिखाने, अनिकेत हारपुडे, सागर कोटला, विश्वनाथ प्याटी, रोहन मराठे, गणेश साखरे, विजय कुलथे, शिवा कावडे, सुनील साळुंखे, बसवराज गंदगे, शिवा कामाठी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी वडार समाजाचे युवक अध्यक्ष सुनील साळुंखे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत देवेंद्र कोठे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा संकल्प जाहीर केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजयुमो प्रदेश सचिव अक्षय अंजिखाने यांनी केले. आभार युवा मोर्चाचे मंडल अध्यक्ष विश्वनाथ प्याटी व रोहन मराठे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओंकार होमकर, अनिल अंजनालकर, अनिल वंगारी, उदयराज गुल्लापल्ली यांच्या शहर मध्य विधानसभेतील युवा मोर्चा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## संतोष पवार यांच्या प्रचारार्थ डॉ. आंबेडकर यांची शनिवारी सभा

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

दक्षिण विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. बाळासाहेब आंबेडकर यांची सभा ९ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता नेहरू नगरजवळील डीएड कॉलेज येथे होणार आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे यांनी दिली. डॉ. आंबेडकर यांची पश्चिम महाराष्ट्रातच पहिला सभा सोलापूर येथे होणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील तमाम नागरिकांनी या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचितकडून करण्यात आले आहे. सध्या विविध मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठका, सभा, पदयात्रा, गावभेट दौरा आदींचे आयोजन केले जात





आहे. वंचित आघाडीच्या प्रचाराला मतदारांकडून प्रतिसाद मिळत आहे. राज्य सरकारने खोटी आश्वासने देऊन मतदारांची दिशाभूल केली जात आहे.

सध्या राज्यात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे नेते एकमेकांमध्ये भांडत आहेत.

राज्यात स्थिर सरकार येण्यासाठी वंचित आघाडीशिवाय पर्याय नाही, असे मडिखांबे यांनी सांगितले. शनिवारी होणाऱ्या सभेस कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अक्कलकोट शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, जिल्हा महासचिव अनिरूद्ध वायमारे, विनोद इंगळे यांनी केले आहे.

## महाविकास आघाडीचा जाहीरनामा कॉपीपेस्ट : मुख्यमंत्र्यांनी डागली तोफ

नागपूर : महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेला विरोध करणारे, बंद पाडण्यासाठी कोर्टात जाणारे आता आम्ही चार हजार देतो, असे सांगू लागले आहेत. या सर्व थापा आहेत. महाविकास आघाडीचा जाहीरनामा कॉपीपेस्ट असून आम्ही सुरू केलेल्या योजना त्यांनी ढापल्या असल्याचा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

ज्यांनी तुमच्या योजनेत खोडा घातला त्यांना निवडणुकीत जोडा दाखवा, असे आवाहन करून मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर तोफ डागली. मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी महायुतीच्या उमेदवारासाठी विदर्भात प्रचारसभा घेतल्या. यात नागपूर, देवलापार, भंडाराचा समावेश होता. आपल्या भाषणात त्यांनी दिवाळीचे फटाके राखून ठेवा, २३ तारखेला विजयाचे फटाके फोडायला कामी येतील, असे आवाहन केले. काल महाविकास आघाडीने जाहीनाम्याचा माध्यमातून पंचसूत्री दिल्याचे ऐकले. मात्र ती थापासुत्री आहे. त्यातही आमच्याच सर्व योजना ढापण्यात आल्या आहेत. आम्ही लाडक्या बहिणींला १५०० रुपये देत आहोत. आतापर्यंत पाच हप्ते माझ्या बहिणींच्या खात्यात जमा केले आहे. आमचे सरकार देणारे आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




जिंकलो तर माझ्यामुळे,
हरलो तर त्यांच्यामुळे..!

कल्याण
348-52-147
मुंबई
299-06-123

## दोन देशमुखांच्या भांडणात सोलापूरचा विकास खुंटला : आ. रोहित पवार यांची टीका

### महेश कोठेंन मोठ्या मताधिक्यांनी विजयी करण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरच्या विकासासाठी जनतेने शहरात दोन आमदार निवडून दिले. या देशमुख आमदारांनी पक्षात राहून भांडणे केली. एकमेकांच्या प्रस्तवास काड्या लावल्या. भांडणे करणाऱ्या आमदारांना देवेंद्र फडणवीस यांना शांत करता आले नाही. त्यामुळे अनेक विकासाच्या योजना रखडल्या. त्यामुळे शहर भकास झाले आहे, अशी टीका आमदार रोहित पवार यांनी केली.

#### मतदारांनी जागरूक होऊन मतदान करावे : कोठे

माझे विरोधक हे गेली २० वर्षे आमदार आहेत. कामे फक्त कागदावरच पूर्ण झाली आहेत. आता येथील मतदारांना बदल हवा असून भरघोस मते माझ्या पदरात पाडतील. स्मार्ट सिटीच्या नावाखाली पैसा हडप करण्यात आला आहे. प्रत्येक योजनेत भ्रष्टाचार केला आहे. नगरसेवकांचा निधी पळवला असून तेदेखील नाराज आहेत. त्यामुळे आता मतदारांना जागरूक होऊन तुतारीला मतदान करावे, असे उमेदवार महेश कोठे म्हणाले.

#### कोण काय म्हणाले

- मतदार महेश आण्णांना लाखो मतांनी विजयी करतील : चेतन नरोटे
- कोठे मतदारसंघातील प्रश्न सोडवतील : महेश गादेकर
- महेश कोठे भरघोस मतांनी विजयी होतील : सुधीर खरटमल

शहर उत्तर विधानसभा मतदार संघाचे पवार गटाचे उमेदवार महेश कोठे यांच्या प्रचारार्थ पत्रा तालीम येथे आयोजित जाहीर सभेत आ. पवार बोलत होते. यावेळी शहराध्यक्ष सुधीर खरटमल, महेश गादेकर, मनोहर सपाटे, चेतन नरोटे, नाना काळे, राजू सुपाते, सुनीता रोटे, भारत जाधव, विनोद भोसले, जर्नाधन कारमपुरी, माजी महापौर नलिनी चंदेले, अक्षय वाकसे, प्रतीक्षा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन देशमुखांनी सत्तेत असताना पालकमंत्री, वस्त्रोद्योग मंत्री,परिवहन मंत्री, सहकारमंत्री अशी अनेक पदे भोगली. मात्र त्याचा काही उपयोग करता आला नाही. आता मात्र यांना जागा दाखवायची आहे.सोलापूर शहरातील युवकांच्या हाताला काम आघाडीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. राज्यामधून आघाडीचे १८० हुन अधिक आमदार होतील आणि त्यामध्ये महेश कोठे, चेतन नरोटे असतील हे असतील, असे आ. पवार म्हणाले.



सोलापूर : पत्रा तालीम येथे आयोजित सभेत बोलताना आ. रोहित पवार.

# कर्नाटकनंतर आपलाच नंबर

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांवर आश्वासनांची खैरात करण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात सध्या स्पर्धा लागली आहे. महायुतीने महिलांना दरमहा २१०० रुपये तर महाविकास आघाडीने तीन हजार रुपयांचे आश्वासन दिले आहे. या स्पर्धेत मतदारांना आपलेसे करण्याकरिता विविध आश्वासने वा प्रलोभने दाखविली जात असली तरी या आश्वासनांची पूर्तता करण्याची राज्याच्या तिजोरीची क्षमता आहे का, याचा विचार उभय बाजूने केलेला दिसत नाही. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात मतदारांना आश्वासने देण्याची दोन्ही बाजूने स्पर्धा लागली आहे. महायुतीने दशसूत्रीच्या माध्यमातून विविध समाज घटकांना खुश करण्यावर भर दिला आहे. महाविकास आघाडीने पंचसूत्रीच्या माध्यमातून शेतकरी, महिला, युवक, युवतींना खुश करण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांना दरमहा तीन हजार रुपये आणि राज्यभर मोफत बस प्रवास, शेतकऱ्यांचे तीन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी, जातनिहाय जनगणना व ५० टक्के आरक्षणाची मर्यादा हटविणे, २५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य विमा व मोफत औषधे, बेरोजगार तरुणांना दरमहा चार हजार रुपयांची मदत अशी पाच कलमी आश्वासनांची गॅरंटी काँग्रेसच्या पक्षाच्या पुढाकाराने महाविकास आघाडीच्यावतीने राज्यातील मतदारांना देण्यात आली. महायुतीने लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये, २५ हजार महिलांचा पोलीस दलात भरती, शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकरी सन्मान योजनेतून १२ हजारांवरून १५ हजार रुपये, वृद्धांना २१०० रुपये निवृत्ती वेतन, जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवणे, १० हजार विद्यावेतन, ४५ हजार गावांमध्ये रस्ते बांधणार, अंगणवाडी आणि आशासेविकांना दरमहा १५ हजार रुपये, सौर उर्जेला प्राधान्य त्यातून वीज बिलात कपात अशी विविध आश्वासने देण्यात आली आहे.



महायुतीने लाडक्या बहिणींना १५०० रुपयांवरून २१०० रुपये प्रत्येक महिन्याला देण्याचे आश्वासन दिले आहे. महाविकास आघाडीने तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. महायुतीपेक्षा महाविकास आघाडीने ९०० रुपये दरमहा अधिक देण्याचे आश्वासन दिले आहे. कर्नाटक आणि तेलंगणाप्रमाणेच महालक्ष्मी योजनेत महिला व युवतींना राज्यभर मोफत प्रवासाचे आश्वासन देण्यात आले आहे. महाविकास आघाडीने शेतकऱ्यांचे तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले आहे. महायुतीने शेतकऱ्यांची कर्जमाफी असा उल्लेख केला असला तरी मर्यादा मात्र दिलेली नाही. आरोग्यावर महाविकास आघाडीच्या पंचसूत्रीत समावेश आहे. पण महायुतीने आरोग्यावर काहीही आश्वासन दिलेले नाही. जातनिहाय जनगणना आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देऊन राहुल गांधी यांनी लोकसभेप्रमाणेच दलित समाज महाविकास आघाडीच्या पाठीशी उभा राहील या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. महायुती व महाविकास आघाडीची आश्वासने जाहीर झाली आहेत. मतदार आता कोणाला पसंती देतात हे २३ तारखेला स्पष्ट होईल. त्यानंतर जे सत्तेवर येतील, त्यांना मात्र दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावीच लागेल. आश्वासने पूर्ण करायची झाल्यास पैसा तर लागणार. तो आणणार कोठून? सगळी सोंगे करता येतात पण पैशाचे सोंग करताच येत नाही, अशी एक म्हण असली तरी सत्ताधाऱ्यांना त्याची फिकिर नसते. कर्ज काढू पण सत्ता चालवू, असा सत्ताधाऱ्यांचा खाक्या असतो. कर्ज काढल्यानंतर ते फेडण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांचीच असते. मग ते काय. त्यासाठी ते त्यांच्या घरचा पैसा आणतील काय. नाही. जनतेच्या माथी महागाई मारून पैसा वसूल करतील. राज्यावर ७ लाख कोटींचे कर्ज आहे. ते कसे फेडायचे. याविषयी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात गांभिर्याने चर्चाच नसते. सत्तेची वाट 'दे दान सुटे गिरान' या मार्गाकडे चालली आहे. साधनशूचिता सांगणारा भाजप हा पक्ष देखील गटार गंगेत न्हावू लागला आहे, याचे वैषम्य वाटते. तुम्ही खाता ना. मग आम्हीही खातो.हाच सरळसोट धंदा सत्ताधारी आणि विरोधकांचा चालला आहे.लोकांना पैसे वाटत राहाणार असाल तर प्रकल्पांना पैसा कोठून आणणार. हा प्रश्न निरूत्तर आहे. कर्नाटकची आज काय अवस्था आहे. त्या राज्याचे वास्तव डोळ्यापुढे ठेवण्याची गरज आहे. सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेसने तिथे अशीच वारेमाप फुकटची आश्वासने दिली. आज त्या राज्याच्या तिजोरी खडखडाट आहे. वास्तव पाहून आश्वासने द्या, अशी सांगण्याची वेळ मल्लिकार्जून खरगे यांच्यावर आली. कर्नाटकनंतर महाराष्ट्राचाच नंबर लागेल, हे मराठी माणसाने विसरता कामा नये.

---

निवडणूक स्पेशल (भाग-१५)



# माहेर दिवाळखोरीत गेलेले बहिणींना आवडेल?

**श्रीनिवास वैद्य, सोलापूर**

**समाजात संवेदनशील कोण असेल तर फक्त महिला असतात. एकाच वेळेस सासर आणि माहेरची इभ्रत सांभाळणाऱ्या महिला आपल्या वागणुकीतून समंजसपणा दाखवून देत असतात. सासरची पत त्या सांभाळत असतातच. याबरोबर त्यांना काळजी असती ते आपल्या माहेरच्या मंडळींना कोणी नावे ठेवू नये याची. माहेरच्या लोकांकडून त्यांना हवे असते ते फक्त प्रेम आणि आपलेपणा. त्या सासरी कितीही सुखात असल्या, तरी माहेरचा ओलावा कधीच कमी होत नाही. बहीण म्हणून जे प्रेम त्यांना भावाकडून मिळते, ती माहेरची पुंजी त्यांच्यासाठी खूप मौल्यवान असते. आई-वडिलांनी लग्नात दिलेले स्त्रीधन ही त्यांच्या आयुष्याची सोबती असते. भाऊ-भावजयाकडून अपेक्षा असते ते फक्त चोळी बांगडी याची आणि आपुलकीने चौकशी करण्याची. काही क्षण माहेरी जाऊन सुखा समाधानाने राहता यावेत याची.**

सध्या महाराष्ट्रात लाडक्या बहिणींचा बोलबाला चालू आहे. महाराष्ट्रातील राजकिय भावांना समाजातील सर्वसामान्य बहिणींची खूपच आठवण यायला लागलेली आहे. त्यांच्यावरचे प्रेम उतू चालले आहे, असे म्हटले तरी ते अतिशयोक्तिचे होणार नाही. निवडणुकित हेच बहीण भाऊ एकमेकांचे विरोधात उभे ठाकतील. वेगवेगळ्या राजकिय पक्षातून उमेदवारी मिळवून आपला मतलब साधण्याचा प्रयत्न करतील. हे आजच्या राजकारणातील खरे वास्तव आहे. या पार्श्वभूमीवर 'लाडकि बहीण' या नावाने जो धुमाकूळ घातला जात आहे, तो चीड निर्माण करणार आहे. राजकिय स्वार्थासाठी कोण, कोणते नाते, कधी वापरेल हे आता सांगता येणारे नाही. नात्यातील आर्थिक भेट ही कोणत्या योजनेखाली कधीच दिली जात नसते. ती दिली जात असते सणावाराला, वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने. आर्थिक स्वरूपातील ही भेट देत असताना संबंधिताला पैशाची नियोजन करावे लागते. संसारातील आर्थिक व्यवहाराची घडी विस्कटणार तर नाही ना याची काळजी घ्यावी लागते. उठ कि सूट मनात आले म्हणून कोणी कोणाला पैसे देत नाही. आपल्या स्वतःच्या खिशातले तर नाहीच नाही. सख्खा भाऊ सख्ख्या भावाला देत नाही, सखी बहीण सख्या बहिणीला देत नाही. नवरा बायकोला, आई वडील मुलांना आणि नव्या जगातील मुले-मुली सुद्धा आई-वडिलांना कोणतेही कारण असल्याशिवाय पैसे देत नाहीत. पैसा जोडणारा आहे, पैसा तोडणारा आहे. म्हणून नात्यातील आर्थिक व्यवहार जपून करावेत अशी पूर्वीची मंडळी सांगत होती. नाते कसे सांभाळावे यासाठीची ही शिकवण होती. आमच्या वडिलांची एक पद्धत होती. मुलगी, नात, सून, लहान असू दे नाहीतर मोठी असू दे वयाचा कधी त्यांनी विचार केला नाही. दरवर्षी त्यांना ते दहा रुपये द्यायचे. आम्ही त्यांना रागवायचो. मुली आता मोठ्या झालेल्या आहेत, सुना आता आपल्या झालेल्या आहेत, त्यांना एवढ्या छोट्या रकमा देत जाऊ नका. तेव्हा ते सांगायचे जे शेवटला जाईल तेच देत जावे. आज दहा रुपये दिले, उद्या शंभर रुपये दिले, परत पन्नास रुपये दिले, मग पाच रुपये दिले अशी जर का तुमच्या देण्यात चढ-उतार होत असेल तर ते शहाणपणाचे नाही, असे ते सांगत असत. जे काही कराल त्यात सातत्य ठेवा, ही त्यामागील शिकवण होती.

काही राज्यातून लाडक्या बहीण योजनेसारख्या योजना निवडणूक काळात प्रस्तावित केल्या गेल्या. काही काळ त्या राबवल्या गेल्या. यातून ज्या तथाकथित बहिणींना पैसे मिळाले, त्यांनी आंधळेपणाने भावांना मते दिली. भाऊ सत्ताधीश झाले आणि परत बहिणीला विसरून गेले. राजकारणात हे असेच चालते. सध्या महाराष्ट्रात लाडक्या बहिणीच्या नावाने जो राजकिय धुमाकूळ घातला जात आहे तो मान्य नाही. भावाने बहिणीला जे काही द्यायचे असते, ते स्वतःच्या कमाईतून द्यायचे असते. स्वतः कष्टाने मिळवलेल्या पैशातून द्यायचे असते. आपण बहिणीला काही देत असताना, आपल्या कुटुंबाची, आपल्या वाडवडिलांच्या इस्टेटीची काळजी घ्यायची असते. आपण आणि आपले वाडवडील या व अशा देण्याने दिवाळखोरीत तर जाणार नाहीत ना याची काळजी घ्यायची असते. वाडवडिलांची मालमत्ता सांभाळायची असते आणि जपून वापरायची असते. सध्याचे राजकिय भाऊ, लाडक्या बहिणीच्या प्रेमाच्या नावाखाली भरकटत चालले आहेत. यात खरे प्रेम नाही. हे पंधराशे रुपये घेणाऱ्या बहिणींना कळते. पण लाडकि बहीण या दोन शब्दाच्या प्रेमात या बहिणी हे





पैसे घेत आहेत. कोणी बहीण म्हणले कि समोरच्याला भावाचे प्रेम द्यायचे एवढेच बहिणीला माहीत असते. पण जर भाऊ आपल्या माहेरची मालमत्ता उधळत आहे, असे तिला कळले तर ती या पैशाला हातही लावणार नाही. भावाकडून मिळणाऱ्या पैशाने जर माहेर दिवाळीखोरीत जाणार असेल, माहेरची आर्थिक घडी विस्कटणार असेल तर ते कोणत्याच बहिणीला आवडणार नाही.

महाराष्ट्रातील राजकारणात सध्या हेच चालू आहे. सुमारे चाळीस लाख कोटींपेक्षा अधिक रुपयाचे कर्ज महाराष्ट्र राज्याच्या डोक्यावर आहे. अनेक योजनांना द्यायला पैसे नाही आहेत. अनेक कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत होत नाही आहेत. अनेक ठिकाणी दिवाळी बोनसचे पैसेही न मिळाल्याच्या बातम्या येत आहेत. अशा परिस्थितीत लाडक्या बहिणी योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपये वाटले जात आहेत. वाटले कसले उधळले जात आहेत असे म्हणायला हवे. अगोदर एक भाऊ म्हणतो पंधराशे रुपये, आता एकशेवीस रुपये, तर सावत्र भाऊ म्हणतो तीन हजार रुपये, चार हजार रुपये. लिलावात जशी बोली बोलली जाते ना तशा लाडक्या बहिणीच्या प्रेमाची बोली बोलली जात आहे. मतासाठी बहिणीच्या प्रेमाला निवडणुकिच्या बाजारात विकले जात आहे. खरे तर राजकिय निर्लज्जतेचा कळस यापेक्षा याचे वेगळे वर्णन होऊ शकत नाही. पण बोलणार कोण. सारेच आंधळे झाले आहेत, सत्ताधीश होण्यासाठी. तुम्हाला लाडकि बहीण म्हणून संबोधले जात आहे. पण आपण आपल्या लाडक्या बहिणीचे लाडके भाऊ आहोत का नाही याची खातर जमा करण्याची भावाला आवश्यकता वाटत नाही यासारखे बहिणीचे दुर्दैव ते कुठले? एक लक्षात ठेवा, तुम्हाला लाडकि बहीण म्हणणारा एकही भाऊ स्वतःच्या खिशातून दीड दमडी तुम्हाला देणार नाही. तो आपल्या राज्याच्या तिजोरीतील पैसे तुमच्या नावाने उधळण्याचे काम तो करत आहे. त्या बदल्यात पुढील पाच वर्षासाठी सत्ता उपभोगणे हे त्याचे स्वप्न आहे. त्यासाठी ही उधळपट्टी चालू आहे.

बहिणींनो खरे सांगा. माहेर कर्जबाजारी झालेले तुम्हाला चालेल का? या कर्ज बाजारापोटी उद्या आपल्या माहेराला कोठे गहाण ठेवण्याची वेळ आली तर तुम्हाला चालेल का? आपले माहेर दिवाळखोरीत गेलेले तुम्हाला आवडेल का? सरकार म्हणजे आपले मायबाप. दुसरे माहेरच. त्याची प्रतिष्ठा ठेवायची जेवढी जबाबदारी हे राज्य सांभाळणाऱ्या तुमच्या भावांनो ती आहे, तेवढीच किंबहुना त्याहून अधिक जबाबदारी त्याकडे तुमचे लक्ष देण्याची आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक तिजोरीचीही लूटमार आहे हे लक्षात घ्या. उद्या महाराष्ट्राची आर्थिक घडी विस्कटली तर त्या पापाचे धनी तुम्हीही होताल हे विसरू नका. बहिणींनो!, तुमचा एक उत्तम मित्र या भूमिकेतून तुम्हाला जागे करण्यासाठी मी आलो आहे. अर्थातच निर्णय तुमचा आहे. जेव्हा तुमचे माहेर म्हणजेच मायबाप सरकार, म्हणजेच महाराष्ट्र राज्य, याची आर्थिक घडी विस्कटून जाईल तेंव्हा त्याचा परिणाम थेट माझ्यावर पण होणार आहे. त्याला कारण राजकिय पुढाऱ्यांची उधळपट्टी हे जसे असणार आहे, तसेच त्याला लावलेला तुमचा हातभार हेही कारण असणार आहे, हे विसरू नका. जागे करायचे काम मी केले आहे. सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून तुम्ही निर्णय घ्या.

---

टुडेज् ब्लॉग

# शिक्षित मध्यम वर्ग : मतदान करा

देशात लोकशाहीला सदृढ करण्यासाठी मतदान करणे आवश्यक आहे. जर एक मोठा वर्ग मतदानापासून दूर राहील, तर त्यांना नको असलेले अयोग्य व्यक्ति ही सत्तेवर येतील. पण शिक्षित मध्यम वर्ग मतदान करण्यात सर्वात जास्त आळशी आहे. मतदान न करण्यासाठी त्याच्यापाशी शेकडो बहाणे आहेत.

माझे एक परिचित मित्र निवृत्त झाल्यावर १०० घरांच्या एका ग्रुप हाउसिंग सोसायटीमध्ये अध्यक्ष झाले. लोकसभा निवडणुकीपूर्वी दोन कि तीन महिने आधी ते एका कामासाठी स्थानीय कॉर्पोरेटरकडे गेले होते. कॉर्पोरेटर बोलता-बोलता त्यांना म्हणाला तुमच्या सोसायटीतले लोक मतदान करत नाही. आज ईव्हीएम असल्याने प्रत्येक बूथ वर किती मतदान झाले हे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना माहीत असते. बूथमध्ये बसलेल्या पोलिंग एजेंट जवळ मतदाता यादी असते. त्या यादीत मतदान करणाऱ्यांची पूर्ण माहिती असते. त्याच्या मतदान यादीचा उपयोग प्रत्येक पार्टी पुढील निवडणुकिसाठी रणनीति तयार करण्यासाठी वापरते. याशिवाय आपले मतदाता कोण आहे, कोणत्या भागातील समस्या सर्वात आधी दूर करणे गरजेचे, हेही ठरविता येते.

या सोसायटीत सरकारी नोकरीतून निवृत्त पेन्शन भोगी, सरकारी कंपन्यांमध्ये काम करणारे, मोठ्या पदांवर असणारे, डॉक्टर, इंजिनिअर, उद्योगपती आणि काही दुकानदार ही राहतात. सर्वच किमान स्नातक आणि अधिक शिक्षित आहेत. अध्यक्षही १९९० पासून तिथेच राहत होते.

येत्या लोकसभेच्या निवडणुकित आपल्या सोसायटीतून किमान ७०% टक्के मतदान झाले पाहिजे, हे मॅनेजिंग कमिटीने ठरविले. महिनाभर आधी मतदान यादी ऑनलाइन तपासली. सर्वांची नावे होती. पण २९० पैकी ५० तरुण मतदाता शिकून रोजगारसाठी पुणे, बंगलोर, हैदराबाद, मुंबई इत्यादी ठिकाणी स्थायी झाले होते. त्यांची नावे



अजूनही इथल्या यादीत होती. काही तर दहा-पंधरा वर्षांपासून बाहेर असून ही त्यांनी तिथल्या मतदान यादीत नाव टाकले नव्हते. अध्यक्षांनी सर्वांच्या घरी जाऊन आणि फोन करून त्यांना इथल्या यादीतून नाव कापून, राहत्या जागी मतदान यादीत नावे टाकण्याची विनंती केली. दिल्लीत येऊन मतदान करण्याची ही विनंती केली. दिल्लीच्या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे प्रचार साहित्यही प्रत्येक फ्लॅटमध्ये वाटू दिले. निवडणुकीच्या दिवशीही सोसायटीच्या सर्वांना मतदान करण्याची अनेक वेळा विनंती केली.

अध्यक्षांना वाटत होते यावेळी मतदान भरपूर होईल पण सोसायटीच्या उपस्थित २४० पैकी फक्त ९० मतदारांनी मतदान केले. बाहेर राहणाऱ्यांनी तर नाव कापले, न दिल्लीत येऊन मतदान केले. मतदानाच्या एक दिवस आधी दहा ते पंधरा परिवार दिल्लीतून बाहेर गेले. त्यांना सुट्टीचा उपयोग मौज मस्तीसाठी करणे जास्ती योग्य वाटले. काहींच्या मते, मी निवृत्त झालो तरीही मला पेन्शनवर आयकर भरावा लागतो. तिकडे सरकार फ्री बी वाटते. कुणीही आले तरी हे बंद होणार नाही. मतदान करून फायदा काय? आम्हाला धंद्यासाठी अनेक सरकारी बाबूंना रिश्वत द्यावी लागते. मतदान करण्याचा आम्हाला काहीही फायदा नाही. सर्वच चोर आहेत, म्हणून आम्ही मतदान करणार नाही, इत्यादी इत्यादी. ही कथा एका सोसायटीची नाही तर दिल्ली, नोयडा ठिकाणच्या जवळपास सर्वच सोसायटींची आहे.

महाराष्ट्रात येत्या २० तारखेला मतदान आहे. यावेळी तरी शिक्षित मध्यम वर्गाने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. सरकार निवडण्यात त्यांचे मत महत्त्वपूर्ण ठरले पाहिजे. बाकी एका हिंदी कवींनुसार, 'जे मौन राहतात, त्यांनाही काळ शिक्षा करतो.'

**- विवेक पटाईत.**

---

# गुद्यावर जायचं की हुद्यावर?



बॅनर बांधा, प्रचारपत्रकं वाटा, घरोघरी पक्षाचं चिन्ह पोहचवा, सातत्यानं उमेदवाराविषयी चर्चा करुन नॅरेटिव्ह सेट करा, सोशल मीडियावर ॲक्टीव्ह रहा, विरोधकांच्या पोस्टवर तुटून पडा, समर्थकांच्या पोस्टचे गोडवे गा आणि हे सारं झालं कि, मग मुद्यांवरची लढाई गुद्यांवर आणा.. एकमेकांच्या खानदानाचा अर्वाच्य भाषेत उद्धार करा, बाचाबाची करा, एकमेकांची डोकि फोडा आणि तरीही डोकं शांत झालं नाही तर एखाद्याला भोसकून टाका संपवून टाका आयुष्य.. त्याचं, तुमचं, त्याच्या कुटुंबाचं आणि तुमच्याही कुटुंबाचं! नेत्यांच्या उमेदीच्या काळातील प्रेरणादायी अनुभव कधी वाचणार आपण? मुद्यारुन गुद्यावर जाण्यापेक्षा मुद्यावरुन चांगल्या मार्गाने हुद्यावर जाण्याचे मार्ग आपण निवडू शकत नाही का? किती काळ बिनबुडाचे, बिनविचारधारेचे बिनडोक लोकप्रतिनिधी पोसणार आपण?

खरं तर निवडणूक काळात रुजू पाहत असलेला जीवघेणा ट्रेण्ड नेत्यांसाठी नव्हे तर कार्यकर्त्यांसाठी धोकादायक ठरतोय. आपण ज्यांच्यासाठी लढतोय, ज्यांच्यासाठी रक्ताचं पाणी करतोय, ज्यांच्यासाठी घाम गाळतो त्यांनी तरी या निवडणुकीला इतकं गांभीर्यानं घेतलंय का, जितके तुम्ही घेताय? निवडणूक ही विचारांची लढाई आहे हे विसरुनच गेलो आहोत आपण. ही विचारांची लढाई विचारानेच लढवली गेली पाहिजे. अविचाराला यात थाराच नको. पण नेतेच इतके भडकाऊ होत चाललेय कि, कार्यकर्त्यांना पेटवण्यातच त्यांना स्वारस्य वाटतं. नेत्यासाठी कार्यकर्ता पेटतोही. कायदा हातात घेऊन तो विरोधकांना आव्हान देतो. पण जेव्हा गुन्हे दाखल होतात, तेव्हा ही नेतेमंडळी कुणाच्याही कायमस्वरुपी मदतीला येत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सुरुवातीला एखाद्यावेळी जामिनासाठी आले तर येतात. पण त्यानंतर चार-पाच वर्षे कार्यकर्त्यांना जी कायदेशीर लढाई लढावी लागते ती स्वखर्चानेच. त्यात वेळ, श्रम आणि पैसा या तिघांची नासाडी होते, पण नेत्याला त्याच्याशी काय देणे? ज्या विरोधकाला आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना आपण आपल्या नेत्यासाठी लोकांना अंगावर घेतो त्याच विरोधकाच्या गळ्यात गळा घालून आपला नेता निवडणुकीनंतर फिरताना दिसतो.

त्यांच्या बंद दाराआडच्या चर्चांमध्ये आपला कुठेच विचार नसतो. कधी कोण युतीत जाईल आणि कोण आघाडी करेल याचा नेम नसतो. अशा वेळी आपण का आपापसात भांडत बसावे? इतकं सारं करुन आपल्याला बिरुद काय मिळतं? अमूक नेत्याचा पंटर, गुंड, मवाली, रिकामटेकडा वगैरे वगैरे. आपल्याला आपली प्रतिष्ठा जपत सभ्य पद्धतीने राजकारण करताच येणार नाही का? नेता ठरवतानाच जर सभ्यपणाच्या निकषाने त्याची निवड केली तर आपल्या डोक्याचा ताप निश्चितपणे कमी होऊ शकतो.

खरं तर, निवडणूक काळात आपण ठामपणे कुणालाच झुगारून लावत नाही. अशा काळात जी मंडळी भावनांशी खेळतात त्यांना दारातही उभं करायला नको, पण तितकीही धमक नसते आपल्यात. ज्यांना मोक्याच्या क्षणी लायकी दाखवायची असते त्यांचीच पायकी आपण करतो. त्यांनाच अगदी सहजपणे शरण जातो. अशावेळी कोणत्याच बाबतीत वैचारिक घोळ नसतो. ना नीतिमूल्यांबाबत ना तत्त्वांबाबत! आपल्याला फक्त या परिस्थितीचा फायदा उठवायचा असतो. दुथडी भरून वाहणाऱ्या भ्रष्टाचाराच्या महापुरात आपण अगदी शेवटच्या क्षणी डुबकि मारतो अन् पाळीव कुत्र्यागत त्यांच्यापुढे शेपटी हलवत बसतो. त्यांनी हाड म्हटलं कि, शेपटी झुकवून पळायचं.

प्रत्येक सुजाण तरुणाने या प्रक्रियेत हिरीरीने सहभाग घ्यायला हवा. लोकांनी लोकांसाठी चालवलेल्या या देशात खरी सत्ता लोकांच्याच हाती आहे. त्यामुळे या सत्तेला विधायक परिमाण देण्यासाठी या प्रक्रियेत उतरायला हवं. उमेदवाराचं शिक्षण काय? त्याचं चारित्र्य कसं? त्याच्यातले सद्गुण-दुर्गुण कोणते? सामाजिक कार्यात त्याचा आजपर्यंतचा सहभाग काय? त्याच्या बोलण्यात आणि कृतीत किती फरक आहे? मतदारसंघातील प्रमुख समस्यांची त्याला किती जाण आहे? निवडून आल्यावर मतदारसंघाच्या विकासाची त्याला किती आब असेल?

आज ज्या पक्षाच्या आधारे तो मत मागतोय, त्याच पक्षात तो टिकून राहील का? या सर्व प्रश्नांचे ठोकताळे पडताळून मगच आपण कामाला लागावं. एखाद्या पक्षाकडे बघून या प्रक्रियेत उतरण्यापेक्षा उमेदवाराकडे बघून त्यात सहभागी व्हावं. कदाचित तो पैशांअभावी, मनुष्यबळाअभावी एकटाही असेल. अशावेळी आपल्याला त्याच्याभोवती समूह तर करता येईल. मग या समूहाचा समाज जागृती आणि त्याचबरोबर मतदार जागृतीसाठी उपयोग करून घेता येईल.

आपली ही सेवा प्रचारापुरतीच मर्यादित न राहता मतदान काळातही सक्रिय असायला हवी. प्रत्येक बुथवर आपली माणसं असावी. प्रत्येक मतदाराला त्याच्या हक्कांची जाणीव करून द्यावी. डोळ्यांवर झापडं बांधून कोणत्या एका चिन्हावर शिक्कामोर्तब करून अजाणपणे मूलभूत हक्क उपभोगणाऱ्यांमध्ये जागृती घडवायला हवी. मतदानाचा केवळ टक्का वाढविण्यासाठी नव्हे तर मतदान शंभर टक्के कसे होईल यासाठी प्रयत्न करायला हवेत. शेवटी आपणच आपल्या भाग्याचे विधाते बनायला हवं!

**- हेमंत भोसले.**

---

जनमानस

## निवडणुका आणि आश्वासने

निवडणूक मग ती ग्रामपंचायतीची असो वा विधानसभेची. एकदा तारखेची घोषणा झाली कि समस्त प्रमुख पक्ष तयारीला लागतात. इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्ठींचे निवडणुका म्हणजे लोकशाहीच महोत्सव. काहीजण याकडे युद्ध म्हणूनही पाहतात. प्रेमात आणि युद्धात साम, दाम, दंड, भेद सर्वकाही माफ असते त्याप्रमाणे निवडणुकांमध्ये या सर्व बाबींचा समस्त पक्षांकडून कमी अधिक प्रमाणात वापर केलाच जातो. अनेक इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून तयार असताना कोणालाही न दुखावता त्यापैकि एकालाच पक्षाचे तिकिट देऊन इतरांना कसे सांभाळायचे यामध्ये पक्षश्रेष्ठींच्या अनुभवाचा कस लागतो.

एखादा नेता आपल्या पक्षाशी किंवा स्थानिक जनतेशी किती प्रमाणात प्रामाणिक आहे हे खरेतर निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यावरच कळते. एरव्ही शेवटच्या श्वासापर्यंत पक्षाचे काम करण्याच्या बतावण्या करणारी नेतेमंडळी पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून एका रात्रीत पक्ष बदलायला मागेपुढे पाहत नाहीत. एखादा नेता परिसरात नावाजलेला असला कि त्याला गळाला लावण्यासाठी अन्य पक्षही फासे टाकून बसलेलेच असतात. यंदा ही रस्सीखेच पाहायला मिळाली. निवडणुकांच्या तोंडावर मतदारांना आकृष्ट करण्यासाठी समस्त पक्षांकडून त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. ज्यामध्ये आश्वासनांचा पाऊस पाडलेला असतो. या आश्वासनांमध्ये विकासासोबत महागाई नियंत्रण, जातीय आरक्षण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, तरुणांना रोजगार, महिला सबलीकरण यासारख्या अनेकविध बाबींचा प्रामुख्याने समावेश केलेला असतो. पक्षांच्या जाहीर सभांतूनही आम्हीच कसा राज्याचा विकास घडवू शकतो, आम्हीच कसे जनतेचे तारणहार आहोत याच्या बतावण्या केल्या जातात. निवडणुका पार पडल्यानंतर सत्तेत आलेल्या पक्षाला या आश्वासनांचा सोयीस्कर विसर पडतो. मधले काही दिवस विरोधकांची उणीधुणी काढली जातात.

निवडणुका जवळ आल्या कि, पुन्हा विकास कामांना सुरुवात होते. वर्षानुवर्षे भारतात हेच सुरु आहे. नेत्यांच्या आश्वासनांना सामान्य जनता बळी पडते. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी परिस्थितीत फारसा बदल होत नाही. निवडणूक आयोगाने गेल्या काही वर्षांत निवडणुकिनिमित्त केल्या जाणाऱ्या खर्चावर आणि पद्धतींवर बंधने आणल्यामुळे तसेच पूर्वीच्या तुलनेत आचारसंहिता अधिक कडक केल्याने निवडणूक प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकि शिस्त आली आहे'; मात्र आश्वासने देण्यावर कोणतेही बंधन नसल्याने पक्षांचे फावते. वास्तविकतः निवडणुकांच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवरसुद्धा बंधने असायला हवीत. राजकिय पक्ष देत असलेली आश्वासने कशी पूर्ण करणार, त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असणार, किती कालावधीत त्यांची पूर्तता करणार, आश्वासनांपैकि किती बाबींची जनतेला खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे. आश्वासनांची वेळेत पूर्ती न करणाऱ्यांना दंडित करण्याचे सुद्धा प्रावधान असावे. असे काही केल्याशिवाय जनतेला त्यांच्या बहुमोल मताचा मोबदला मिळणार नाही.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## संक्षिप्त वृत्त



अक्कलकोट : स्वामीटेक वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना महेश इंगळे, नागनाथ जेऊरे, प्रथमेश इंगळे व अन्य.

### इंगळे तंत्रनिकेतनच्या स्वामीटेक अंकाचे वटवृक्ष मंदिरात प्रकाशन

**अक्कलकोट** : श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित कै. कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे तंत्रनिकेतनच्या सन २०२३-२४ या सालाचे स्वामीटेक या वार्षिक अंकाचा प्रकाशन सोहळा मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्त प्राचार्य नागनाथ जेऊरे यांच्या उपस्थितीत स्वामींच्या साक्षीने स्वामींच्या गाभाऱ्यात करण्यात आला. याप्रसंगी महेश इंगळे यांनी वार्षिकांक हा संस्थेचा खरा चेहरा आहे. तंत्रनिकेतन ग्रामीण भागातील एनबीए मानांकित एकमेव संस्था असून विद्यार्थ्यांच्या कलागुणाला वाव देणारी व त्यांना घडवणारी तंत्रनिकेतन म्हणून नावारूपास येत आहे, असे सांगितले. वार्षिकांक स्वामीटेक २३-२४ ही संस्थेची माहिती समाजापर्यंत पोहोचवणारी, संस्थेच्या प्रत्येक घटकातील सुप्त कलागुणांना वाव देणारी व वाचनातून प्रगतीची वाट दाखवणारे माध्यम आहे. प्रकाशन सोहळ्यास उपस्थित मान्यवरांचे प्राध्यापक श्री राजरतन बाणेगाव यांनी आभार मानले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, व्यंकटेश पुजारी, प्रथमेश इंगळे, विपुल जाधव, दर्शन घाटगे, तुषार मोरे, धनराज स्वामी, श्रीकांत मलवे, गिरीश पवार उपस्थित होते.



सोलापूर : राजराजेश्वरी शिक्षण संकुलात आयोजित मेळाव्यात जमलेले माजी विद्यार्थी.

### राजराजेश्वरी शिक्षण संकुलात माजी विद्यार्थी मेळावा

**सोलापूर** : विनायक नगर येथील राजराजेश्वरी शिक्षण संकुलात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते.यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी शंकर हुळ्ळे, विनायक पद्मा, श्याम जाई, भाग्यश्री काढा, वरलक्ष्मी चलमेटी, वंदना तेली यांनी आठवणींना उजाळा दिले. विश्वनाथ तंबाके, मारुती कांबळे, शितल पाटील, संगिता नरगिडे, अनंत सौदागर, शिवाजी रानसर्जे आदी तात्कालीन शिक्षकांनी मनोगतातून माजी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमास शिक्षण संकुलातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. स्नेह भोजनानी कार्यक्रमाची सांगता झाली.



सोलापूर : त्रिशन फाउंडेशनतर्फे फराळाचे वाटप करताना शीतल कांबळे, प्राणिता कांबळे आदी.

### त्रिशरण एन्लाइनमेंट फौंडेशनची वंचितांसोबत दिवाळी साजरी

**सोलापूर** : सोलापूर येथील त्रिशरण एन्लाइनमेंट फाउंडेशनच्या संस्थापिका तथा संचालिका प्रज्ञा वाघमारे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दीपावली सण वंचितांसोबत साजरा करण्यात आला. शहरातील गोरगरीब निराधारांना, कुमठा नाका परिसरातील बेघर निवारा केंद्रातील निराधारांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी त्रिशरण फाउंडेशनचे पुणे विभागीय समन्वयक शितल कांबळे, निवारा केंद्राचे व्यवस्थापक अशोक वाघमारे, अमोगसिध्द लांडगे, प्रणिता कांबळे, विकास दूत भाग्यश्री वंजारे उपस्थित होते.

### मल्लिकार्जुन पोटाबत्ती यांचे निधन



**सोलापूर** : जोडभावी पेठ येथील रहिवासी यांचे दीर्घ आजाराने गुरुवारी सकाळी निधन झाले. मृत्युसमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, तीन सून, चार बहिणी, नातवंडे असा परिवार आहे.


**पाहिजेत**

वस्ताद - वेटर पाहिजेत.
हॉटेल मातोश्री, तिऱ्हे.
मो. नं. ९१४६४६००५५
(०६१२२४)

अस्सल सोलापुरी सुराज्य सोलापूर Classified


**निवेदन** : या अंकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आवाहनाच्या सत्यतेबाबत 'सुराज्य' हमी घेऊ शकत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

# मुखदर्शनरांगेत छत्रपती संभाजी चौकात सरकता उड्डाणपूल

- कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती
- प्रदक्षिणा मार्गावरील भाविकांचा अडथळा होणार दूर

**पंढरपूर/प्रतिनिधी**

**कार्तिकी यात्रा दि. १२ नोव्हेंबर रोजी आहे. या यात्रेचा कालावधी दि. २ ते १५ नोव्हेंबर असा राहणार आहे. या कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. त्यामुळे श्रींच्या पदस्पर्श व मुखदर्शनरांगेत तात्पुरत्या स्वरूपात बॅरीकेटींग करून पत्राशेड उभारण्यात येत आहेत. यात्रेत प्रदक्षिणा मार्गावरील रहदारीचा अडथळा लक्षात घेऊन तसेच भाविकांच्या सुविधांसाठी प्रथमच मुखदर्शनरांगेत छत्रपती संभाजी चौक येथे सरकता उड्डाणपुल उभारण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.**

श्री. विठ्ठल रूक्मिणीची मुखदर्शनरांग श्री संत तुकाराम भवनच्या पाठीमागून छत्रपती संभाजी चौक पर्यंत असते. तथापि, छत्रपती संभाजी चौक येथे उड्डाणपुल नसल्याने दर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यास तसेच प्रदक्षिणा मार्गावरील वारकरी भाविकांना मोठा अडथळा निर्माण होत होता. तसेच स्थानिक रहिवाशी व दुकानदारांच्या देखील तक्रारी प्राप्त होत होत्या.

त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे श्रींच्या मुखदर्शनरांगेत सरकता उड्डाणपुल उभारण्याचा निर्णय दि. १३ ऑक्टोबर रोजी मंदिर समितीच्या सभेत घेण्यात आला होता.

उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व मंदिर समितीचे विभाग प्रमुख बलभीम पावले व स्थापत्य अभियंता भाऊसाहेब घोरपडे यांनी जलसंपदा (यांत्रिकी) विभाग, पंढरपूर यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली आवश्यक ते नियोजन करून अत्यंत कमी वेळेत ३० फुट व उंची १० फुट लांबीचा सरकता उड्डाणपुल तयार करण्यात आला.

यामधील १२ फुटाचा भाग सरकता असल्याने, एकादशी दिवशी प्रदक्षिणा मार्गावर येणाऱ्या रथांना कोणताही अडथळा होणार नाही, १० फुटांपेक्षा जास्त उंचीचा रथ आल्यानंतर अत्यंत कमीत कमी वेळेत पुलाचा वरील भाग सरकवून रथ पार करता येणार आहे.



पंढरपूर : संभाजी चौकात उभारण्यात आलेला सरकता उड्डाणपूल.

**भाविकांना जलद व सुलभ मुखदर्शन**

उड्डाणपुलाच्या ठिकाणी पूर्ण वेळ तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उड्डाणपूल तांत्रिकदृष्ट्या योग्य व सक्षम असल्याबाबत यांत्रिकी कार्यशाळेचे प्रमाणपत्र देखील घेण्यात आले आहे. या उड्डाणपुलामुळे वर्षभरात होणाऱ्या माघी, चैत्री, आषाढी, कार्तिकी या महत्त्वाच्या व मुख्य यात्रांमध्ये श्रींची दर्शनरांग द्रुतगतीने चालून भाविकांना जलद व सुलभ मुखदर्शन होणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

## नेत्यांचे चेहरे एडीट करून बदनामी; गुन्हा दाखल

**मोहोळ/प्रतिनिधी**

मोहोळचे माजी आमदार राजन पाटील उमेश पाटील यांच्यासह इतरांचे चेहरे एडीट करून आक्षेपार्ह बदनामीकारक फेसबुक पोस्ट केल्याप्रकरणी दोन्ही गटाकडून परस्पर विरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या आहेत. ते फेसबुक अकाऊंट वापरकर्त्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत

फिर्यादी सूर्यकांत नागनाथ कांबळे रा. मोहोळ एसटी स्टँडसमोर यांना दि. ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ : ३० वा. च्या दरम्यान त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते महादेव गुंड यांनी कळविले की, त्यांचे फेसबुक सोशल मीडियाचे खाते पाहत असताना संदीप रोकडे नावाच्या फेसबुकवरील खात्यावरून माजी आमदार राजन पाटील, त्यांची मुले बाळराजे पाटील, अजिंक्यराणा पाटील यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट केली आहे. त्याबाबतचे फेसबुकवर आलेले व्हिडिओ त्यांनी कांबळे यांना व्हाट्सअपवर पाठवले. त्यानंतर फेसबुक खाते पाहिले असता त्याच्यामध्ये माजी आ. राजन पाटील व त्यांच्या दोन्ही मुलांचे तसेच आ. यशवंत माने यांचे चेहरे एडिट केलेले दिसले. त्यानुसार कांबळे यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात संदीप रोकडे या फेसबुक खात्याच्या वापरकर्त्यावर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

दुसऱ्या घटनेत प्रफुल्ल देविदास वाघचौरे (रा. भांबेवाडी, ता. मोहोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पहलाज सेवालानी नावाच्या फेसबुकवरील अकाउंटवरून सामाजिक व राजकीय नेते उमेश पाटील व माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांचे काही आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित केल्याचे दिसून आले. पहलाज सेवालानी नावाच्या फेसबुकवरील अकाउंट वापरकर्त्यावर वाघचौरे याच्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बसस्थानकातून पाच तोळे सोने लंपास

**मोहोळ** : मोहोळ बसस्थानकावर बसमध्ये चढण्याच्या गर्दीत पर्समधील पाच तोळ्याचे दागिने लंपास झालेने मोहोळ पोलीस ठाण्यात त्या अज्ञात चोरट्यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहोळ शहरात सुळे नगरात राहणाऱ्या धनश्री तेजस मोहोळे या आपल्या भावासोबत इचलकरंजीला जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्या मोहोळच्या बस स्थानकावर आल्या तेथे प्रवाशांची गर्दी होती. सोलापूर-कुरुंदवाद बस आल्याने त्या व त्यांचा भाऊ जागा मिळण्यासाठी बसमध्ये जाता यावे म्हणून दरवाजाजवळ जाऊन उभा राहिल्या. त्याचवेळी गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या पर्समधील दागिने गायब केले. त्यात तीन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, दोन तोळ्याचा लक्ष्मी हार, तीन गॅम वजनाची अंगठी असा अंदाजे किंमत दोन लाख ६५ हजारांचा ऐवज होते. तपास मोहोळ पोलीस कारित आहेत

**तरुणाचा मोबाईल पळवला**

डफरीन चौक येथे क्रूजर गाडी पार्क करून फिर्यादी महेश पतंगराव बडियर (वय-२८, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) हे चहा प्यायला गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांचा मोबाईल चोरून नेला आहे. ही घटना १ नोव्हेंबर २०२४ रोजी डफरीन चौक येथे सायंकाळी सात वाजण्याच्या दरम्यान घडली. या प्रकरणी महेश बडियर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

## दोन गावठी कट्टे जप्त; तिघांविरुद्ध गुन्हा

**मोहोळ** : स्थानिक गुन्हे अन्वेशन पथकाने दोन गावठी कट्टे जप्त करत तीन जणावर गुन्हे दाखल केले. याप्रकरणी पोलिसांनी साहिल इक्बाल बागवान (रा. बागवान नगर कुरूल रोड, मोहोळ), सूरज खंडु जाधव (रा. यावली ता. मोहोळ),सद्दाम रशीद शेख (रा. विरवडे बुद्रुक, ता. मोहोळ) या तिघांवर गुन्हे दाखल केले. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला सूरज जाधव हा विनापरवाना गावठी पिस्टल बाळगुन आहे. तो मोहोळ ते सोलापूर जाणाऱ्या सर्विस रोडवर गुंड शॉपींग मार्ट च्या शेजारील मैदानात तो उभा असल्याची माहिती मिळाली. पथकाने त्याला सापळा रचून पकडले. त्याच्याकडे पिस्टल बाबत चौकशी केली असता त्याने साहील बागवान याने



दिल्याचे सांगितले.पोलिसांच्या पथकाने लागलीच साहिल बागवान याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून देशी बनावटीचे दोन पिस्टल मॅगझीनसह ताब्यात घेतले. पोलिसांच्या पथकाने साहील बागवानकडे पिस्टलबाबत अधिक चौकशी केली असता ते पिस्टल सद्दाम रशीद शेख याच्याकडून घेतल्याबाबत सांगितले. पोलिसांनी सद्दाम शेखवरही गुन्हा दाखल केला.

## रामलाल चौकातून दुचाकी लंपास

**सोलापूर** : रामलाल चौक येथे फिर्यादी शहाजहान अब्दुल पटेल (वय-५५, रा. मुस्लीम पाच्छा पेठ) यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीझेड.१४५१ यांनी पार्क करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने ती दुचाकी चोरून नेली आहे.ही घटना ४ नोव्हेंबर रोजी रात्री नऊ ते दहाच्या दरम्यान रामलाल चौक येथे घडली. या प्रकरणी शहाजहान पटेल यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

**चार्जिंगला लावलेला मोबाईल लंपास**

सोलापूर बस स्थानकातील विश्रांतीगृह येथे शिवानंद खंडू भोसीकर (वय-३२, रा. नांदेड) यांनी तेथे चार्जिंगला लावलेला मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. ही घटना ५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री घडली. याप्रकरणी शिवानंद भोसीकर यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पोहेकाँ बाचावार हे करीत आहे.

## किशोरवयीन तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**रामवाडी परिसरातील घटना**

**सोलापूर/प्रतिनिधी**

एका १७ वर्षीय किशोरवयीन तरुणाने मावशीच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रामवाडी परिसरातील शहानगर झोपडपट्टी येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास उघडकिस आली.



यश यशपाल वडार (वय १७, रा. शहानगर झोपडपट्टी, वांगी रोड) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याचे आई-वडील देवदर्शनासाठी गावाला गेल्याने तो घराशेजारी राहणाऱ्या मावशीच्या घरात झोपला होता. गुरुवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याला पाणी भरण्यासाठी उठवण्यास गेले असता आतून प्रतिसाद मिळाला नाही. खिडकीतून पाहिले असता त्याचा मृतदेह घरातील छताच्या लाकडीवाशाला रिबीनच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. दरवाजा उचटून त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

मयत यश वडार हा इ.११वी इयत्तेत शिकत होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही. हवालदार रवींद्र जाधव पुढील तपास करीत आहेत.

**चाकू आणि बॅटने मारहाण तरुण जखमी**

सिध्देश्वर मार्केटयार्ड येथे दुकान बंद करणे तसेच पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून चाकू, काठी आणि बॅटने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. मन्सुर नईम बागवान (वय २७ रा. विजापूर वेस) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास मार्केट यार्डातील मन्सूर ट्रेडर्स या दुकानाजवळ त्यांना मोबीन छोटूभाई बागवान, उमेर बागवान आणि इतर दोघांनी मिळून मारहाण केली, अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.



सोलापूर : लग्न बस्ता खरेदीसाठी व्ही. आर. पवारमध्ये झालेली ग्राहकांची गर्दी.

## लग्न बस्ता खरेदीसाठी व्ही. आर. पवारमध्ये गर्दी

**सोलापूर/प्रतिनिधी**

आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा आणि वधूचा आनंद सुनिश्चित करण्यासाठी ग्राहक मोठ्या प्रमाणात व्ही. आर. पवार यांच्याकडे ब्रायडल शालू आणि घागरा घेऊन जाताना दिसत आहेत, असे मत व्ही. आर पवारचे व्यवस्थापकीय संचालक राजेश पवार यांनी सांगितले.

चाटी गल्ली येथील महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या साडी शोरूममध्ये बोलताना त्यांनी वरील मत व्यक्त केले. डिझायनर ब्रायडल शालू, डिझायनर वर्क सारीज, डिझायनर लाचा, ब्रांडेड सिंथेटिक साड्या, डिझायनर ब्रायडल कंची अँड पैठणी तसेच आहे राजा होलसेल दरात असलेला साड्या खरेदी करण्यासाठी महिलांची मोठी गर्दी होत आहे.

खास लग्न बसता खरेदीसाठी सोलापूरसह लातूर धाराशिव तसेच पुणे मुंबई येथील देखील ग्राहक येताना दिसत आहेत. खास करून महिला ग्राहकांसाठी व्ही. आर. पवारमध्ये फॅन्सी ड्रेस मटेरियल, लिनन, चोळी खण, टॉप, इरकल ड्रेस, फॅन्सी ड्रेस, मटेरियल, रेगुलर ड्रेस, कॅज्युअल ड्रेस, पार्टी वेअर, ऑफिशियल ड्रेस, लेगीन्स, स्ट्रेट पॅन्ट, प्लाजो सेट, रेडीवेअर ड्रेस, स्ट्रेट लाँग, वन पीस आदी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. आता लग्न बसता सोबतच व्ही. आर. पवारमध्ये दर्जे दर सुटिंग-शर्टिंग देखील उपलब्ध आहे यामध्ये विशेष करून रेमंड, लिननसारख्या सुटिंग-शर्टिंगचा समावेश आहे.

तरी एकदा आवर्जून भेट द्यावे, असे आवाहन अमर पवार, महेश पवार व गिरीश पवार यांनी केले आहे.

## व्यंकटेश्वर देवस्थानात उद्यापासून ब्रह्मोत्सवाचे आयोजन

**सोलापूर/प्रतिनिधी**

**शहराच्या पूर्व भागातील श्री. वेंकटेश्वर नगर (दाजीपेठ) येथील श्री वेंकटेशवर देवस्थानात शनिवार दि. ९ नोव्हेंबर ते गुरुवार दि. १४ नोव्हेंबरपर्यंत ५२ व्या ब्रह्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त सहा दिवस मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत.**

-----------------------------

शनिवार दि. ९ नोव्हेंबर रोजी सायं.६.३० ते ९ स्वस्तीवाचन, विश्वसेनाराधनम्, पुण्याहवाचन, मृत्संग्रहणम्, अंकुरारोपणम, शातुमुरै, तीर्थप्रसाद गोष्टी होईल. रविवार दि. १० नोव्हेंबर रोजी, पहाटे ५.३० वाजता ''श्री च्या मूळमूर्तीला अभिषेक, सकाळी ९.०० ते ११.३०, पालखी सेवा, ध्वजपट प्रतिष्ठापना, ध्वजारोहणम्, होमहवन, आराधना, शातुमुरै, सायंकाळी ६.३० ते ९ भेरीपूजा, देवता आवाहन, होमहवन, शेषवाहन सेवा, तीर्थप्रसादगोष्टी होणार आहे. सोमवार दि. ११ नोव्हेंबर रोजी पहाटे ५.३० वाजता श्रीच्या उत्सवमूतीस अभिषेक, सकाळी ८ वाजता द्वारतोरणा, ध्वजकुंभ, गजवाहन सेवा, आराधना, तिर्थप्रसाद गोष्टी, साय ६ ते ९ होमहवन, स्वागत समारंभ (येदुरुकोल्लू), कल्याणोत्सवम्, तीर्थप्रसाद गोष्टी होईल. मंगळवार दि. १२ नोव्हेंबर रोजी, पहाटे ५.३० वा. ''श्रीं उत्सवमुर्तीला अभिषेक,



सकाळी ९.३० वाजता होमहवन, पूर्णाहूती, हनुमान वाहन सेवा, तीर्थप्रसाद गोष्टी, दुपारी ४.३० वा होमहवन, रथोत्सवम् (शहरातून मिरवणूक). ही रथ मिरवणूक दुपारी ४.३० वाजता देवस्थानापासून निघणार असून जोडबसवण्णा चौक, राजेंद्र चौक, कन्नाचौक, औद्योगिक बँक, मार्कंडेय चौक, जोडबसवण्णा चौक, भद्रावती पेठ, दत्तनगर, पद्मशाली चौक ते परत दाजी पेठ देवस्थानात रात्रौ ९.३० वा. येणार आहे. बुधवार दि. १३ नोव्हेंबर रोजी, सकाळी ७वा. होमवन, अश्ववाहन सेवा, तीर्थप्रसादगोष्टी, सकाळी ९ ते दुपारी २वा. श्रींचे मूळमूर्तीला ८१ उत्तमोत्तम कळशस्नपनम् (८१ कळशाभिषेक) तीर्थप्रशाद गोष्टी, रात्रौ गरुडवाहन सेवा , तीर्थप्रसाद गोष्टी. गुरुवार दि. १४ नोव्हेंबर रोजी, सकाळी ७.३० होमहवन 'सुर्यप्रभा वाहन सेवा'', सकाळी ९ ते १२, होमहवन, चक्रस्नानम (चक्रतीर्थ), आराधना, शातुमुरै, तीर्थप्रसाद गोष्ट, सायंकाळी ५ ते ९ आराधना, चंद्रप्रभा वाहन सेवा, होमहवन, महापूर्णाहुती , देवतोउद्वासनम्, श्री पुष्पयागम्, द्वादशाराधना, वसंतोत्सवम् (वनविहार), ध्वजपट अवरोहणम, शातुमुरे, कुंभप्रोक्षणम, तीर्थप्रसाद गोष्टी होईल.

हे सर्व कार्यक्रम तिरुमला तिरुपती देवस्थानम् येथील परंपरा पध्दतीनुसारच होत असतात. तरी भाविकांनी या उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन देवस्थानच्यावतीने करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त



अक्कलकोट : जनजागृती फलक लावताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कर्मचारी

### अक्कलकोटमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून जनजागृती

**अक्कलकोट :** येथील सर्व शासकीय कार्यालयात व आवारात सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून जनजागृती करणारे पोस्टर लावण्यात आले. नाही म्हणजे नाही हक्काच्या शासकीय कामासांठी लाच देणार नाही या आशयाचे जनजागृतीपर फलक अक्कलकोट शहरातील सर्व शासकीय कार्यालय आवारात दर्शनी भागात लावण्यात आले. कोणी लाचेची मागणी केल्यास टोल फी क्रमांक व कार्यालयाचा सोलापूर विभाग लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा क्रमांक त्यावर देण्यात आला आहे. २८ ऑक्टोबर ते तीन नोव्हेंबर पर्यंत जनजागृती साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने हे फलक लावण्यात आले. यावेळी लाचलुचपत सोलापूर विभागातील एस. आय. चडचणकर, स्वामीराव जाधव, अक्षय श्रीराम हे उपस्थित होते. अक्कलकोट शहरातील तहसिल कार्यालय, पंचायत समिती आवार, नगरपरिषद कार्यालय, मोजणी ऑफीस, सब रजिस्टर ऑफीस, पोलीस स्टेशन सह सर्वच कार्यालय दर्शनी भागात जनजागृतीपर फलक लावण्यात आले.



सोलापूर : कांबळे यांना निवडीचे पत्र देताना सुनील पेंटर, नितीन पेंटर व पदाधिकारी.

### रास्तभाव दुकानदार संघटनेच्या उत्तर तालुकाध्यक्षपदी कांबळे

**उत्तर सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुका रास्तभाव धान्य दुकानदार संघटनेच्या सलग दुसऱ्यांदा उत्तर सोलापूर तालुका उपाध्यक्ष पदी अजिनाथ कांबळे यांची निवड झाली. निवडीचे पत्र सोलापूर ज़िल्हा अध्यक्ष सुनील पेंटर, ज़िल्हा संपर्क प्रमुख नितीन पेंटर यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी विजय अवताडे, सचिन भिंगारे, महादेव कदम, शिवाजी टोणपे, शिवाजी शेर खाणे, राजेंद्र भोसले, अशोक गवळी, अर्जुन दुर्लकर, रणजित माने, समाधान गुंड, अनिल जमदाडे, इनायतअली जहागीरदार, विषाल खडके,सदाशिव शिंदे यांच्यसह उत्तर सोलापूर तालुक्यातील रास्तभाव धान्य दुकानदार उपस्थित होते.

### 'माळशिरसमधील उमेदवारांनी खर्च तपासणी करून घ्यावी'

**अकलूज :** माळशिरस (अ.जा.) विधानसभा संघातून निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांच्या निवडणूक खर्च लेख्याची तपासणी दि.८ नोव्हेंबर,१२ नोव्हेंबर व १६ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे यावेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी तपासणीसाठी उपस्थित रहावे, असे निवडणूक विभागाकडून कळवण्यात आले आहे. उमेदवारांच्या खर्च अभिलेख्यांची प्रथम तपासणी ८ नोव्हेंबर रोजी पंचायत समिती माळशिरस येथे करण्यात येणार आहे.जे उमेदवार खर्चाचे लेखे तपासणीकरिता सादर करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सहवेदना



### मालन काटकर

**श्रीपूर :** मालन पांडुरंग काटकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. मालन काटकर यांनी आयबँकेकडे नेत्रदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या पश्चात मुलांनी दोन्ही नेत्राचे दान करुन त्यांचा संकल्प पूर्ण केला.



### जालिंदर नाईकनवरे

**श्रीपूर :** श्रीपूर (ता. माळशिरस) येथील श्री चंद्रशेखर विद्यालयाचे सेवानिवृत्त कर्मचारी जालिंदर निवृत्ती नाईकनवरे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली सून, नातवंडे असा परिवार आहे. ते पत्रकार दत्ता नाईकनवरे यांचे वडील होत.

# उक्कडगाव येथे घरगुती वादातून वकिलास मारहाण

## चुलत भावासह चौघांवर गुन्हा दाखल

**बार्शी :** भावकीतील विहिरीतून पाणी घेण्याच्या वादावरून घरात घुसून लाथाबुक्क्या आणि काठींने केलेल्या मारहाणींत वकिलासह दोघेजण जखमी झाले. ही घटना उक्कडगाव (ता.बार्शी) येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली घडली. या प्रकरणात पांगरीच्या पोलिसांनी वकिलाच्या चुलत भावासह चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दत्तात्रय सर्जेराव मुंडे (वय २८ रा. उक्कडगाव) या वकिलांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांचे चुलते पोपट मुंडे, त्याचा मुलगा अक्षय मुंडे, बहिणाबाई मुंडे आणि मोहिनी मुंडे (सर्व रा. उक्कडगाव) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. बुधवारी दुपारी शेतात पाणी घेण्याच्या वादातून महिलात तक्रार झाली होती. त्याचा घडला प्रकार दत्तात्रय मुंडे हे संध्याकाळी घरी परतल्यानंतर त्यांची पत्नी सांगत होती. तेंव्हा वरील सर्वजण वकीलाच्या घुसून तुझ्या बायकोने दुपारी पाण्याच्या कारणावरून आम्हाला शिवीगाळ केली. तिला समजावून सांग. असे म्हणत त्यांना काठी आणि हाताने मारहाण केली.त्यानंतर त्यांच्या पत्नीला देखील मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. तपास हवालदार दळवी करीत आहेत.

## पर्समधून २ लाखांचे दागिने गायब

**मोहोळ :** गावाला जाण्यासाठी बसमध्ये प्रवेश करीत असताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका महिला प्रवाशाच्या पर्समधून २ लाख ६५ हजार रुपये किमतीचे दागिने पळवले. ही चोरी बुधवारी दुपारच्या सुमारास मोहोळ बस स्थानकात घडली.

या संदर्भात धनश्री तेजस मोहाळे (रा. सुळेनगर मोहोळ) यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली.काल दुपारी २ वाजेच्या सुमारास त्या आपले पती आणि भाऊ अभिजीत नेजे याच्या सोबत बस स्थानकात आल्या होत्या. त्यानंतर तिघे सोलापूर ते कुरुंदवाड या बस मध्ये प्रवेश केला. बसमध्ये गर्दी असल्याने तिघेही खाली उतरले. त्यावेळी धनश्री यांच्या पर्सची चैन उघडी दिसते. तेव्हा त्यांनी दागिन्याची पाहणी केली असता त्यातून ५५ ग्रॅम सोन्याच्या दागिन्याची डबी गायब झाल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी पोलिसात फिर्या दाखल केली. फौजदार केसकर पुढील तपास करीत आहेत .



## मिरजगी येथे शेतीच्या वादातून मारहाण

**अक्कलकोट :** शेतीच्या ताबा घेण्याच्या कारणावरून कुऱ्हाडीचा दांडका आणि काठींने केलेल्या मारहाणीत दोन महिलासह तिघेजण जखमी झाले. ही घटना मिरजगी (ता.अक्कलकोट) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली.

याप्रकरणी अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी सिध्दाराम गणपती पाटील, त्याचा मुलगा श्रीपती, सविता पाटील आणि सिध्दगोंडा बिराजदार (सर्व रा. मिरजगी) या चौघाविरुद्ध गुन्ह दाखल केला आहे . यासंदर्भात जखमी झालेल्या लक्ष्मीबाई गेनसिध्द पाटील (वय ५२) यांनी पोलिसात फिर्यार दाखल केली. बुधवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास पार्वती पाटील यांच्या शेतातील पत्रा शेडमध्ये वरील आरोपींनी मारहाण केली आणि ठार मारण्याची धमकी दिली. त्यात फिर्यादी, रत्नाबाई पाटील आणि मल्लिकार्जुन पाटील असे तिघेजण जखमी झाले असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार घंटे पुढील तपास करीत आहेत.



सोलापूर : जप्त हातभट्टी दारूसह तालुका पोलिस कर्मचारी.

## हातभट्टी दारू उद्ध्वस्त; ५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर :** विधानसभा निवडणुकिच्या पार्श्वभूमीवर सोलापूर तालुका अलर्ट झाले आहेत. अवैधपणे गावठी देशी दारूच्या हातभट्ट्या उध्दवस्त केल्या आहेत. यामध्ये १ लाख १९ हजार ८०० लिटर गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट, २५७ हातभट्टी दारू, ६२० प्लॅस्टिक व ३० लोखंडी बॅरेल नष्ट असे एकुण ५२ लाख ७३हजार ५०० रूपये किंमतीचा मुद्देमाल, अवैध जुगार खेळणाऱ्या २९ इसमा विरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे.५ लाख ११ हजार ४५० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. हातभट्टी दारू करीता लागणारे ४० पोते गुळ पावडर ३० कि.लो. पिकअप वाहनासह एकूण किंमत ५ लाख १० हजार रूपये असे मुद्देमाल जप्त करून कारवाई करण्यात आली तालुका, पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांचे नेतृत्वाखाली वडजी तांडा, सिताराम ताडा, मुळेगाव ताडा, पोचु ताडा, सेवालालनगर तांडा, गणपत-तिऱ्हे तांडा आदी भागात कारवाई करण्यात आली आहे.

## वेळापुरात नामदेव महाराज रथ, सायकल यात्रेचे मंगळवारी आगमन

**वेळापूर :** भागवत धर्म प्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव समाजोन्नती परिषद व समस्थ नामदेव शिंपी समाजाच्या वतीने आयोजित श्री क्षेत्र पंढरपूर (महाराष्ट्र) ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या संत नामदेव महाराज रथ व सायकल यात्रेचे मंगळवार १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता वेळापूर येथे आगमन होणार असल्याची माहिती संत नामदेव समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष अनंत जवंजाळ यांनी दिली.

संत ज्ञानदेव व संत नामदेव महाराजांनी १२ व्या शतकात उत्तर भारतात जाऊन श्री विठ्ठल भक्तिचा व भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला आहे. नामदेव महाराज यांची घुमाण येथे वस्त्र समाधी आहे. मुगल सम्राट मोहंमद तुघलक यांचे नातू फिरोजशा तुघलक यांनी घुमाण येथे संत नामदेव महाराजांचे मंदिर उभारले आहे . हा विठ्ठल भक्तीचा व शांती, समता व बंधूता हा भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी प्रतिवर्षी ही यात्रा काढली जाते. यात्रेचे हे तिसरे वर्ष आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा व पंजाब राज्यातुन सुमारे २५०० किलोमिटरचा प्रवास करीत ही यात्रा सोमवार २ डिसेंबर रोजी चंदिगड येथे पोहोचणार आहे.. ही यात्रा बुधवार दि. ४ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र घुमाण येथे पोहोचेल. यात्रेत १५० सायकल यात्री व भाविक सहभागी झाले आहेत . वेळापूर येथे यात्रेच्या स्वागताची जय्यत तयारी झाली असून वेळापूर येथील श्री अर्धनारी नटेश्वर मंदिराच्या समोरील प्रांगणात सर्व नामदेव शिंपी समाज व भाविकांच्या वतीने यात्रेचे स्वागत करण्यात येणार असल्याचे जवंजाळ यांनी सांगितले.

## कुमठेत विवाहित इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** कुमठेगाव (ता.उत्तर सोलापूर) येथे राहणाऱ्या इक्बाल मन्नू शेख (वय ४३) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी दुपारच्या उघडकीस आली. घरात कोणी नसताना त्याने गुरुवारी दुपारी छताच्या लाकडी वाशाला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. मयत इक्बाल शेख याच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. तो मजुरी करीत होता. त्याला दारूचे व्यसन होते त्यातून त्याला आजार जडला होता. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे. हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

### कुत्र्याला धडकल्याने दुचाकी वरील मुलगा दगावला



दुचाकीवरून जाताना वाटेत कुत्रा आडवा आल्याने मोटरसायकल स्लीप होऊन कोसळल्याने १६ वर्षीय मुलगा गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात बेगम पेठ परिसरातील अप्सरा हॉटेल जवळ गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडला. मुस्तकीम अनिस बागवान (वय १६ रा. बेगमपेठ) असे मयत झालेल्या मुलाचे नाव आहे. तो गुरुवारी यदुल्ला इमरान बिद्री (रा.बेगम पेठ) याच्यासोबत दुचाकीवरून विजापूर वेस ते रंगभवनच्या दिशेने निघाले होते. अप्सरा हॉटेल जवळ कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून दोघेही खाली कोसळून गंभीर जखमी झाले होते. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी मुस्तकीम बागवान हा मरण पावला.

## कार्तिकी यात्रेसाठी रेल्वेकडून विशेष गाड्यांची सोय

### १५ नोव्हेंबरपर्यंत विविध स्थानकांवर धावणार गाड्या



**सोलापूर :** कार्तिकी यात्रेसाठी राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूरला येत असतात. यात रेल्वेने येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. याच पंढरीच्या भाविकांसाठी मध्य रेल्वेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यात्रेकरूंच्या सोयीसाठी विशेष अनारक्षित गाड्या चालवण्यात येणार आहेत. ८ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत या गाड्या विविध स्थानकांवरून पंढरपूरकडे चालवण्यात येणार आहेत. याबाबतची माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

लातूर-पंढरपूर-लातूर या विशेष गाडीच्या ३ फेऱ्या होणार आहेत. १२ व १५ नोव्हेंबर रोजी लातूर स्थानकावरून ही विशेष गाडी सकाळी ७.३० सुटणार आहे. तर पंढरपूर-लातूर ही विशेष ट्रेन १२ व १५ नोव्हेंबर रोजी पंढरपूर स्थानकावरून दुपारी १.५० वाजता सुटणार असून, लातूर रेल्वे स्थानकांवर सायंकाळी ७.२० वाजता पोहोचणार आहे मिरज - पंढरपूर - मिरज रेल्वे १० नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता मिरज रेल्वे स्थानकावरून सुटेल आणि सकाळी ७. ४० वाजता पंढरपूर रेल्वे स्थानकावर पोहोचेल. मिरज - कुर्डुवाडी विशेष

मिरज - कुर्डुवाडी - मिरज विशेष रेल्वे १० ते १० नोव्हेंबर पर्यंत मिरज स्थानकावरून दुपारी ३.१० वाजता सुटेल पंढरपूर स्थानकावर ५. ३० वाजता पोहोचेल आणि पुढे कुर्डुवाडी स्थानकावर सायंकाळी ७ वाजता पोहोचेल. बिदर -पंढरपूर विशेष गाडी ११ नोव्हेंबर रोजी बिदर येथून रात्री १०. १५ वाजता सुटेल आणि पंढरपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ६.२० वाजता पोहोचेल. नांदेड-पंढरपूर-आदिलाबाद विशेष गाडी स्पेशल नांदेड येथून दि. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.२० वाजता सुटेल आणि पंढरपूर येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ७. ३० वाजता पोहोचेल.

## महाज्ञानी स्कंद वीरशैवांचे गोत्र पुरुष : श्रीकाशी जगद्गुरू

### श्रीकाशीपीठात स्कंदषष्ठी उत्साहात साजरी

**वाराणसी :** शिवपुत्र स्कंद अत्यंत पराक्रमी आणि महाज्ञानी आहेत. स्कंदानी लहानपणीच शिवाच्या मांडीवर बसून ओंकार शब्दाचा अर्थ शिवाला समजावून सांगितला होता. वीरशैव धर्माचे वीर, नंदी, भृंगी, वृषभ, स्कंद हे पाच गोत्र पुरुष आहेत. वीरशैवांच्या पंचपीठांपैकी श्रीकाशीज्ञानसिंहासन महापीठाचे स्कंद हे गोत्रपुरुष आहेत. शिवधर्मोत्तर सिद्धान्त प्रतिपादन करणारे ते पहिले आचार्य मानले जातात असे श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी आपल्या आशीर्वचनात सांगितले.

श्रीकाशीपीठातील स्कंदषष्ठी निमित्त संपन्न झालेल्या धर्मसभेत आशीर्वचन देताना महास्वामीजी म्हणाले. दरवर्षी स्कंदषष्ठीनिमित्त स्कंद पूजा, बिल्वार्चन असे कार्यक्रम सहा दिवस आयोजित केले जातात. समारोपाच्या निमित्ताने स्कंद मूर्तीची विधिवत पूजा करण्यात आली. स्कंदषष्ठी हा दिवस म्हणजे स्कंदांचा प्रकटदिन आणि तारकासुराचा त्यांनी केलेला वध दिन आहे. स्कंदांची कार्तिकेय, सेनानी, शरजन्मा, षडानन, गुह, शिखीवाहन, तारकारी, कुमार, षाण्मातुर, शरवण, सुब्रमण्य, मुरुगण अशी अनेक नावे प्रसिद्ध आहेत. माझा अंत शिवपुत्राकडूनच व्हावा असे वरदान तारकासुरानी ब्रह्माकडून मागितले होते. हे



वचन पूर्ण करण्यासाठी स्कंदांचा जन्म झाला. जात, पंथ अशा प्रकारचा कोणताही भेद न करता सारे भक्त स्कंदाची पूजा करतात. स्कंदानी सर्वप्रथम शिवमहिमा अगस्त्य मुनींना प्रतिपादन केली. जगद्गुरू रेणुकाचार्यांनी अगस्त्य मुनींना उपदेश करण्यापूर्वी शिवधर्मोत्तर शास्त्राचे प्रबोधन स्कंदानी अगस्त्य मुनींना केले होते. श्रीकाशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सान्निध्यात हा समारंभ संपन्न झाला. या पूजेमध्ये कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेश येथील भक्तगण, जगद्गुरू विश्वाराध्य गुरुकुलातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**सोलापूर :** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी २ नोव्हेंबर २०२४ पासून सकाळी ८ वाजल्यापासून ते १६ नोव्हेंबर २०२४ रात्री ८ वाजेपर्यंत या कालावधीत मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत असे अपर जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उप जिल्हा अधिकारी मनिषा कुंभार यांनी सांगितले.


या आदेशानुसार शस्त्रे, भाले, तलवारी, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा होईल अशी सर्व प्रकारची वस्तू बरोबर नेणे किंवा बाळगणे, ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा,प्रतिमाचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे यासह इतर आदेश लागू करण्यात आले आहेत. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ट वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पो.अ. उपविभागीय पोलीस अधिकारी, पो.नि. दुय्यम पोलीस निरीक्षकांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत असेही त्यांनी कळविले.

# अकलूज बाजार समितीच्या घोडेबाजारात कोटींची उलाढाल

## दोन दिवसात १८० घोड्यांची विक्री

**अकलूज/प्रतिनिधी**

अकलूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या घोडेबाजारासाठी सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या नियोजनाखाली यावर्षी ७१० घोड्यांची आवक झाली आहे. २ ते ३ दिवसात अजून ७०० ते ८०० घोडे दाखल होतील तर आजअखेर १८० घोड्यांची विक्री झालेली असून २ कोटीची उलाढाल झाल्याची माहिती बाजार समितीचे सचिव राजेंद्र काकडे यांनी दिली.



अकलूज : बाजार समितीच्या आवारात विक्रीसाठी दाखल झालेले घोडे.

सन २००९ साली अकलूज कृषि उत्पन्न बाजार समितीच्या घोडेबाजाराला विजयसिंह मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली सुरवात झाली. यंदा अकलूजच्या घोडेबाजारात मारवाड, पंजाब, नुखरा, उत्तरप्रदेश, गुजरात, बिहार आदी विविध राज्यातून जातींवंत अश्व घेऊन व्यापारी येत आहेत.घोडे व्यापारांची अकलूजला विशेष पसंती असण्याचे कारण बाजार आवारामध्ये चहुबाजूने तटबंदी आहे. ७०० चिंचेची झाडे आहेत. त्यामुळे घोड्यांचे उन्हापासून संरक्षण होते. व्यवहारातील खरेदी-विक्रीची फोटोसहीत संगणकीय पावती दिली जाते. घोडेबाजारात २४ तास पाणी व वीज पुरवठा केला जातो. वेळोवेळी जंतूनाशक फवारणी केली जाते तसेच वैद्यकीय तपासणीही केली जाते. घोड्यांसाठी लागणारा मुबलक ओला चारा आदी सुखसोईंनी युक्त बाजारामुळे अकलूज घोडेबाजाराचे नाव अल्पावधीतच भारतात अग्रक्रमाने घेतले जाते. अकलूजच्या घोडेबाजारामुळे तालुक्यातील अर्थकारणात महत्वाची भूमिका बजावली जाते. या घोडेबाजारामुळे हॉटेल, लॉज, मालवाहतुक वाहनधारक, किराणा व्यापारी, चारा विकणारे, घोड्याचे साज विकणारे व्यापारी तत्सम घटकाला अधिकचा फायदा होतो. त्यामुळे व्यावसायिकांना उत्पन्नाचा नविन स्रोत मिळाला आहे.



## कर्मयोगी इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

**पंढरपूर :** बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजीकल यूनिव्हर्सिटी लोणेरे अंतर्गत आंतर महाविद्यालयीन खो खो विभागीय क्रिडास्पर्धेमध्ये पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अभियांत्रिकी महाविद्यालय शेळवे पंढरपूर येथील विद्यार्थ्यांनी यश संपादित केले आहे.

विभागस्तरावरील या स्पर्धेमध्ये कर्मयोगीच्या पुरुषगटाने उपविजेतेपद व महिला संघाने सलग तिसर्या वर्षी विजेता होण्याचा मान मिळविला आहे. स्पर्धेचे आयोजन सोलापूरच्या ए.जी. पाटील महाविद्यालयात करण्यात आले होते. शिवानी बागल हिचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरव करण्यात आला. क्रीडा स्पर्धेसाठी शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. गणेश बागल यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांचे रोहन परिचारक, डॉ. एस.पी. पाटील, डॉ.एबी कणसे, जी डी वाळके, प्रा.जेएल मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. आशीष जोशी, गणेश बागल तसेच सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




# काश्मिरातील केशरची शेती आपल्या मराठवाड्यातही शक्य

## निवृत्त कृषी अधिकाऱ्याने केली केशर फार्माची निर्मिती

✔ **छत्रपती संभाजीनगर** : येथे जम्मू काश्मीरसारखे थंड वातावरण घरातील बंद खोलीत तयार करून केशर शेतीचा आगळा-वेगळा प्रयोग शहरातील एका निवृत्त कृषी अधिकाऱ्याने केला.

त्यांच्या या प्रयोगाला यशही आले असून, केशर उत्पादनाला सुरुवात झाली. या प्रयोगाची माहिती मिळताच विभागीय कृषी सहसंचालक डॉ. तुकाराम मोटे यांनी केशर फार्मला भेट देत या प्रयोगाचे कौतुक केले.

छत्रपती संभाजीनगर येथील उस्मानपुरा भागातील संजय हाउसिंग सोसायटीतील रहिवासी निवृत्त कृषी अधिकारी लक्ष्म ीकांत अपसिंगेकर आणि त्याांची पती मीना अपसिंगेकर यांनी यू ट्यूब वर केशर शेतीविषयी माहिती घेतली.

पुण्यातील अक्षय मोडक यांनी केशर फार्मिंगचा प्रयोग केल्याचे त्यांना समजले. त्यांनी पुण्यात जाऊन केशर फार्मिंगचे ट्रेनिंगही घेतले. बंगल्यातील ९ बाय ११ चौरस फूट आकाराच्या



खोलीत काश्मीरसारखे थंड वातावरण तयार केले.

काश्मीरमधील सरासरी तापमान आणि आर्द्रतेचा अभ्यास करून खोलीतील हवेतील आर्द्रता ७० टक्के राहावी, याकरिता एअरोफोनिक यंत्राद्वारे तर कूलिंग तंत्रज्ञानाद्वारे खोलीचे तापमान दिवसा २१ अंश सेल्सिअस तर रात्रीचे तापमान ८ अंश सेल्सिअस असे मेंटेन केले.

पिकाला आवश्यक तापम ान मिळावे, यासाठी लाइटची व्यवस्था केली. ८०० रुपये प्रती किलो याप्रमाणे ८० किलो केशरकंद विकत आणून ट्रे मध्ये त्यांची लागवड केली. साडेतीन महिन्यांनी केशरचे उत्पादन सुरू झाले.

**केशरला प्रति किलो पाच लाख रुपये दर**

▶▶ आयुर्वेदात केशरचे अनेक गुणकारी लाभ सांगितले आहेत. यामुळे केशरला जगभर मागणी असते. भारतातील जम्मू, काश्म ीरमध्येच केशर शेतीला पूरक हवामान आहे.

▶▶ देशातील एकूण म ागणीच्या केवळ ११ टक्केच उत्पादन होते. यामुळे सुमारे ८९ टक्के केशरची आयात करावी लागते. मागणीच्या तुलनेत उत्पादनही कमी असल्याने केशरला आज सुमारे पाच लाख रुपये प्रति किलो असा दर आहे.

**मराठवाड्यातील शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणार**

यावर्षी २०० ते २५० ग्रॅम केशर उत्पादन होण्याची शक्यता अपसिंगेकर यांनी वर्तविली. पुढील दोन वर्षांत खर्च वसूल होईल, यानंतर ही केशर फार्मिंग नफ्यात असेल.

हा मराठवाड्यातील पहिला केशर फार्म प्रयोग आहे. म राठवाड्यातील शेतकऱ्यांनी केशर शेती करावी, यासाठी त्यांना प्रशिक्षण देणार आहे.

**केशर कंद चेही उत्पादन लॅबमध्येच घेणार**

केशर उत्पादनासाठी केशर कंदची गरज असते. केशरचे उत्पादन निघाल्यानंतर केशर कंदची कोकोपीट, पोयटा माती आणि गांडूळ खत टाकलेल्या मातीत लागवड करण्यात येते.

यानंतर अद्रकसारखे एका कंदाचे अनेक कंद तयार होतात. हे कंद पुढील उत्पादनासाठी वापरता येते.

अपसिंगेकर हे आता त्यांच्या केशर फार्मिंग लॅबमध्ये केशरकंदाची लागवड करणार आहेत. यातून मिळणारे कंद पुढील उत्पादनासाठी त्यांना वापरता येतील.



# डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाने भारतीय स्थलांतरित चिंतित का आहेत?

✔ **नवी दिल्ली** : जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या निवडणुकीचा प्रभाव एकूणच जगावर होणार हे सहाजिक आहे. ट्रम्प यांच्या विजयानंतर अमेरिकेतील स्थलांतरितही चिंतेत आहेत.

**ट्रम्प यांच्या विजयानंतर अमेरिकेतील स्थलांतरितही चिंतेत आहेत.**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बहुमत मिळाले आहे, त्याාम ुळे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान होणार आहेत. जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या निवडणुकीचा प्रभाव एकूणच जगावर होणार हे सहाजिक आहे. ट्रम्प यांच्या विजयानंतर अमेरिकेतील स्थलांतरितही चिंतेत आहेत. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प एच-१ बी व्हिसा कार्यक्रमाबाबत काय निर्णय घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आपल्या पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी व्हिसाबाबत काही कठोर निर्णय घेतले होते; ज्यामुळे अमेरिकेतील स्थलांतरित अडचणीत आले होते. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात व्हिसाविषयी काय निर्णय घेण्यात आले होते? त्यााविषयी जाणून घेऊ.

**एच-१ बी व्हिसा कार्यक्रम काय आहे?**

एच-१ बी व्हिसा अमेरिकेत काम करण्यासाठी येणाऱ्यांना दिला जातो. यूएस डिपार्टमेंट ऑफ लेबरच्या म्हणण्यानुसार, एच -१ बी व्हिसा हा नॉन इमिग्रंट व्हिसा असून अमेरिकी कंपन्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सैद्धांतिक आणि तांत्रिक तज्ज्ञांच्या विशेष पदांवर परकीय व्यक्तींची नोकरभरती करण्याची परवानगी देतो. एच -१ बी हाच व्हिसा घेऊन भारतीय अमेरिकेत जातात, तसेच याच व्हिसावर भारतीय मोठ्या संख्येने तिथे नोकरी करतात. अमेरिकी सरकारने प्रत्योक आर्थिक वर्षात नवीन एच -१ बी व्हिसाची एकूण संख्या ६५ हजारांपर्यंत मर्यादित केली आहे. ज्यांनी यूएस संस्थेतून पदव्युत्तर पदवी किंवा उच्च पदवी प्राप्त केली आहे, त्यांना आणखी २० हजार व्हिसा दिले जाऊ शकतात. उच्च शिक्षण संस्था, ना-नफा संस्था किंवा सरकारी संशोधन संस्थांमध्ये कार्यरत असलेले कामगार एच-१ बी व्हिसा कॅपमध्ये समाविष्ट नाहीत.

**किती भारतीय एच-१ बी कार्यक्रमाचा लाभ घेतात?**

अमेरिकी सरकारच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, गेल्या काही वर्षांत भारतीय मोठ्या संख्येने एच-१ बी व्हिसाचा लाभ घेत आहेत. या वर्षी मार्चम ध्ये यूएस सिटिझनशिप अँड इमिग्रेशन सर्व्हिसेस () च्या अहवालानुसार, २०२३ च्या आर्थिक वर्षात मंजूर एकूण ३.८६ लाख एच-१ बी व्हिसांपैकी ७२.३ टक्के म्हणजेच २.७९ लाख भारतीयांचे व्हिसा होते. २०२३ मध्ये मंजूर झालेल्या एकूण एच-१ बी व्हिसांपैकी ११.७ टक्के व्हिसा चिनी कामगारांचे होते. २०२३ मध्ये सर्व एच-१ बी व्हिसांपैकी ६५ टक्के संगणक क्षेत्राशी संबंधित व्यवसायांचा होता, त्याानंतर त्याा आर्किटेक्चर, अभियांत्रिकी, सर्वे क्षण आणि शिक्षण क्षेत्रांचाही समावेश होता.

**गेल्या काही वर्षांत एच-१ बी व्हिसाची संख्या कशी बदलली आहे?**

८ ऑक्टोबर रोजी अमेरिकन इमिग्रेशन कौन्सिलच्या अहवालानुसार, कोविड-१९ निर्बंधांमुळे २०२० मध्ये एच-१ बी व्हिसाधारकांची संख्या घटली आहे. ''डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी ऑफिस ऑफ होमलँड सिक्युरिटी स्टॅटिस्टिक्सने अहवाल दिला आहे की, देशात दाखल झालेल्या एच-१ बी प्राप्तकर्त्यांची संख्या आर्थिक वर्ष २०१८ मध्ये ५,७०,३६८ वरून आर्थिक वर्ष २०१९ मध्ये ६,०१,५९४ पर्यंत वाढली आणि नंतर आर्थिक वर्ष २०२० मध्ये ३,६८,४४० पर्यंत कमी झाली. ट्रम्प सरकारद्वारे एच-१ बी सारख्या नॉन-इमिग्रंट वर्क व्हिसावर लावण्यात आलेले निर्बंध बायडेन सरकारने हटवले नाही. आर्थिक वर्ष २०२१ मध्ये कोविड-१९ च्या प्रादुर्भावाने एच-१ बी व्हिसाची संख्या १,४८,६०३ पर्यंत खाली आली,'' असे त्त्याा नमूद करण्यात आले आहे.

२०२२ मध्ये प्रवेशांची संख्या ४.१० लाख आणि नंतर २०२३ मध्ये ७.५५ लाखांपर्यंत वाढली. अहवालात असे आढळून आले की, ट्रम्प प्रशासनाच्या कार्यकाळात एच-१ बी अर्ज नाकारण्याचे प्रमाण २०१६ मध्ये सहा टक्क्यांवरून २०१८ मध्ये २४ टक्क्यांपर्यंत वाढले. २०१९ मध्ये हे प्रमाण २१ टक्के, २०२० मध्ये १३ टक्के आणि २०२१ मध्ये चार टक्क्यांपर्यंत कमी झाले. २०२२ मध्ये अर्ज नाकारण्याचे प्रमाण दोन टक्क्यांवर आले, असेही त्त्याा म्हटले आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात एच-१ बी व्हिसाबाबत घेतलेली कठोर भूमिका पाहता, स्थलांतरितांमध्ये चिंता आहे. असे झाल्यास अमेरिकेत भारतीयांसाठी नोकरीच्या संधी कमी होतील अशी भीती आहे.

# 'योजनां'वरचा वाढता खर्च चिंतेची बाब : दास

केंद्र आणि राज्यांचा भांडवली खर्च, वेगवेगळ्या योजनांसाठी उच्च अनुदानारूपाने वाढती तरतूद ही चिंतेची बाब बनली असून, त्यााचा अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या (जीडीपी) दरावर विपरीत परिणाम संभवतो, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी बुधवारी केले.

> **'अर्थव्यवस्था मंदावली म्हणण्याची घाई नको'**
>
> काही विश्लेषकांच्या म्हणण्याला दुजोरा म्हणून 'अर्थव्यवस्था मंदावली आहे हे घोषित करण्याची मी घाई करणार नाही,' असे नमूद करत गव्हर्नर दास म्हणाले की, 'अर्थव्यवस्थेची चक्रीय वाढ तूर्त मंदावली आहे.' रिझर्व्ह बँकेच्या बोधचिन्हांत अंकित वाघाचे स्मरण करून देत ते म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेला वाघाचे बळ मिळाले आहे, तर रिझर्व्ह बँक तिला चपळता प्रदान करत आहे, हा देखील वाघाचाच आणखी एक गुण आहे.

मुंबई: केंद्र आणि राज्यांचा भांडवली खर्च, वेगवेगळ्या योजनांसाठी उच्च अनुदानारूपाने वाढती तरतूद ही चिंतेची बाब बनली असून, त्यााचा अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या (जीडीपी) दरावर विपरीत परिणाम संभवतो, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी बुधवारी केले.म ुंबईतील आयोजित वित्तीय क्षेत्राविषयक परिषदेत दास बोलत होते. ते म्हणाले की, अनुदानरूपी खर्च खूप जास्त आहे आणि पहिल्या तिमाहीत हा वाढता सरकारी खर्च जीडीपीच्या आकड्याला खाली खेचत आहे.




सरलेल्या एप्रिल-जून तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था ६.७ टक्के दराने वाढली. रिझर्व्ह बँकेच्या ७.१ टक्क्यांच्या पूर्वानुमानापेक्षा हा दर कमी राहिला. २०२४-२५ च्या जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीसाठी विकासदराची आकडेवारी येत्याा २९ नोव्हेंबर रोजी जाहीर केली जाईल. दास यांच्या मते, उच्च अनुदानपोटी खर्चाचा या आकड्यांवर नकारात्म क परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. तथापि, देशांत आर्थिक क्रियाकलाप खूपच दमदार आहेत, अशी पुस्तीही त्याांनी जोडली.

दुसऱ्या तिमाहीत ७.२ टक्के दराने जीडीपी वाढण्याचे रिझर्व्ह बँकेचे अनुमान आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा (आयएमएफ) ७ टक्क्यांचा अंदाज, तर अनेक जागतिक पतमानांकन संस्थांनीदेखील भारतासाठी सात टक्क्यांपेक्षा अधिक वाढीचा सुधारित अंदाज वर्तविला आहे.



# पश्चिम महाराष्ट्रात बहुतांश साखर सम्राट उतरले मैदानात

✔ **सातारा** : यशवंतराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, बाळासाहेब देसाई, तात्यासाहेब कोरे, रताप्पा कुंभार, नागनाथ नायकवडी यांच्या सहकारातील योगदानाम ुळे पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखानदारी चांगलीच रुजली. या कारखानदारीच्या निमित्ताने अनेकांना रोजगार देत आहेत. शेतकऱ्यांना उसासारखे पीक घेऊन चार पैसे हातात पडू लागले. साहजिकच हाच शेतकरी त्याा कारखान्याशी आणि पर्यायाने कारखान्याच्या संस्थापकाशी जोडला गेला. निवडणुकीत हेच कारखानदार उभे राहिल्याने शेतकरी मतदार झाला आणि कारखानदार नेते झाले. पश्चिम महाराष्ट्रात सध्याच्या निवडणुकीत असे जवळपास २५ हून अधिक कारखानदार निवडणूक रिंगणात आहेत.

सातारा, सांगली, कोल्हापूर या भागात साखर कारखानदारी आणि सूत गिरण्या हे सहकारातील उद्योग चांगले रुजले आहेत. या उद्योगांच्या निमित्ताने गावातील अनेक तरुणांना रोजगार देता आला. त्यांचे संसार उभे राहिले आहेत. त्याामुळे हे लोक साखर आणि सूत गिरणी कारखानदारांशी जोडले गेले आहेत. यांच्या मदतीनेच अनेकांना विधानसभा निवडणुकीत आपला विजय सोपा करणे शक्य होते.

**सातारा** : बाळासाहेब पाटील, अतुल भोसले, म नोज घोरपडे, प्रभाकर घार्गे, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मकरंद पाटील या उमेदवारांच्या ताब्यात साखर कारखाने आहेत. कोणी या कारखान्यांचे चेअरमन आहे तर कोणी संचालक.

**सांगली** : मानसिंगराव नाईक, पलूस कडेगाव संग्राम सिंह देशमुख, विश्वजीत कदम, तासगाव कवठेमहांकाळ संजयकाका पाटील, जयंत पाटील तर सहा उमेदवार हे बँका आणि कारखान्याचे संचालक आहेत.

**कोल्हापूर** : के. पी. पाटील, चंद्रदीप नरके, राहुल पाटील, राजू आवळे, अमल महाडीक, हसन मुश्रीफ, सम रजीत घाटगे, विनय कोरे, राहुल आवाडे, गणपतराव पाटील, ए. वाय. पाटील, राजेश पाटील, नंदिनी बाभूळगावकर हे उमेदवार सहकारी कारखानदारी आणि सूत गिरण्यांशी संबंधित आहेत.

# रिटायरमेंटनंतर नशीब फळफळणार, तुम्हाला किती पेन्शन मिळणार? EPFO सदस्यांनी हा फॉर्म्युला लक्षात ठेवा!

✔ **नवी दिल्ली** : खासगी नोकरदारांना निवृत्तीनंतर ईपीएफओ पेन्शन पुरवते. कर्मचारी पेन्शन योजना म्हणजेच ईपीएस सेवानिवृत्ती योजना जी ईपीएफओद्वारे व्यवस्थापित केली जाते. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मूळ + डीए रकमेच्या १२% रक्कम दरमहा ईपीएफमध्ये जमा केली जाते तर तेवढीच रक्कम नियोक्ता/कंपनीद्वारे देखील जमा केली जाते पण नियोक्ता/कंपनीचा हिस्सा दोन भागांमध्ये विभागला जातो पहिला ८.३३% कर्मचारी पेन्शन योजनेत आणि ३.६७% दरमहा ईपीएफमध्ये जमा होतो.

मात्र ईपीएस अंतर्गत या पेन्शन सुविधेचा लाभ घेण्यासाठी किमान दहा वर्षांसाठी ईपीएसम ध्ये योगदान देणे आवश्यक आहे. म्हणजे कर्मचाऱ्याने किमान दहा वर्षे नोकरी केली पाहिजे तर कम ाल पेन्शनपात्र सेवा ३५ वर्षे आहे. आता आपण असा एक फॉर्म्युला जाणून घेऊ ज्याद्वारे तुम्हाला निवृत्तीनंतर किती पेन्शन मिळेल याची गणना करता येईल?

पेन्शन कॅल्क्युलेट करण्याचे सूत्र



निवृत्तीनंतर तुम्हाला ईपीएफओ कडून किती पेन्शन मिळेल याची गणना करण्यासाठी - ईपीएस = सरासरी पगार X पेन्शनयोग्य सेवा/%० - हे सूत्र वापरले जाते. या सूत्रात सरासरी वेतन म्हणजे मूळ वेतन + डीए होते ज्याची गणना गेल्या १२ महिन्यांच्या आधारे केली जाते. पेन्शनयोग्य सेवा म्हणजे तुम्ही किती वर्षे काम केले असून कमाल पेन्शनयोग्य सेवा ३५ वर्षे असते. तसेच पेन्शनपात्र वेतन जास्तीत जास्त रु. १५ हजार असल्यास पेन्शनचा जास्तीत जास्त हिस्सा १५०००८.३३ = रु. १,२५० प्रति महिना होतो.

उदाहरणार्थ जास्तीत जास्त योगदान आणि सेवा वर्षांच्या आधारावर ईपीएस पेन्शन कॅल्क्युलेशन समजायचे तर समजा तुमचा सरासरी पगार रु १५ हजार आहे आणि तुम्ही ३५ वर्षे काम केले आहे. अशा स्थितीत, वरील फॉर्म्युलानुसार ईपीएस = १५००० X ३५/७० = ७,५००० रुपये प्रति महिना होते. म्हणजे कर्मचारी ईपीएफओ कडून जास्तीत जास्त ७,५०० रुपयांपर्यंत पेन्शन घेण्यास पात्र ठरतो. त्याचवेळी, कर्मचारी किम ान १,००० रुपयांपर्यंत पेन्शन घेऊ शकतो. अशाप्रकारे तुम्ही वरील सूत्र वापरून तुमचा सरासरी पगार आणि नोकरीच्या एकूण वर्षांच्या आधारे तुमची पेन्शन रक्कम मोजू शकता.

ईपीएस मध्ये योगदान दहा वर्षांपेक्षा कमी असल्यास


दुसरीकडे, कर्मचाऱ्याने एझड मध्ये दहा वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी योगदान केले आणि पुढे काम करण्याचा त्यांचा इरादा नसेल तर अशा परिस्थितीत, कर्मचारी ईपीएफओची रक्कम तसेच ईपीएसमध्ये जमा केलेली रक्कम म्हणजेच पेन्शन खाते कोणत्याही वेळी काढू शकतो.

# मल्टीबॅगर शेअरचे तुफान! झटपट पैसा वाढवणारा लाख मोलाचा स्टॉक ठरला रॉकेटसिंग, लोकांचे नशीब फळफळले

✔ **मुंबई** : भारतीय शेअर बाजारातील एक शेअर कमाल, धमाल आणि मालामाल करत आहे. काही दिवसांपूर्वी मद्रास रबर फॅक्टरी लिमिटेड म्हणजेच MRF कंपनीचा शेअर देशातील सर्वात महागडा होता पण अलीकडेच एका स्मालकॅप स्टॉकने पछाडले आणि भारतीय शेअर बाजारात सर्वात महागडा शेअर बनला. पण हा स्टॉक इथवरच थांबला नाही तर आणखी काही पावलं पुढे जात तीन लाख मनसबदार बनला तर चतक्र शेअर अजूनही दीड लाखाच्या जवळ खेळत आहे.

**शेअर बाजारातील सर्वात महागडा शेअर आणखी महागला**

एल्सिड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड शेअर कंपनीचा शेअर २९ ऑक्टोबर रोजी बीएसईवर पुन्हा लिस्ट झाले आणि या कंपनीचे मार्केट कॅप ४,८०० कोटी रुपयांवर पोहोचले. गेल्या काही दिवसांपासून एलसिड इन्व्हेस्टमेंटचे शेअर्स शेअर बाजारात चर्चेचा विषय बनले असून या स्टॉकचा रॉकेटपेक्षाही सुसाट वेग गुंतवणूकदारांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे. गेल्या आठवड्यात अल्सिड इन्व्हेस्टमेंटच्या समभागांनी शेअर बाजारात ऐतिहासिक नफा मिळवला आणि गुंतवणूकदारांना कोट्याधीश केलं.



देशांतर्गत बाजारातील घसरणीतही आज, ७ नोव्हेंबर रोजी, एलसिड इन्व्हेस्टमेंट्सच्या समभागांनी तीन लाख रुपयांची पातळी ओलांडली आणि ३,१६,५९७ रुपयांवर उसळी घेतली. या स्मॉलकॅप कंपनीच्या शेअर्सनी एका दिवसात ३.३५ रुपयांवरून ६६,९२,५३५% वाढ साधली त्यानंतर, MRF ला मागे टाकले आणि देशातील सर्वात महाग स्टॉक बनला. त्याचवेळी या कंपनीच्या समभागांनी गुरुवारी पुन्हा एकदा अप्पर सर्किटला धडक दिली. एलसिड इन्व्हेस्टमेंटचे शेअर्स बुधवारी ३,०१,५२१.४० रुपयांच्या बंद किमतीवरून ५% उसळी घेत ३,१६,५९७.४४ वर पोहोचले. अशाप्रकारे, अवघ्या सात दिवसांत हा मल्टीबॅगर स्टॉकने ३ रुपयांवरून ३ लाख रुपयांपर्यंत हनुमान उडी घेतली आहे. गेल्या पाच दिवसात कंपनीच्या शेअर्समध्ये १५% पेक्षा जास्त वाढ नोंदवली ज्यामध्ये शेअरची किंमत ४३,००० रुपयांनी वधारली.

त्याचवेळी, एलसिड इन्व्हेस्टमेंटच्या शेअर्समध्ये गेल्या सहा ट्रेडिंग सत्रांमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली असून या कालावधीत शेअरची किंमत ५८,००० रुपयांहून अधिक वधारली. कंपनीच्या शेअरचा उच्चांक ३,१६,५९७.४४ रुपये तर, नीचांकी किंमत ३.३७ रुपये आहे.

# गोव्यात टॅक्सी माफिया, विदेशी पर्यटकांची संख्या घटली

गोवा/प्रतिनिधी

**गोवा, हे अनेक वर्षांपासून विदेशी पर्यटकांना भारतात येण्यासाठी आकर्षित करत आहे. मात्र कोविड काळानंतर गोव्यातील परदेशी पर्यटकांची संख्या घटू लागली आहे. गोव्यात हॉटेल परवडत नाहीत, टॅक्सीची सुविधाही महागली असल्याच्या तक्रारी पर्यटक करत आहेत. तसेच गोव्यापेक्षा श्रीलंकेला प्राधान्य दिले जात असल्याच्या काही पोस्ट सोशल मीडियावर लिहिल्या जात आहेत. यावर आता गोव्याच्या पर्यटन विभागाने उत्तर दिले आहे. भारतातील एखाद्या राज्याची तुलना श्रीलंकेसारख्या देशाशी करणे अत्यंत चुकीचे आहे, असे गोवा पर्यटन विभागाने म्हटले आहे. यातून गोव्याबद्दल चुकीचा दृष्टीकोन मांडला जात आहे, असेही विभागाने म्हटले आहे.**

गोव्याच्या पर्यटन व्यवस्थेतील त्रुटी काही जणांनी दाखवून दिल्यानंतर पर्यटन विभागाने त्याची दखल घेतली आहे. पर्यटन विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, गोवा हे भारतातील राज्य आहे. त्यामुळे त्याची तुलना शेजारी देशांशी करणे चुकीचे आहे. गोव्यासमोर नक्कीच काही अडचणी आहेत. गोव्यात आंतरराष्ट्रीय स्तरवरून येणाऱ्या विमानांची संख्या कमी आहे. ही कमतरता दूर व्हावी, यासाठी आम्ही केंद्र सरकारशी वारंवार चर्चा करत आहोत. जर गोव्याला आंतरराष्ट्रीय फेऱ्या वाढवून मिळाल्या तर याचा नक्कीच पर्यटनाला लाभ होईल.

गोवा हे जगातील इतर शहरांप्रमाणेच असून इथले पर्यटन बाजारावर अवलंबून आहे. जर हॉटेल आणि हवाई प्रवास महागला तर पर्यटनासाठी अधिक पैसे खर्च करावे लागतात. त्यामुळे पर्यटक इतर पर्याय शोधतात. त्यामुळे गोवा पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी नेहमीच आव्हानांचा सामना करत आला आहे. जगातील काही मोठे हॉटेल्स आता गोव्यात येऊ इच्छितात.



### गोव्यात टॅक्सी माफियाचा छळ

गोव्याऐवजी अनेक विदेशी पर्यटक आता श्रीलंका, थायलंड आणि व्हिएतनामकडे वळत आहेत, अशा आशयाच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागल्यानंतर गोव्याच्या पर्यटन विभागाने यावर प्रतिक्रिया दिली. गोव्यात टॅक्सी माफियाची दादागिरी वाढली असून त्यांच्याकडून पर्यटकांचा छळ केला जात असल्याची बाब अनेकांनी उपस्थित केली. तसेच हॉटेल व्यावसायिकांनी हॉटेलमध्ये निवासासाठी गरजेपेक्षा अधिक पैसे आकारण्यास सुरुवात केल्याचीही तक्रार अनेकजण करत आहेत.

अनेक हॉटेल्सचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यामुळे गोव्यात पुन्हा एकदा पर्यटन क्षेत्र उभारी घेईल.

गोव्याच्या पर्यटन विभागाने मागच्या वर्षी सादर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२० साली कोविड काळात केवळ ३.०३ लाख विदेशी पर्यटक गोव्यात आले होते. तर दुसऱ्या वर्षी २०२१ साली कोविडच्या दुसऱ्या लाटेत केवळ २२ हजार विदेशी पर्यटकांनी गोव्याला भेट दिली होती. तर २०२२ साली हा आकडा वाढून १.७५ लाख पर्यटक गोव्यात आले. सध्या कोविड काळापूर्वी असलेला विदेशी पर्यटकांचा आकडा गोव्याला गाठता आलेला नाही.

विदेशी पर्यटक घटले असले तरी देशी पर्यटक मात्र मोठ्या संख्येने गोव्यात येत आहेत. २०२२ साली देशांतर्गत राज्यातील ७० लाख पर्यटक गोव्यात आले होते. २०१८ साली ७०.८ लाख पर्यटक गोव्यात आले होते. त्यापेक्षा हा आकडा किंचित थोडा कमी आहे.



## निवडणुकीच्या प्रशिक्षणाला नकार; मुख्याध्यापिकेवर गुन्हा दाखल

तळेगाव दाभाडे/प्रतिनिधी

निवडणुकीच्या प्रशिक्षणाला नकार दिल्यामुळे पिंपरी जवळील तळेगाव दाभाडे येथील माउंट सेंट अँन हायस्कूलच्या मुख्याध्यापिकेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रीय कामात अडथळा केल्याप्रकरणी अधिनियम १९५१ मधील कलम १३४ अंतर्गत हा गुन्हा दाखल झाला आहे.

माउंट सेंट अँन हायस्कूलच्या मुख्याध्यापिका या मावळ विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी प्रशिक्षणाबाबत दिलेले आदेश स्वीकारत नव्हत्या. त्यामुळे त्यांच्यावर हा गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार २१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत घडला आहे. या प्रकरणाचा तपास फौजदार मुल्ला करत आहेत.

दरम्यान, सध्या सगळीकडे निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. अशातच आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामांसाठी शिक्षकांना विविध कामांसाठी नियुक्त केले आहे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले जाते.



## जम्मू काश्मीरच्या विधानसभेत आमदार भिडले

श्रीनगर/प्रतिनिधी

सहा वर्षांनंतर स्थापन झालेल्या जम्मू काश्मीरच्या विधानसभेत आज खडाजंगी झाली. कलम ३७० पुन्हा लागू करण्याची मागणी अपक्ष आमदार शेख खुर्शीद यांनी केली. हातात फलक घेऊन ते विधानसभेत आल्याने गदारोळ झाला. या फलकाला भाजपा आमदारांनी वेलमध्ये येऊन निषेध नोंदवला. तर या दरम्यान दोन्ही पक्षाच्या आमदारांमध्ये हातापायीही झाली.

खासदार इंजिनिअर रशिद यांचे बंधू अपक्ष आमदार खुर्शीद शेख कलम ३७० पुन्हा लागू करणे आणि सर्व राजकीय कैद्यांची सुटका करण्याच्या मागणीसाठी फलक घेऊन सभागृहाच्या वेलमध्ये आले. खुर्शीद यांच्याकडून बॅनर काढून घेण्याच्या प्रयत्नात भाजपा आमदारांनीही वेलमध्ये धडक दिल्याने बाचाबाची झाली. सज्जाद लोन, वाहिद पारा आणि काही नॅशनल कॉन्फरन्स सदस्यांनीही खुर्शीद यांना समर्थन दिले. त्यामुळे भाजपाचे आमदार इतर आमदारांबरोबर भिडले.

विधानसभेचे अध्यक्ष अब्दुल रहीम राथेर यांच्या निर्देशनानुसार तीन आमदारांना वेलमधून बाहेर काढण्यात आले.

### कलम ३७० च्या मुद्द्यावरून सभागृहात घमासान

जम्मू-काश्मीरला पूर्वीप्रमाणे विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या ठरावावरून विधानसभेत बुधवारी जोरदार खडाजंगी झाली. अतिशय गोंधळात पूर्वीप्रमाणे जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याचा ठराव चर्चेविना मंजूर करण्यात आला. मात्र, भाजपा सदस्यांनी या वेळी गोंधळ घालून ठरावाच्या प्रती सभागृहात फाडून टाकल्या आणि अध्यक्षांविरोधात घोषणाबाजी केली.

बुधवारी वादळी चर्चा झाल्यानंतर आज (७ नोव्हेंबर, गुरुवार) पुन्हा भाजपा आमदारांनी वेलमध्ये येऊन गोंधळ घातला.

## मुंडे फॅमिलीने आपली जमीन लाटली : महाजन

मुंबई/प्रतिनिधी

दिवंगत प्रवीण महाजन यांच्या पत्नी सारंगी महाजन यांनी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मुंडे बहीण भावाने संगनमताने धाक दाखवून आणि कारस्थान रचून माझी कोट्यवधी रुपये किंमतीची जमीन हडपली असा आरोप सारंगी महाजन यांनी केला आहे.

**काय म्हणाल्या सारंगी महाजन?**

प्रवीण महाजन यांच्या नावे असलेली बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यामधील मौजे जिरेवाडी येथील गट नंबर २४० मधील करोडो रुपये किमतीची ३६.५० आर जमीन धनंजय मुंडे आणि पंकजा




मुंडे यांनी जबरदस्तीने घेतली असल्याचं सारंगी महाजन यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पत्रकार परिषदेत त्यांनी हे आरोप केले आहेत. सारंगी महाजन यांच्या या आरोपामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. यावर आता धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे काय उत्तर देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## मतदानासाठी सुट्टी न दिल्यास आस्थापनांवर कारवाई

मुंबई/प्रतिनिधी

मुंबई शहर व उपनगरातील सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम तसेच इतर आस्थापनांमध्ये कार्यरत कामगार, कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी दि. २० नोव्हेंबर रोजी सुट्टी देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांच्या मालकांविरोधात कडक कारवाई केली जाईल, अशी इशारा जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी बुधवारी दिला. भारत निवडणूक आयोग तसेच मुख्य



निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या सूचनांनुसार मुंबई शहर व उपनगरांत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबई शहर आणि दोन्ही उपनगरांतील मतदारांना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी विविध नियम जारी करण्यात आले आहेत.

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्याबाबत गगराणी यांनी आदेश दिले आहेत. सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना हा नियम लागू होणार आहे. लोक प्रतिनिधीत्व अधिनियमानुसार, एखाद्या मतदाराची नोकरीवरील अनुपस्थिती नोकरीच्या संदर्भात धोकादायक किंवा हानिकारक ठरणार असल्यास मतदारावर उल्लंघनात्मक कारवाई केली जाणार नाही.

## प्रवाशांनी भरलेली बस चालवताना ड्रायव्हरचा मृत्यू



कॅनडा/वृत्तसंस्था

आजकाल तरुणांमध्येही हृदयविकाराचे प्रमाण वाढले आहे. धडधाकट असलेल्या तरुण वयातील लोकांना हृदयविकाराचा झटका येतो. मात्र, अचानक आलेला हृदयविकाराचा झटका त्या व्यक्तीसह इतरांसाठीही जीवघेणा ठरू शकतो. बंगळुरू महानगर परिवहन मंडळाची बस चालविताना एका चालकाला हृदयविकाराचा झटका आला. बंगळुरुच्या यशवंतपूर येथे सोमवारी बस चालवित असताना ही घटना घडली.

३९ वर्षीय चालक किरण नेलमंगला ते यशवंतपूर येथे बस चालत असताना मध्येच त्याच्या छातीत दुखायला लागले आणि तो बेशुद्ध पडला. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ आता व्हायरल होत आहे.

व्हिडिओमध्ये दिसत असल्यानुसार चालक बस चालवत असतानाच अचानक कोसळताना दिसून येत आहे. यावेळी या बसच्या समोर दुसरी एक बस चालत होती, ज्याला मागून येणाऱ्या बसचा हलकासा धक्का लागला. यामुळे कंडक्टरने तात्काळ चालकाच्या केबिनकडे धाव घेतली आणि बसचा ताबा स्वतःकडे घेतला.

चालकाची शुद्ध हरपलेली पाहून कंडक्टरने बसचे नियंत्रण मिळवून ती वेळीच थांबवली आणि पुढील अनर्थ टळला. यानंतर चालक किरणला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. बंगळुरू परिवहन मंडळाने कंटक्टरच्या कृतीचे कौतुक केले आहे. त्याने वेळीच धाव घेऊन परिस्थिती हाताळल्यामुळे मोठा अपघात टळला.



## 'गोकुळ'चे माजी अध्यक्ष रवींद्र आपटे यांचे निधन

कोल्हापूर/प्रतिनिधी

दूध व्यवसायातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व, गोकुळचे माजी अध्यक्ष रवींद्र पांडुरंग आपटे (वय ७१) यांचे निधन झाले. त्यांच्यावर बुधवारी पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

एमएस्सी ॲग्रीचे शिक्षण त्यांनी घेतले होते. पदव्युत्तर शिक्षणात सुवर्णपदक पटकावणाऱ्या आपटे यांना विदेशामध्ये नोकरीची संधी असतानाही त्यांनी आपल्या आजरा तालुक्यातील शेतीमध्ये लक्ष घातले. तेथे पहिल्यांदा संकरित गाई आणल्या. १९८६ पासून सलग ३५ वर्षे ते गोकुळचे संचालक आणि तीन वेळा अध्यक्ष होते. महानंदचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. गेली चार वर्षे ते कर्करोगाने आजारी होते. आजरा तालुक्यातील जनता दूध संस्था, कोल्हापूर येथील ट्रान्सपोर्ट या संस्थांचे अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात महालक्ष्मी बँकेच्या माजी अध्यक्षा, संचालिका पद्मजा आपटे यांच्यासह दोन मुले, सून, भाऊ सुधीर आपटे असा परिवार आहे.

## चिथावणीखोर वक्तव्याबद्दल हिंदू पुजाऱ्याची हकालपट्टी

कॅनडा/वृत्तसंस्था

कॅनडातील ब्रॅम्प्टनमधील हिंदू मंदिराच्या पुजाऱ्याची हकालपट्टी करण्यात आली आहे. खलिस्तानी झेंडे घेऊन आलेले आंदोलक आणि त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या लोकांमध्ये झालेल्या संघर्षात चिथावणीखोर वक्तव्य केल्याचा आरोप करत हिंदू मंदिराच्या पुजाऱ्याची हकालपट्टी करण्यात आली आहे. हिंदू सभा मंदिरात कॉन्सुलर कार्यक्रमाच्यादरम्यान मंदिराच्या बाहेर आंदोलकांनी खलिस्तानी झेंडे फडकवले होते. यानंतर त्या ठिकाणी हिंसाचार उसळला होता. ही घटना ३ नोव्हेंबर रोजी ब्रॅम्प्टनमध्ये घडली होती.




३ नोव्हेंबर रोजी ब्रॅम्प्टनमधील मंदिराबाहेर निदर्शकांनी खलिस्तानी झेंडे फडकावले आणि त्यानंतर मोठा गोंधळ झाला होता. या गोंधळांचं रूपांतर हिंसाचारात झालं होतं. यासंदर्भातील काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. या व्हिडिओमध्ये मंदिराच्या परिसरात मोठा गोंधळ झालेला पाहायला मिळाला. या घटनेनंतर ब्रॅम्प्टन शहराचे महापौर पॅट्रिक ब्राउन यांनी पुजाऱ्याच्या विधानाचा निषेध केला. तसेच ब्रॅम्प्टनचे महापौर पॅट्रिक ब्राउन यांनी म्हटलं की, कोणत्याही धर्मगुरूंनी हिंसक वक्तृत्व किंवा समुदायामध्ये हिंसा आणि द्वेष वाढेल असे विधान करू नये. या ठिकाणी बहुसंख्य शीख कॅनेडियन आणि हिंदू कॅनेडियन सामंजस्याने राहतात. ते कसल्याही प्रकारचा हिंसाचार सहन करत नाहीत. दरम्यान, यानंतर हिंदू सभा मंदिराचे अध्यक्ष मधुसूदन लामा यांनी चिथावणीखोर वक्तव्य केल्याप्रकरणी पुजाऱ्याचे निलंबन केलं आहे. यासंदर्भात हिंदू सभा मंदिराकडून बुधवारी एक निवेदनही प्रसिद्ध करण्यात आलं आहे.

## आता शाहरूखलाही जीवे मारण्याची धमकी

मुंबई/प्रतिनिधी

बॉलिवुड अभिनेता सलमान खानला गेल्या काही दिवसांपासून लॉरेन्स बिश्नोई गँगकडून जीवे मारण्याची धमकी येत आहे.



काँग्रेस नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणाची जबाबदारीही बिश्नोई गँगने घेतली असून सलमान खानला त्यातून संदेश देण्याचा गँगचा प्रयत्न असल्याचं बोललं जात आहे. अशी पोस्ट करणाऱ्या एका व्यक्तीलाही पोलिसांनी अटक केली आहे. आता सलमान खानपाठोपाठ अभिनेता शाहरूख खानलाही जीवे मारण्याची धमकी आली आहे. पोलिसांकडून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. ही धमकी बिश्नोई गँगकडून आल्याची अद्याप कोणतीही खात्रीशीर माहिती नसून तशी शक्यता वर्तवली जात आहे.

## क्यूआर कोडद्वारे डॉक्टरांची ओळख पटवता येणार

### नोंदणीकृत सदस्यांची वैद्यक परिषदेच्या ॲपवर नोंदणी

मुंबई/प्रतिनिधी

बोगस डॉक्टरांना आळा बसावा आणि सर्वसामान्य नागरिकांना नोंदणीकृत डॉक्टरांची माहिती व्हावी यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) विशेष ॲप तयार केले आहे. या ॲपवर ऑनलाईन नोंदणी केलेल्या डॉक्टरांना एक क्यूआर कोड देण्यात येणार आहे.

हा क्यूआर कोड क्लिनिकच्या बाहेर लावणे बंधनकारक ठरणार असून तो स्कॅन करताच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना संबंधित डॉक्टरची सर्व माहिती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे डॉक्टर नोंदणीकृत असल्याची खात्रीही करून घेता येणार आहे.

बोगस डॉक्टरांकडून रुग्णांची होणारी फसवणूक रोखण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने एक विशेष प तयार केले आहे. यामध्ये परिषदेकडे नोंदणी असलेल्या सर्व डॉक्टरांची नोंद करण्यात येत आहे.

सध्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे राज्यभरातील एक लाख ९० हजार डॉक्टरांची नोंद आहे. या सर्व डॉक्टरांची ऑनलाईन नोंदणी विशेष ॲपच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**नोंदणीत लवकरच वाढ**

आतापर्यंत यातील १ लाख ३४ हजार डॉक्टरांनी ॲपवर नोंदणी केली असून उर्वरित डॉक्टरांची नोंदणीही



लवकरच पूर्ण होणार आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे ऑनलाईन करण्यात येत असलेल्या नोंदणीमध्ये अद्यापपर्यंत जवळपास ३६ हजार डॉक्टरांची नोंदणी झालेली नाही. यामध्ये काही नोंदणीकृत डॉक्टर हे विविध कामासाठी किंवा वैद्यकीय कामासाठी परदेशात गेलेले आहेत. त्यामुळे त्यांना नोंदणी करता आलेली नाही. मात्र ते परदेशातून आल्यावर नोंदणी करू शकतात. तसेच काही डॉक्टरांचे वय झालेले असल्याने त्यांनी नोंदणी केली नसल्याने सर्व १ लाख ९० हजार डॉक्टरांची नांदणी होऊ शकलेली नाही. मात्र, पुढील काही दिवसांमध्ये नोंदणीच्या आकड्यामध्ये निश्चितच वाढ होईल, अशी माहितीही डॉ. विंकी रुघवानी यांनी दिली.

मोबाईलवर मिळणार माहिती नोंदणी केलेल्या डॉक्टरांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून एक क्यूआर कोड देण्यात येणार असून हा क्यूआर कोड त्यांना त्यांच्या क्लिनिकच्या बाहेर लावणे बंधनकारक आहे. क्लिनिकमध्ये येणारा रुग्ण किंवा त्याच्या नातेवाईकाने आपल्या मोबाईलद्वारे हा क्यूआर कोड स्कॅन केल्यावर त्याची सविस्तर माहिती मोबाईलवर उपलब्ध होणार आहे. यामध्ये डॉक्टरने घेतलेले शिक्षण, त्याचा नोंदणी क्रमांक, त्यांच्या सदस्यात्वाची अंतिम तारीख अशी सर्व माहिती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संबंधित डॉक्टर नोंदणीकृत असून, बोगस नसल्याची माहिती रुग्णांना मिळण्यास मदत होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी यांनी दिली

# दक्षिण तालुक्याचा कायापालट करण्यासाठी एकदा संधी द्या

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी



मुलाखत

सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या वारे जोराने वाहू लागले आहेत. त्या अनुषंगाने दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात निवडणुकीची रणधुमाळी सुरु असतानाच याच मतदारसंघातील मनसेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांनी मंगळवारी दैनिक सुराज्यला खास मुलाखत दिली. गेल्या पाच वर्षापासून दक्षिण सोलापूर तालुक्यातील, विधानसभा मतदारसंघातील जनतेशी घट्ट नाळ जोडत मतदार संघाची मजबूत बांधणी करणारे महादेव कोगनुरे यांच्या समोर दक्षिण सोलापूर मतदारसंघातील सर्व सामान्य नागरिकांचे विविध प्रश्न एक आव्हान म्हणून उभे असताना त्यांना मात्र हे प्रश्न आवाहनात्मक नसून दक्षिण सोलापूर तालुक्याचा कायापालट करण्यासाठी मिळालेली एक संधी असल्याचे ते सांगतात.

**प्रश्न १ :-** प्रथमतः आपण या राजकीय व्यासपीठावर कसे आलात याबद्दल सांगा.

**उत्तर :-** माझ्या लहानपणी माझ्या वाटेला आलेली मरणयातना ही इतरांच्या वाटेला तरी येऊ नये.यासाठी मी प्रथमतः सामाजिक कार्यात उतरलो. पुढे सामाजिक कार्य करताना जनमानसांच्या आग्रहाखातर मला सामाजिक कार्यात मदत व्हावी म्हणून मी राजकारणात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

**प्रश्न २ :-** दक्षिण सोलापूर तालुक्यात विधानसभा मतदारसंघात तुम्हाला कोणते प्रश्न आव्हानात्मक वाटतात?

**उत्तर :-** एमआयडीसीचे प्रश्न तसा अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे .सध्या हा प्रकल्प मार्गी लावून स्थानिक उद्योजकांना जागा उपलब्ध करुन देऊन तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना हाताला काम देणे हा एक महत्वाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी शासन दरबारी प्रयत्न करणार आहे.

**प्रश्न ३ :-** तालुक्यातील तीर्थ क्षेत्राकडे तुम्ही कसे पाहता ?

**उत्तर :-** सध्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल येथील संगमेश्वर तीर्थक्षेत्र, हत्तुर येथील ग्रामदैवत गुरु सोमेश्वर तीर्थक्षेत्र तसेच मंद्रुप येथील मळसिध्द मंदिर हे भाविकांसाठी पवित्रस्थान मानले जातात. प्रथमता मला यासह तालुक्यातील विविध तीर्थ क्षेत्रांना ब वर्ग दर्जाचे अनुदान मिळवून देऊन त्या वकास करणे हा माझा संकल्प आहे.हा संकल्प पूर्ण करण्यासाठी मी अथक परिश्रम घेणार आहे.

**प्रश्न ४ :-** तालुक्यातील सुशिक्षीत बेरोजगारांना काय सांगणार ?

**उत्तर :-** बेरोजगारांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभे राहून मोठ्या उद्योग समूहात, नोकरीत तरुणांना आरक्षण मिळवून देण्यासाठी प्रसंगी मला रस्त्यावरची लढाई लढण्यास भाग पाडले तरी मी त्यासाठी सदैव तयार राहीन.सुशिक्षित बेरोजगार तरुणांना न्याय मिळवून देईन.

**प्रश्न ५ :-** आपल्या राजकीय धोरणांचा दक्षिण सोलापूर तालुक्यात काय परिणाम होईल?

**उत्तर :-** माझ्या राजकीय धोरणानुसार जर का दक्षिण सोलापूर तालुक्याचा विकास झाल्यास जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रात एक विकासात्मक मॉडेल म्हणून तालुका उदयास येण्यास उशीर लागणार नाही.

**प्रश्न ६ :-** आपण दक्षिण तालुक्याच्या भविष्यासाठी कोणती आशा आणि चिंता बाळगता?

**उत्तर :-** दक्षिण सोलापूर तालुक्याचे भविष्य बदलायचे असेल तर तरुण, महिला, कष्टकरी शेतकरी, सर्व सामान्य वयोवृद्धांना आधार देऊन यांचे जीवनमान उंचवल्यास नक्कीच तालुक्याचे भाग्य बदलण्यास मदत होईल.

**प्रश्न ७ :-** आपण आपल्या कार्यकर्त्यांना काय संदेश द्याल?

**उत्तर :-** शांत, संयम,प्रामाणिक, निगर्वी, निरस्वार्थी आणि शिस्तबद्धरितीने जर पक्षाचे काम करत राहिल्यास पक्ष तुमची गरज ओळखून तुम्हाला संधी देईल आणि तुम्ही मात्र संधीचे सोन करण्यासाठी सदैव तयार झाले पाहिजेत.

# माढा तालुक्यातील कोंढार भागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणार

## ॲड.मिनलताई साठे यांची ग्वाही



माढा : प्रचारादरम्यान ग्रामस्थांची भेट घेताना ॲड.मिनल साठे.

माढा : माढा विधानसभा मतदारसंघाच्या महायुती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार ॲड. मीनल साठे यांच्या प्रचारार्थ माढा तालुक्यातील कोंढार भागातील रांजणी, आलेगाव खुर्द, टाकळी, गारअकोले,रुई, प्रचार सभा संपन्न झाल्या. कोंढार भागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणार असल्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

याप्रसंगी बोलताना ॲड.मिनल साठे यांनी गेल्या ३० वर्षापासून माढा मतदारसंघातील रस्ते, पाणी आरोग्य, शिक्षण, यासारखे पायाभूत मूलभूत प्रश्न सोडवण्यात सत्ताधारी नेतृत्व अपयशी ठरले आहे. मी या मतदारसंघामध्ये प्राधान्य क्रमाने मतदारसंघातील पायाभूत सुख सोयी व महिलांचे प्रश्न सोडवण्यावर भर देणार आहे. माढा मतदारसंघात उसाच्या आडून राजकारण करण्यात येते. संबंधित नेतृत्वाने शेतकऱ्यांच्या नावावरती बोगस कर्ज काढून शेतकऱ्यांचे सिबिल खराब केले असून येणाऱ्या निवडणुकीत शेतकरी या नेतृत्वाचे सिबील खराब केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत असा टोला त्यांनी आमदार बबनराव शिंदे यांचे नाव न घेता लगावला.

तालुक्यामध्ये नवीन उमेदवार मागील दोन महिन्यापासून कारखान्याच्या पैशाच्या जोरावर लोकांच्या मनोरंजनासाठी विविध कार्यक्रम घेत मते मागताना दिसत असल्याचे टीकास्त्र अभिजीत पाटील यांच्यावर नाव न घेता सोडले. प्रत्येक गावामध्ये गावातील महिलांनी अर्थात लाडक्या बहिणींनी ॲड. साठे यांचे हळदी कुंकू लावून स्वागत केले. या प्रचार सभेसाठी संत कूर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक नारायण गायकवाड, रांजणीचे माजी सरपंच विलास जाधव, माजी सरपंच आप्पासाहेब यादव, शिवलाल जाधव, सुरेश यादव, सौ अश्विनी जाधव, दिलीप चव्हाण, देवा माने, प्रशांत पाटील अंगद निकम, बाळासाहेब पाटील, आलेगाव बुद्रुक चे माजी सरपंच शहाजी गुरव, बाबा चंदनकर, महादेव कवडे, किरण चंदनकर, पांडुरंग कवडे, ब्रह्मदेव चंदनकर, जगन्नाथ कवडे, रुईचे सनी साळवे, मिथुन वाघमारे अरमान शेख, सौ प्रज्ञा भोसले, प्रथमेश वाघमारे, नितीन जाधव, सागर देवकाते आदी उपस्थित होते. टाकळी (टे.) येथे गाव भेट प्रचार ॲड.मिनलताई साठे यांनी उपस्थित नागरिकांची संवाद साधला. यावेळी सोसायटीचे चेअरमन शभारत माने, बाळासाहेब नगरे, नामदेव गोफणे, अप्पा राजमाने, अकबर शेख, रफ़िक़ शेख, बबन स्वामी महाराज उपस्थित होते या प्रचार सभेसाठी विविध गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, गावातील मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राज ठाकरे यांच्या सभेने दिलीप धोत्रे यांचे पारडे जड

## नागरिकांनी केला दिलीप बापू धोत्रे यांना विजयी करण्याचा निर्धार




पंढरपूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे मनसेचे अधिकृत उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांच्या प्रचारार्थ मंगळवेढा येथे झालेल्या सभेमुळे मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांचे पारडे जड झाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

मंगळवेढा येथे झालेल्या सभेत राज ठाकरे यांनी मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांना निवडून द्या, मंगळवेढा तालुक्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यात येईल. येथील महिलांना घरबसल्या रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचे तसेच बेरोजगार तरुणांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी नवीन उद्योग निर्मिती करून नोकरी मिळवून देऊ असे अभिवचन पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील नागरिकांना दिले आहे. या सभेला रेकॉर्ड ब्रेक गर्दी पाहायला मिळाली.

आधी केले मग सांगितले या उक्तिप्रमाणे धोत्रे यांनी मागील अनेक वर्षांपासून मतदार संघातील नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून त्यांनी काम केले आहे. पंढरपुरातील नागरिकांचा वाढीव कर माफ करणे, हिंदू, मुस्लिम स्मशानभूमी दुरुस्ती, रस्ते खड्डे मुक्त करणे, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आर्थिक मदत करणे, बेरोजगार तरुणांना नोकरी उपलब्ध करून देणे, महिलांना सक्षम बनवण्यासाठी लघुउद्योग उभा करून देणे याचबरोबर कोरोना काळात त्यांनी रुग्णांना बेड उपलब्ध करून देण्यासाठी पल्स कोविड हॉस्पिटलची निर्मिती तसेच एकही नागरिक उपाशी झोपणार नाही याची काळजी त्यांनी घेतली होती.

त्यामुळे दिलीप बापू धोत्रे यांच्याकडे सर्वसामान्यांना मदत करणारे नेतृत्व म्हणून पाहिले जाते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांना निवडून आणण्याचा निर्धार मतदारसंघातील नागरिकांनी केला आहे.



दक्षिण सोलापूर : सोमेश्वर मंदिरात श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करताना युवराज राठोड व त्यांचे सहकारी.

# मंद्रुप एमआयडीसीसह पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवणार

## परिवर्तन आघाडीचे उमेदवार राठोड यांची ग्वाही

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी


देशातील राजकीय पक्षांनी जनतेकडे पाठ फिरवली आहे. शेतकरी आणि सामान्य जन-तेचा आवाज विधिमंडळात पोहोचत नाही, तो पोहोचवण्यासाठी जनतेने मला एक संधी द्यावी. पाणी प्रश्न, वीज पुरवठ्याचा प्रश्न आणि मंद्रूप एमआयडीसीचा प्रश्न सोडवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा निश्चय परिवर्तन आघाडी पुरस्कृत उमेदवार युवराज राठोड यांनी व्यक्त केला.

हत्तूर येथे विधानसभा निवडणुकीचा प्रारंभ सोमेश्वर मंदिरात श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्यावेळी युवराज राठोड बोलत होते. ते म्हणाले, आपले सध्याचे आमदार सुभाष देशमुख यांच्यावर लोकमंगल साखर कारखान्याच्या सभासद, शेतकरी आणि कर्मचाऱ्यांचे सात-बारा उतारे घेऊन बोगस कर्जे घेतल्याची फिर्याद आहे. त्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही. त्यांच्या कारखान्याने वीज चोरून वापरल्याचे प्रकरण आहे. गेल्या निवडणुकीत त्यांच्या बँकेचे पैसे पकडल्याचे बोलले गेले, त्यावर कारवाई केली नाही. म्हणजेच आपल्या आमदारकीचा आणि मंत्रिपदाचा वापर आपल्यावरील कारवाई टाळण्यासाठी केल्याचे स्पष्ट होते. ते मतदार संघातील प्रश्न कधी सोडवणार असा बोचरा सवाल त्यांनी केला आपल्या भिमेच्या पाण्यावर कर्नाटक हिरवेगार झाले. मात्र दक्षिण मतदार संघात शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ आली आहे.अशा वेळी जनतेच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून लढणारा नेता विधानसभेत हवा अशी भावना व्यक्त करत कार्यकर्त्यांनी व्यक्त करत निवडणुकीला उभे राहण्याचा आग्रह केला. त्याच्या या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, असे राठोड म्हणाले.

# न्यासाकडून धर्मशास्त्रातील वैभवशाली परंपरा जपण्याचे काम

## स्वामी गोविंददेव गिरीजी महाराजांचे गौरोद्गार

अक्कलकोट/प्रतिनिधी



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून धर्मशास्त्रातील वैभवशाली परंपरा जपण्याचे काम सुरू आहे. महाप्रसाद सेवेबरोबरच विविध विभागातील कार्य प्रशंसनीय असल्याचे गौरवउद्गार श्री राम मंदिर आयोध्या ट्रस्टचे कोषाध्यक्ष व मथुरा श्रीकृष्ण जन्मभूमी ट्रस्टचे उपाध्यक्ष, धर्मगुरू स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी काढले

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात गोविंद देव गिरीजी महाराज आले असता ते बोलत होते. न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी धर्मगुरू स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज यांना मंडळाच्या वतीने नव्याने बांधण्यात येणाऱ्या महाप्रसाद गृहाच्या वास्तूची संपूर्ण माहिती देण्यात आली. त्यांच्या समवेत तम्मा शेळके, गुंडू यळमेली, प्रा.भिमराव साठे, मल्लिनाथ शाबादे, चेतन जाधव, प्रसाद हारकुड,प्रा.प्रशांत शिंपी, रवी जोशी, संतोष वगाले,सुशील हिरसकर, स्वामिनाथ बेंद्रे, राहुल वाडे, प्रसन्न गवंडी, रवी वाघमोडे ,ह.भ.प.काशिनाथ महाराज गुरव, हसपूरकर, ह.भ.प.आबा महाराज पाटील कुरनुरकर, अभिजित लोके, शिवराज स्वामी यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, अप्पा हंचाटे, गणेश भोसले, अभियंता अमित थोरात, पुरोहित संजय कुलकर्णी, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, तानाजी पाटील, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, रमेश हळसंगी, धनंजय निंबाळकर, राजेंद्र पवार, प्रसाद हुल्ले, राहुल इंडे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, विठ्ठल रेड्डी आदी उपस्थित होते.


# पूर्व वैमनस्यातून मारहाण; सहा जणांवर गुन्हा

सोलापूर/प्रतिनिधी

मागील वर्षी झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ६ नोव्हेंबर रोजी केशवनगर येथे घडली. याप्रकरणी ग्रेड पोसई. जयदेवी मोहन काळे (रा. बी न १८, रुम नं ८४ केशवनगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून रेखा काळे (रा. कुंभारी गाव पारधी कॅम्प) सोनी चव्हाण, सोनू चव्हाण, निर्मला काळे, ताई चव्हाण व दीपक चव्हाण (सर्व रा. सोलापूर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. रेखा काळे हिने मागील वर्षी झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरून वरील संशयित आरोपींसह जयदेवी काळे यांच्या घरी येऊन त्यांच्या आईला मारहाण केली. त्यानंतर घरावर दगडफेक करत त्यांच्या भावास दुखापत केली. दोघींना नोकरी घालवण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास मसपोनि जगताप या करीत आहेत.

## राज ठाकरेंचे वरळीत सर्वात आक्रमक भाषण

# आदित्य ठाकरेंवर बोलणे टाळले



मुंबई : मुंबईत येणारे लोंढे, मराठी पाट्यांचा मुद्दा, मशिदींवरील भोंगे, टोल नाक्यांवरील आंदोलने, वरळी बीडीडी चाळीचा मुद्दा आणि कोळी बांधवांना साद... असे एक ना अनेक मुद्दे मांडत राज ठाकरेंनी वरळीत आक्रमक भाषण केलं. पण त्या ठिकाणचे विद्यमान आमदार आणि त्यांचे पुतणे आदित्य ठाकरे यांच्या विरोधात एक चकार शब्दही काढला नाही हे विशेष.

वरळीत आदित्य ठाकरेंविरोधात मनसेचे संदीप देशपांडे रिंगणात आहेत. संदीप देशपांडेंचं राज ठाकरेंनी कौतुक केलं आणि त्यांना निवडून देण्याचं आवाहन केलं. त्यावेळी संपूर्ण भाषणात राज ठाकरेंनी आदित्य ठाकरेंवर टीका सोडा, चकार शब्दही काढला नाही. त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. पण आदित्य ठाकरेंचा उल्लेख केला नाही. आधी उद्धव ठाकरेंनी अमित ठाकरे उभे असलेल्या माहीममध्ये सभा घेणार नसल्याचं जाहीर केलं. आता राज ठाकरेंनी वरळीमध्ये सभा तर घेतली पण पुतण्यावर बोलण्याचं टाळलं. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधुंनी घेतलेली भूमिका चर्चे चा विषय ठरला आहे.


### अपयशी ठरलो तर दुकान बंद करेन

दरम्यान वरळीआधी घाटकोपरमध्ये राज यांनी सभा घेतली. यावेळी राज बोलताना राज ठाकरे म्हणाले की, राज्याची सत्ता एकदा आपल्या हातात द्या, अपयशी ठरलो तर माझं दुकान बंद करुन टाकेन. मनेसेनं आजपर्यंत अनेक आंदोलनं केली, ज्या ज्या गोष्टी केल्या त्या कायमस्वरुपी होत्या असा उल्लेख आपल्या भाषणादरम्यान राज ठाकरे यांनी केला. घाटकोपर पश्चिममध्ये मनसेचे उमेदवार गणेश चुक्कल यांच्या प्रचारासाठी राज ठाकरेंनी सभा घेतली.

# स्वसंरक्षण, स्पर्धा परीक्षांच्या सुविधा हव्यात विद्यार्थिनींच्या आमदारांकडून अपेक्षा!

सोलापूर/प्रतिनिधी

यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये तरुण मतदारांचा टक्का मोठा झाला आहे. दर पाच वर्षांनी येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत नव्या पिढीचे मतदार अधिक दिसून येतात. या निवडणुकीतील उमेदवारांकडून महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या काय अपेक्षा आहेत? निवडणूक काळातील जाहीरनामे या मतदारांना आपल्या हिताचे वाटतात का? तसेच स्पर्धापरीक्षा, पदभरती, रोजगार याविषयी या विद्यार्थिनिंना काय वाटते याविषयी त्यांच्या भावना जाणून घेतल्या. त्यावेळी राजकारण्यांकडून काय हवंय याविषयी त्यांनी दै. सुराज्यकडे प्रतिक्रिया दिल्या आहेत..



सोलापूरच्या तरुणींना निवडणुकीकडून मुख्यतः रोजगाराची अपेक्षा आहे. स्पर्धापरीक्षा, सरकारी नोकऱ्यांमध्ये पदभरती, आणि विविध क्षेत्रांत रोजगार उपलब्ध होणे. हाच महत्वाचा मुद्दा आहे. सोलापूरमधील अनेक तरुणी उच्च शिक्षण घेत असूनही रोजगाराच्या अभावामुळे समस्यांना तोंड देत आहेत. येणाऱ्या सरकारने याचा विचार केला पाहिजे.

**-अपूर्वा जाधव, विद्यार्थिनी**




स्पर्धा परीक्षेची फी सर्वांना परवडेल अशी असावी. महिलांना फक्त आरक्षण नको तर संरक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करायला हवा. शिष्यवृत्ती आणि इतर शैक्षणिक सुविधांचा लाभ विद्यार्थिनींना वेळेत देण्यात यावा. जास्तही लाडक्या योजना काढू नये. तसेच महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास रोजगार निर्मितीसाठी कौशल्याधारित उद्योग निर्माण करण्यात यावे.

**-झीनत शेख, विद्यार्थिनी**




जाहीरनामे अनेक पक्षाचे आले आहेत. रोजगार बाबत शून्य नियोजन आहे. जाहीरनाम्यात महिलांना एवढे पैसे देण्यात येईल. हे फुकट मिळेल,असे प्रकार सुरू आहेत. त्यासोबतच, स्पर्धा परीक्षांसाठीच्या सोयीसुविधा, प्रशिक्षण केंद्रे, मार्गदर्शन शिबिरे, आणि सरकारी नोकरीची पदभरती नियमित आणि पारदर्शक असेल अशी येणाऱ्या सरकारकडे अपेक्षा आहे.

**-नंदिनी विटकर, विद्यार्थिनी**



स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी सुविधांची उपलब्धता करावी. स्पर्धा परीक्षा तयारी करणारे सगळे विद्यार्थी सोलापूर सोडून पुणे- कोल्हापूर याठिकाणी जातात तर सोलापूरमध्येच अभ्यासासाठी सेंटर सुरू करण्यात यावे. प्रत्येक वर्षी नोकरी मेळावा भरवावा. विकासाची दिशा स्पष्ट असावी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे अशी अपेक्षाही असते.

**-सृष्टी कोंडा, विद्यार्थिनी**



मुलींना स्वसंरणार्थ अभ्यासक्रमात कराटे, बॉक्सिंग, काठी फिरवणे अशा प्रशिक्षणाचा समावेश करावा. शालेय अभ्यासक्रमात स्वयंरोजगार हा वेगळा विषय घ्यावा. सोलापूरमध्ये नोकरीविषयक मेळावे सहा महिन्यातून एकदा घ्यावेतच. सोलापूर जिल्ह्यांत सरकारी मार्गदर्शन केंद्र स्थापन करावे, जिथे विद्यार्थ्यांना योग्य माहिती, मार्गदर्शन आणि मोफत साहित्य उपलब्ध करून देता येईल.

**-रुपाली चव्हाण,विद्यार्थिनी**

धक्का!! सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर २०२४ । पान ११



# उबाठाच्या उमेदवारीला ईव्हीएम-हॅक करून जिंकून देण्याचे आमिष

✔ नाशिक/प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीत उमेदवारांना सावध करणारी एक बातमी आहे. निवडणूक काळात ईव्हीएम मशीन हॅक केले जात असल्याचे आरोप आजवर आपण ऐकले असतील. मात्र नाशिकमध्ये याच ईव्हीएमच्या नावाखाली ठाकरे गटाच्या उमेदवाराला धमकावण्याचा आल्याचा प्रकार उघड झाला आहे. पैसे न दिल्यास ईव्हीएम हॅक करून तुमचा पराभव केला जाईल, अशी धमकी त्यांना देण्यात आली. या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी अटक केलीय. या संपूर्ण प्रकरणामुळे एकच खळबळ उडाली आहे.**

गुन्हेगार फसवणूक करण्यासाठी सतत नवीन शक्कल लढवत असतात. नाशिकमधील या आरोपीनं फसवणुकीसाठी चक्क ईव्हीएमची भीती दाखवलीय. नाशिक मध्य मतदारसंघातील शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे उमेदवार वसंत गीते यांचे सोशल मीडिया मॅनेजमेंटचं काम पाहणाऱ्या आनंद शिरसाठ यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यलयात आलेल्या व्यक्तीनं स्वत:चं नाव भगवानसिंह चव्हाण आहे, असं सांगितलं. आपण निवडणूक प्रचाराचं काम करतो, वसंत गीतेंना विजयी करण्यासाठी ईव्हीएम हॅक करुन देऊ, असा दावा चव्हाण यांनी केला. त्यानंतर शिरसाठ यांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली.

ईव्हीएम हॅक करून १० मतदानापैकी ३ ते ४ मतं आम्ही तुम्हाला मिळवून देऊ आणि निवडणुकीत जिंकून देऊ असे त्यांनी आम्हाला सांगितले. या कामासाठी आमच्याकडं ४२ लाखांची मागणी केली. हे पैसे दिले नाहीत तर ईव्हीएममध्ये प्रोग्रामिंग करत तुमचा पराभव करु असंही त्यांनी धमकावलं, अशी माहिती या प्रकरणाचे तक्रारदार असलेल्या शिरसाट यांनी दिली.

हे संपूर्ण प्रकरण संशयास्पद वाटत असल्यानं वसंत गितेंनी पोलीस आयुक्तांशी संपर्क साधला. त्यांनी मुंबई नाका पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल केला. त्यानंतर तीन तासातच मखलाबाद परिसरात राहणाऱ्या भगवानसिंह चव्हाण या भामट्याला गुन्हे शाखेच्या पथकाकडून अटक करण्यात आली. त्याची सखोल चौकशी केली असता ईव्हीएम कुठल्याही प्रकारे हॅक करण्याची त्याच्याकडे यंत्रणा नाही यासोबतच फक्त पैसे उकळण्याच्या दृष्टीने त्याने ही शक्कल लढवल्याची कबुली त्यानं दिली. भगवानसिंह राजस्थानचा रहिवासी असून नाशिक शहरात मार्बलचा व्यवसाय करण्यासाठी तो आला होता असे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

### विरोधकांवर आरोप

नाशिक मध्य मतदारसंघात महाविकास आघाडीचे ठाकरे गटाचे वसंत गीते आणि महायुतीच्या भाजपच्या देवयानी फरांदे यांच्यामध्ये प्रमुख लढत आहे, या दोघांमधील राजकीय वैमनस्य हे खरंतर सर्वश्रुत आहे त्यामुळे हे सर्व षडयंत्र रचण्यामागे विरोधकांचा तर हात नाहीत ना अशी शंका गिते यांनी उपस्थित केलीय तर फरांदे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

---

रामदास आठवलेंची खोचक टीका

# मशिदीवरील भोंगे उतरणार नाहीत आणि राज ठाकरेंची सत्ताही कधी येणार नाही

✔ अमरावती/प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती सत्ता दिली तर एकाही मशिदीवर भोंगा दिसणार नाही, असे वक्तव्य राज ठाकरे यांनी अमरावती येथे एका जाहीरसभेदरम्यान केले होते. या वक्तव्यावर आता राजकीय प्रतिक्रिया येत आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रमुख रामदास आठवले यांनी एएनआय वृत्तवाहिनीशी बोलताना राज ठाकरेंच्या विधानावर टीका केली. मशिदीवरील भोंगे कधीही हटणार नाहीत, अशी भूमिका मांडत असताना रामदास आठवले यांनी मनसेची सत्ता कधीही येणार नाही, असे सांगितले. मनसेचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतःच्या जीवावर निवडून येतो, असेही आठवले म्हणाले.

रामदास आठवले एएनआयशी बोलताना म्हणाले की, राज ठाकरे वारंवार अशाप्रकारचे विधान करत असतात. आमचे सरकार आले तर मशिदीवरील भोंगे हटविणार असे ते म्हणतात. पण



मशिदीवरील भोंगे हटणार नाहीत आणि राज ठाकरेंची सत्ताही कधी येऊ शकत नाही. कितीही वर्ष गेले तरी राज ठाकरेंची सत्ता येऊ शकत नाही. त्यांचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतःच्या जीवावर. मग त्यांचे सरकार कसे येणार? आणि ते कसे भोंगे हटवू शकणार?

मी दहशतवादी असलेल्या मुसलमानांचा नेहमीच विरोध केला आहे. पण देशावर, भारताच्या संविधानांवर प्रेम करणारे आणि हिंदूंशी बंधुभाव राखून राहणाऱ्या मुसलमानांचा विरोध करणे ठीक नाही. मशिदीत एक-दोन मिनिटांची अजान होत असते, त्यासाठी भोंगे हटविण्याची काय गरज आहे. भोंगे हटविण्यापेक्षा गरीबी हटवा, भ्रष्टाचार हटवा, भोंगे हटविण्यापेक्षा विषमता, जातीयता हटविली पाहीजे. केवळ १४० - १४५ उमेदवार उभे करून आमदार निवडून येत नसतात. मनसेचे दोनही आमदार निवडून येणार नाहीत. पण राज ठाकरे असे विधान वारंवार करत राहिले, तर माझा पक्ष भोंगे हटविणाऱ्यांना धडा शिकवल्या राहणार नाही, असेही रामदास आठवले म्हणाले.

अमरावतीचे मनसेचे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील यांच्या प्रचारार्थ बुधवारी रात्री सायन्सकोर मैदानावर आयोजित प्रचार सभेत बोलत असताना राज ठाकरे यांनी भोंग्याबाबत विधान केले. मशिदींवरचे भोंगे बंद झाले नाही, तर मशिदीसमोर हनुमान चालिसा पठण करण्याचा इशारा मनसेने दिला होता. त्यावेळी उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री होते. आम्ही आंदोलन केल्यानंतर भोंगे बंद झाले होते. पण, त्यावेळी मनसेच्या १७ हजार कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते, ही आठवण राज ठाकरेंनी करून दिली.


---

# मविआच्या जाहिरातीमधून अजित पवारांची बदनामी

✔ मुंबई/प्रतिनिधी

राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी दिग्गज नेत्यांच्या प्रचारसभांचा धडाका सुरू असून राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते अजित पवार हे आज मुंबईत (चींलरळ) सभा घेत आहेत. अणुशक्ती नगर-शिवाजीनगर आणि गोवंडी विधानसभा मतदारसंघांमध्ये नवाब मलिक आणि त्यांची मुलगी सना मलिक यांच्यासाठी अजित पवार मानखुर्द लल्लुभाई पार्कमधून रोड शो करून प्रचार करणार आहेत. त्यामुळे, राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा संघर्ष येथील मतदारसंघात पाहायला मिळत आहे. दुसरीकडे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने हक्क मागतोय महाराष्ट्र हे जाहिरात कॅम्पेन रावबत सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केलं आहे.आता, या जाहिरातीविरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

महाविकास आघाडीच्या जाहिरातीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पोलिसांत तक्रार करण्यात आली आहे. राष्ट्रवादी युवकचे



प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना पत्र लिहून जाहिरातीमधील मजूकर आणि अजित पवारांच्या पात्राचा उल्लेख करत तक्रार दाखल केली आहे. या जाहिरातीच्या माध्यमातून अजित पवारांची प्रतिमा मलिन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न महाविकास आघाडीच्यावतीने केला जात असल्याचंही त्यांनी तक्रारीत म्हटलं आहे. बदनामीकारण मजकूर, खोट वृत्त आणि वादग्रस्त आशयाची व्हिडिओ जाहिरात बनवून अजित पवारांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचं सूरज चव्हाण यांनी तक्रारीत म्हटलं आहे. या तक्रारीची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही पत्रातून करण्यात आली आहे.

---



# काँग्रेसकडून बंडखोरांना घरचा रस्ता

✔ **नवी दिल्ली :** विधानसभा निवडणुकीचा प्रचार हळूहळू आता जोर धरू लागला आहे. प्रत्येक उमेदवार आपापल्या मतदारसंघात जाऊन जोरदार प्रचार करत आहे. पण यावेळी अनेक बड्या नेत्यांनी पक्षाने उमेदवारी न दिल्याकारणाने बंडखोरी केली आहे. त्यांच्या बंडखोरीमुळे पक्षाचे टेंशन वाढले आहे. पण पक्षाचे न ऐकता, पक्षाच्या विरोधात जाऊन अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांवर कारवाईचा बडगा उभारला आहे. बंडखोरांवर कारवाईचा बडगा उभारण्याचे काम सर्वप्रथम भाजपाकडून करण्यात आले. त्यांनी एकाच वेळी ४० जणांचे सहा वर्षांसाठी निलंबन केले आहे. त्यानंतर शिंदे गटानेही कारवाई केली असून आता काँग्रेस पक्षाने बंडखोरांचे सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबन केल्याची माहिती समोर आली आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी याबाबतची माहिती दिली आहे. पक्षाच्याविरोधात गेल्याने एकूण पाच बड्या नेत्यांचे निलंबन करण्यात आले आहे.

रामटेक विधानसभा मतदारसंघातून राजेंद्र मुळक, काटोलमधून काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य जिचकार, पर्वती विधानसभा मतदारसंघातून आबा बागुल आणि कसबा विधानसभा मतदारसंघातून कमल व्यवहारे यांना ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे. तर महत्त्वाचे म्हणजे सांगली विधानसभेसाठी काँग्रेसने पृथ्वीराज पाटील यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराज झालेल्या वसंतदादा गटाने जयश्री पाटील यांना अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले.

---

# बारामतीची जनता खूप हुशार आहे

## सुनेत्रा पवारांचे विरोधकांना चिमटे, दादांच्या विजयाचा विश्वासही व्यक्त

✔ पुणे/प्रतिनिधी

बारामती लोकसभेची निवडणूक जशी पवार कुटुंबियांभोवती फिरली, तशीच विधानसभा निवडणूकही पवार कुटुंबियांभोवतीच फिरली जात आहे. यावर राज्यसभा खासदार सुनेत्रा पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. सुनेत्रा पवार म्हणाल्या की, यावेळची परिस्थिती वेगळी आहे. अजित दादांचं तालुक्यात काम आहे. हे सर्व जनतेच्या समोर आहे. ही काही आख्यायिका नाही. त्यामुळे प्रत्येकाला माहित आहे की, बारामतीत काय घडलं आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात त्याचा काय प्रभाव पडला आहे. त्यामुळे जनतेला माहिती आहे आपल्याला काय करायचं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विरोधात आजवर जे जे उमेदवार उभे राहिले त्यांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. आता काय होईल. या प्रश्नावर बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, याबाबत बारामतीकर ठरवतील काय करायचं ते..! याबाबतचा सर्व निर्णय बारामतीकरांचा आहे. तसेच विरोधकांकडून भावनिकतेचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. यावर त्या म्हणाल्या की, बारामतीची जनता खूप हुशार आहे. ती मतदानातून आपल्याला दाखवून देईल, असे त्या म्हणाल्या.

गेले २० दिवस मी प्रचार करते आहे. लोकांचा उदंड प्रतिसाद मिळतो आहे. लाडकी बहीण योजनेचाही मोठा फायदा या निवडणुकीत दिसून येईल. गेली ३५ वर्ष मी स्वतः उमेदवार नसताना किंवा कोणताही उमेदवार असला तरी प्रचार करत होते. त्यामुळे मला प्रचाराचा अनुभव आहे. असेही सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या.

### जनतेला माहित आहे नक्की काय करायचं

सुनेत्रा पवार या गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या प्रचारासाठी बारामती तालुक्यातील गावोगावी फिरत आहेत. आतापर्यंत त्यांनी ४५ गावांचा दौरा केला आहे. बारामती तालुक्यातील जनता हुशार असून ती मतदानातून दाखवून देईल, दादांचे काम आहे. लोकांच्या आयुष्यात कामामुळे बदल झाला आहे आणि जनतेला माहित आहे नक्की काय करायचं. आहे ते अशा शब्दात त्यांनी अजित पवारांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला.



---

## 20 20 इलेक्शन



### भाजपच्या नाकावर टिच्चून अजितदादांचा मलिकांसाठी प्रचार

✔ **मुंबई :** भारतीय जनता पक्षाचा प्रचंड विरोध असतानाही, त्यांचा विरोध डावलून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवाब मलिक आणि त्यांची लेक सना मलिक यांच्या निवडणूक प्रचाराला हजेरी लावली. सना मलिक यांच्या निवडणूक प्रचारार्थ आयोजित पदयात्रेत अजित पवार सहभागी झाले होते. नवाब मलिक यांच्या उमेदवारीने बॅकफूटला गेलेल्या भाजपने मध्यममार्ग काढून ते जरी राष्ट्रवादीचे उमेदवार असले तरी आम्ही त्यांचा प्रचार करणार नाही. आम्ही शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराचा प्रचार करू, अशी भूमिका घेतली. मात्र गुरूवारी थेट राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच मलिक यांच्या प्रचारासाठी रॅलीला उपस्थित राहून भाजपला आव्हान दिले. अणुशक्ती नगरच्या राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवार सना मलिक आणि मानखुर्द गोवंडीचे उमेदवार नवाब मलिक यांच्या प्रचारार्थ अजित पवार आज गोवंडी टाटा नगर परिसरातून रॅली करत आहे. नवाब मलिक यांच्या उमेदवारीला घेऊन युतीमध्ये जोरदार विरोध होता. तरी नवाब मलिक यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. त्यात आता खुद्द अजित पवार हेच प्रचारात उतरल्यामुळे युतीत नाराजी होण्याची शक्यता बळावली आहे.

### शिवाजी पार्कच्या सभेसाठी दोन्ही ठाकरेंचा आग्रह

✔ **मुंबई :** महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुका होतायत. २३ नोव्हेंबरला याचा निकाल लागणार आहे. सर्वच पक्षांनी यासाठी जोरदार तयारी केली असून प्रचार सभांचा धडाका सुरु झालाय. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरु झाल्या आहेत.यात आता १८ नोव्हेंबरला दुपारी प्रचार बंद होत होतोय. त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे १% नोव्हेंबरची प्रचारसभेसाठी शेवटची रात्र आहे. त्यामुळे ही सभा शिवाजी पार्क मैदानावर व्हावी, असा दोन्हीही ठाकरेंचा आग्रह आहे. १७ नोव्हेंबरला बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनी इतर राजकीय पक्षास सहभाग घेण्यास परवानगी दिल्यास संघर्ष उद्भवू शकतो, त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या सभेला परवानगी मिळावी, असे मत ठाकरेंच्या शिवसेनेने मांडले आहे. त्यांनी यासंदर्भात महापालिका आणि निवडणूक आयोगाकडे पत्रदेखील दिले आहे.

### आदित्य ठाकरेंच्या दौऱ्याआधी संभाजीनगरमध्ये शिवसेनेला खिंडार

✔ **छत्रपती संभाजीनगर** : आगामी विधानासभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे संभाजीनगरचा दौरा करणार आहेत. या दौऱ्याआधीच ठाकरे गटाला मोठं खिंडार पडलं आहे. ठाकरे गटाचे २ माजी नगरसेवक आणि १२ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. अंतर्गत गटबाजीला कंटाळून या पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडांवर ठाकरे गटाला मोठा झटका बसला आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सध्या महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जोरात तयारी सूरू आहे. त्याच आदित्य ठाकरेंची काही दिवसांवरच संभाजीनगरमध्ये सभा पार पडणार आहे. पण सभेआधीच ठाकरे गटाला धक्का बसला आहे. ठाकरे गटाचे २ माजी नगरसेवक आणि १२ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे यांच्या अंतर्गत गटबाटबाजीला कंटाळून या पदाधिकाऱ्याने राजीनामे दिले आहेत. तसेच पुढे आम्ही हिंदुत्वासाठी काम करणार आहेत. नेमका कुणाचं काम करणार हे दोन-तीन दिवसात सांगू असं देखील पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### तेव्हा तोंडाला कुलूप लागलं का? खोतांचा अजित पवारांना सवाल

✔ **सांगली :** राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवारांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त विधानानंतर आमदार सदाभाऊ खोत यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. महायुतीमधील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते आणि उपमुख्यमंत्री अजित दादांनी देखील खोत यांच्या विधानावरुन नाराजी व्यक्त केली आहे. अजित पवारांच्या या टीकेवर आता सदाभाऊ खोत यांनी कठोर भूमिका घेत त्यांनाच उलट सवाल केला आहे. माझ्या टिकेनंतर सगळे प्रस्थापित आता खवळून उठले आहेत. कोण ट्वीट करू लागलेत, कोण आंदोलन करू लागलेत पण ट्वीट काय करताय? आभाळावर मोठ्या अक्षरात विरोध करा, असा खोचक टोला खोत यांनी अजित पवारांसहीत त्यांच्या या विधानावरुन विरोध करणाऱ्यांना लगावला आहे. २००२ साली राष्ट्रवादी काँग्रेसच्या गुंडांनी माझं अंग सोलून काढलं त्यावेळी तुमचे ट्वीटर बंद पडले होतं का? फेसबुक चालत नव्हतं का? तेव्हा तुमच्या तोंडाला कुलूप लागले होते का? असा सवाल करत खोत यांनी, आमचा जन्म आमची लढाई ही प्रस्थापितांच्या विरोधात आहे, असं नमूद केलं आहे. तसेच, वाडयांनी गाव गाड्याच्या नादाला लागू नये, असं इशारा देखील यावेळी सदाभाऊ खोतांनी अजित पवारांसहीत सर्वच विरोधकांना आहे.

धक्का!!
सुराज्य सोलापूर
शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर २०२४ । पान १२


# काडादी ते काडादी... ७२ वर्षांचा प्रवास!

माढा, सांगोलाप्रमाणे याही तालुक्याला दुष्काळी तालुका म्हणून डाग होता. सीना-भीमा खोऱ्याचे वरदान या तालुक्याला आहे. या तालुक्याचा आकार आपल्या शरीरातील जठराप्रमाणे आहे.सीना-भीमा खोऱ्यात आणि होटगी भागात कन्नड-मराठी भाषिक,वळसंग-बोरामणी-उळे-कासेगाव हा भाग मराठी भाषिक,अशी ओळख या तालुक्याची सांगता येईल.या संपूर्ण भागाने अनेक वर्षे काँग्रेसला साथ दिली. सीना-भीमा खोऱ्यात सिंचन क्षेत्र वाढल्याने या परिसरात हरित क्रांती घडते आहे. अक्कलकोटला आणि तुळजापूर या तालुक्यांच्या सीमावर्ती भागातही बागायत क्षेत्र वाढत चालले आहे. त्यामुळे दुष्काळी तालुका हा डाग केव्हा पुसून गेला आहे.



✔ सोलापूर/पुरुषोत्तम कुलकर्णी

**दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघातील यंदाची निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण असणार आहे.या तालुक्याने स्वातंत्र्यानंतर बरीच वर्षे काँग्रेस पक्षाला मोठे पाठबळ दिले.त्यामुळे उभ्या राज्यात दक्षिण तालुका काँग्रेस बालेकिल्ला ही बिरूदावली या तालुक्याला मिळाली.स्वातंत्र्य चळवळीत अगदी तरूणपणात ज्यांनी ज्यांनी म्हणून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचाराची पताका खांद्यावर घेतली,त्या नेत्यांनी स्वातंत्र्यानंतर या तालुक्याच्या भूमीत काँग्रेसची विचारधारा रूजवली. अगदी निष्ठेने, प्रामाणिकपणे काँग्रेसच्या विचाराचा प्रसार करून काँग्रेसचा वेलू गगनावरी नेला.या नेत्यांच्या यादीत कर्मयोगी अप्पासाहेब काडादी,वि.गु.शिवदारे, आनंदराव देवकते,दीनानाथ कमळे गुरूजी,चंद्राम चव्हाण गुरूजी यांची नावे प्राधान्याने घेता येतील.या सर्वांनी काँग्रेसची विचारधारा रूजवण्याबरोबरच अनेक कार्यकर्ते घडवले.सामान्य कार्यकर्त्यांना मोठेपण दिले,हे विसरता येणार नाही.**




## अप्पासाहेब काडादी पहिले आमदार

स्वातंत्र्यानंतर १९५२ला विधानसभेची पहिली निवडणूक झाली.त्यावेळी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुका हे एकसंध विधानसभा मतदार संघ होते.सोलापूरच्या भूमीत ज्यांनी काँग्रेसचा ध्वज रोवला,त्या अप्पासाहेब काडादी यांना काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आली. अक्कलकोट आणि दक्षिणच्या मतदारांनी अप्पासाहेब काडादी यांना विजयी केले. त्याकाळी विरोधी पक्षाचा मागमूसही नव्हता.त्यामुळे काँग्रेसची वाट मोकळी होती.तेथूनच काडादी घराण्याच्या राजकीय कारकिर्दीचा आरंभ झाला. अप्पासाहेब काडादी यांचे वरच्या फळीतील नेत्यांचे चांगले संबंध होते. त्याचा फायदा त्यांनी आपल्या सामाजिक कार्याशी करून घेतला.त्यातून सोलापुरात चेंबर ऑफ कामर्स, बाजार समिती, कुमठे येथील श्रीसिद्धेश्वर साखर कारखान्याची उभारणी अशा संस्था त्यांनी त्या काळी उभ्या केल्या. अप्पासाहेबांचा शब्द सर्वत्र प्रमाण असायचा. अप्पासाहेबांचे सामाजिक कार्य आणि लोकसंग्रह पाहून काँग्रेसने त्यांना १९६२मध्ये सोलापूर लोकसभा मतदार संघातून उमेदवारी दिली आणि ते भरघोस मतांनी निवडून आले.

## १९६२ला आपला भाऊ वेगळा झाला...

विधानसभेच्या तिसऱ्या निवडणुकीत म्हणजेच १९६२ ला अक्कलकोट विधानसभा मतदार संघ वेगळा झाला आणि दक्षिण तालुका एकाकी पडला.१९६२ मध्ये वि.गु. शिवदारे यांचा उदय झाला. शिवदारे यांचेही काँग्रेसच्या कार्यात मोठे योगदान होते. गाय वासरू हे त्यांचे चिन्ह होते. त्यांच्या प्रचाराच्या वेळी गाय वासरू-नका विसरू हे श्लोगन खूप गाजले होते.शिवदारे यांचा विविध विषयांवर दांडगा अभ्यास होता.उजनी धरण सोलापूरसाठी व्हायला पाहिजे यासाठी त्यांनी विधानसभेत आवाज उठवला होता. त्यांची वाणी अमोघ होती. अनेक कार्यकर्त्यांना उभे करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

# FLASH BACK




## भाई छन्नुसिंग चंदेले दुसरे आमदार

१९५७च्या दुसऱ्या निवडणुकीतही दक्षिण तालुका आणि अक्कलकोट हे एकसंध विधानसभा मतदार संघ होते.या दोनही ठिकाणी काँग्रेस पक्षाने भाई छन्नुसिंग चंदेले यांना उमेदवारी दिली.वास्तविक पाहता चंदेले यांचे पक्षाचे कार्य सोलापुरात होते.स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे मोठे योगदान होते.जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांच्या कार्याचा सर्वत्र ठसा होता.काँग्रेसने तिथे उमेदवारी दिल्यानंतर मतदारांनी अगदी डोळे झाकून त्यांना निवडून दिल्याची नोंद इतिहासात आढळते.त्याकाळी बाहेरचा आणि आपला उमेदवार असा भेदभाव बिलकूल नव्हता. काँग्रेस म्हणजे काँग्रेस.ही भावना मतदारांमध्ये होती.मतदारांची काँग्रेसवर अपार निष्ठा होती. आजची स्थिती पाहाता दहा-दहा वर्षे तोच तोच आमदार आपल्याला पहायला मिळतो. पण त्याकाळी प्रत्येक नेत्याला पक्षाकडून संधी दिली जायची.

## ७२ वर्षांनी काडादी घराण्याचा फैसला

७२ वर्षांनी दक्षिण सोलापूर तालुक्यात काडादी घराण्याच्या राजकीय भवितव्याचा फैसला होणार आहे.कारण अप्पासाहेब यांचे नातू धर्मराज काडादी हे अपक्ष म्हणून या मतदार संघात उभे आहेत.अप्पासाहेब यांच्यानंतर काही वर्षांचा अपवाद वगळता श्रीसिद्धेश्वर साखर कारखान्याची धुरा त्यांनी सक्षमपणे सांभाळली आहे.काका मेघराज काडादी हे निवर्तल्यानंतर सर्व शिक्षण संस्था आणि श्री सिद्धेश्वर देवस्थानचा भारही ते सांभाळत आहेत. तेव्हा आता राजकारणाची कूस बदलली आहे.मतदारांची मानसिकताही बदलत चालली आहे.अशा परिस्थितीत धर्मराज काडादी यांची कसोटी लागणार आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक वैशिष्टपूर्ण आणि रंगतदार ठरणार आहे.

# माने, खरेंची गाडी सुसाट! क्षीरसागर प्रचारात थंड

✔ मोहोळ/प्रतिनिधी

मोहोळ विधानसभा मतदार संघात तिरंगी लढत होईल असे वाटत होते. परंतु अपक्ष उमेदवार संजय क्षीरसागर यांनी अद्याप प्रचारात पाहिजे तशी आघाडी घेतली नसल्याने सध्यस्थितीला ही लढत राष्ट्रवादी अजितदादा आणि राष्ट्रवादी शरद पवार या दोघांच्या उमेदवारात दुरंगी होताना दिसत आहे. क्षीरसागर हे प्रचारात थंड असून माने आणि खरेंची गाडी सुसाट सुटली आहे.


यशवंत माने


राजू खरे


संजय क्षीरसागर

### डोंगरे, चवरे यांची खरे यांना साथ

सध्या सुरु असलेल्या प्रचाराच्या रणधुमाळीत भाजपाला मोठा धक्का बसला आहे. भाजपाचे विजयराज डोंगरे आणि त्यांचे कार्यकर्ते हे राजू खरे यांच्या प्रचारात सहभागी झालेले दिसत असतानाच शिंदे सेनेचे जिल्हा अध्यक्ष चरण चवरे यांनी ही राजू खरे यांच्या पेनूर येथे सभा घेवून प्रचारात उडी घेतली आहे.

मोहोळ विधानसभा मतदारसंघ तसा राजन पाटलांचा बालेकिल्ला. आजपर्यंत जवळजवळ सहा टर्म त्यांनी वर्चस्व कायम ठेवले आहे. यशवंत माने यांची टर्म पूर्ण होण्याअगोदरच त्यांना पुढील तिकीट देण्याचे माजी आमदार राजन पाटील यांनी जाहीर केले होते. त्याच यावेळी यशवंत माने यांना राजन पाटील यांनी उमेदवारी जाहीर केल्यानंतर त्यांच्यासमोर उमेदवार कोण असणार, मोहोळ जागा कोणाला सुटणार अशा प्रकारचे समोर प्रश्न निर्माण झाले होते. दुसरीकडे संजय शिरसागर यांनी भारतीय जनता पार्टीमधून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. विधानसभेच्या अनुषंगानेच हा प्रवेश करण्यात आला होता. आपल्याला उमेदवारी देणारच असल्याचे पक्षश्रेष्ठींनी सांगितल्याचे संजय शिरसागर यांनी प्रसार माध्यमांना सांगितले होते परंतु जसजशी विधानसभेची निवडणूक जवळ आली तसे मोहोळमध्ये पवार गटाकडून इच्छुक उमेदवार वाढू लागले. रमेश कदम, राजू खरे, पवन गायकवाड, संजय क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर यांच्यासह अनेकांनी फिल्डींग लावली होती. परंतु ऐनवेळी शरद पवार यांनी रमेश कदम यांच्या कन्या सिद्धी कदम यांना उमेदवारी जाहीर केली. ही उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून अभिनंदन च्या पोस्ट प्रसारमाध्यमावर वायरल झाल्या आणि मोहोळ तालुका बचाव संघर्ष समिती खडबडून जागी झाली. थेट उमेश पाटलांच्या नेतृत्वाखाली बळीराम काका साठे यांच्या मदतीने बारामती गाठत सिद्धी कदमांची उमेदवारी बदलून राजू खरे यांना द्यायला लावली. उमेदवारीन मिळाल्याने संजय क्षीरसागर नाराज झाले आणि त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. त्यामुळे ही लढत आ. माने-राजू खरे आणि संजय क्षीरसागर यांच्यात होईल असे वाटत होते. मात्र संजय क्षीरसागर सध्या तरी माने आणि खरे यांच्यापेक्षा प्रचारात मागे आहेत.

यशवंत माने यांनी वडवळ येथून प्रचाराचा शुभारंभ केला.त्याच ठिकाणावरून राजू खरे यांनी प्रचारचा शुभारंभ केला अपक्ष उमेदवार संजय क्षिरसागर यांनी त्यांच्या ठरावीक कार्यकत्यांना सोबत घेत मोहोळच्या नागनाथ मंदिरात श्रीफळ वाढवून कॉर्नर सभा घेतली

# मोहोळमध्ये काकांची लढाई मालकांशी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**राखील असलेल्या मोहोळ मतदारसंघात प्रथम राष्ट्रवादी विरूद्ध राष्ट्रवादीत लढत होत असली तरी अनगर राजन(मालक) पाटील आणि वडाळाचे बाळरामकाका यांच्या प्रतिष्ठेचीही लढाई आहे. यात कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**





राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्याने दोन गट झाले. अजित दादा पवार यांच्याकडे पक्षाची धुरा आल्याने अनगरचे मालक दादांकडे ओढले गेले अन विद्यमान आमदार यशवंत माने यांनीदेखील त्यांना साथ दिली. महायुतीमधून राष्ट्रवादीतर्फे पुन्हा यशवंत मानेंना उमेदवारी मिळाली. तर दुसऱ्या पवारांच्या राष्ट्रवादीमधून महाविकास आघाडीतर्फे राजू खरे यांना उमेदवारी मिळाली. माने आणि खरे यांच्यात ही लढत होणार असली तर राजन मालक आणि बळीराम काका यांची प्रतिष्ठा मात्र यात पणाला लागली आहे.

गेल्या पाच वर्षात आ. माने यांनी मोहोळ मतदारसंघात दोन हजार ५०० कोटीचे विविध काम केली आहेत. राजू खरे यांनी देखील मोहोळ मतदारसंघातील विविध गावात मागेल त्याला योजना आणली आहेत. जनतेची कामे केल्याने त्यांनी माने यांच्यसमोर मोठ आव्हान उभे केले आहे. गेल्या अनेक निवडणुकीत मालक सांगतील तोच आमदार झाला आहे. अनगरच्या मालकांचा शब्द आजपर्यंत मोहोळ मतदारसंघात कोणत्याही मतदाराने फिरवला नाही. पण याच मतदार संघातील २४ गावात मात्र बळीराम काकांचा शब्द आदर्श मानणारे देखील कार्यकर्ते आहेत. त्यांनी देखील आपली वेगळी फळी निर्माण केली आहे. त्यामुळे राजन मालक आणि बळीराम काका आपापल्या परीने उमेदवारांना विजयी करण्याचा प्रयत्न करत आहेत. यात कोणाला यश मिळणार हे २३ नोव्हेंबर रोजीच कळणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था ते विधीमंडळ!

✔ सोलापूर/अजित उंब्रजकर

स्थानिक स्वराज्य संस्थेतील कामकाजाच्या शिदोरीचा अनुभव असला की, विधानसभेची पायरी चढण्याची संधी मिळालीच तर कामकाज करताना अडचणी येत नाहीत. हेच धोरण राबवित जिल्ह्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्व केलेले तब्बल २४ उमेदवार मतदारांसमोर जात आहेत. त्यात नगरसेवक राहिलेले सहा, जिल्हा परिषद सदस्यपद भूषविलेले दोन तर एका पंचायत समिती सदस्याचा समावेश आहे. याशिवाय विद्यमान ९ आमदार असून, ५ माजी आमदार पुन्हा निवडणूक रिंगणात आहेत.

विधानसभेची पायरी चढण्यासाठी मिनी मंत्रालय अर्थातच जिल्हा परिषद, पंचायत समिती याबरोबरच नगरपालिका, महापालिका सभागृहाचा अनुभव असला की, विधानसभेचे कामकाज करताना सुलभ जाते. यंदा विद्यमान ९ आमदार रिंगणात आहेत. त्यामध्ये शहर उत्तरमधून आ. विजयकुमार देशमुख, दक्षिणमधून आ. सुभाष देशमुख, अक्कलकोटमधून सचिन कल्याणशेट्टी, मंगळवेढा-पंढरपूरमधून समाधान आवताडे, करमाळ्यातून संजयमामा शिंदे, सांगोल्यातून शहाजी पाटील, मोहोळमधून यशवंत माने, माळशिरसमधून राम सातपुते तर बार्शीतून राजा राऊत यांचा समावेश आहे. याशिवाय माजी चार आमदार यांनी आपापल्या मतदारसंघाचे विधानसभेत प्रतिनिधित्व केलेले असून ते पुन्हा निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यात मध्यचे नरसय्या आडम, बार्शीचे दिलीप सोपल, अक्कलकोटचे सिद्धाराम म्हेत्रे तर करमाळ्याचे नारायण पाटील, सांगोल्याचे दिपकआबा साळुंखे पाटील आहेत.



### चार मतदारसंघात आजी-माजी आमदारात लढत

अक्कलकोटमध्ये सचिन कल्याणशेट्टी आणि सिद्धाराम म्हेत्रे, बार्शीत राजा राऊत आणि दिलीप सोपल, सांगोल्यात शहाजीबापू पाटील आणि दिपकआबा साळुंखे, करमाळ्यात संजयमामा शिंदे आणि नारायण आबा पाटील या आजी माजी आमदारात लढत होत आहे.

### यंदा माढ्याला मिळणार नवा आमदार

माढा मतदारसंघात तिरंगी लढत होत आहे. यामध्ये अपक्ष रणजिसिंह शिंदे, राष्ट्रवादी अजितदादा गटाच्या ॲड. मिनल साठे तर पवार गटाचे अभिजित पाटील यांचा समावेश आहे. या तिन्ही उमेदवारांपैकी कोणीही विजयी झाला तर तो माढ्याचा नवीन आमदार असणार आहे. उर्वरित मतदारसंघात तशी परिस्थिती नाही.

याशिवाय ६ माजी नगरसेवक आमदार होण्याचे स्वप्न पहात आहेत. यामध्ये शहर उत्तरमधील महेश कोठे आणि शोभा बनशेट्टभ, मध्यमधील देवेंद्र कोठे, चेतन नरोटे, दक्षिमधील बाबा मिस्त्री, तर माढ्यातील ॲड. मिनल साठे यांचा समावेश आहे. याशिवाय जि.प.चे प्रतिनिधीत्व केलेले अमर पाटील दक्षिणमधून लढत आहेत याशिवाय माजी जि.प. सदस्य रणजिसिंह शिंदे हे माढ्यातून लढत आहेत. माजी पंचायत समिती सदस्य उत्तम जानकर हे माळशिरसमधून लढत आहेत.